संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
५ सप्टेंबर २०२०
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

तुजविण सख्या रे...
संजीवनी खेर

अंधाराची कूस, हुंदक्याने भरे
नीलांबरी जोशी

वर्चस्वाची भाषा
अपर्णा दीक्षित

विज्ञानाने ते रुजणं काँक्रिट केलं
हिनाकौसर खान

पंडित जसराज
शेवटचा तारा निखळला, एका युगाचा अंत झाला

अच्युत गोडबोले

VISIT…

साधनाच्या वर्गणीदार वाचकांना सूचना, विनंती, आवाहन...!

प्रिय वर्गणीदार वाचकहो,

कोरोना साथीपासून बचावासाठी मार्चअखेर संपूर्ण देशभरात लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर ऑगस्ट अखेरपर्यंत, पोस्टखात्याचे काम पूर्णतः ठप्प होते किंवा अत्यावश्यक सेवेपुरतेच चालू होते. त्यामुळे मागील पाच महिन्यांत साप्ताहिकाचे सर्व अंक फक्त ऑनलाईन स्वरूपात प्रकाशित झाले. मात्र २० ऑगस्ट रोजी पोस्टखात्याने पोस्टींगसाठी अंक स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार हा पहिला छापील अंक आपणास पाठवण्यात आला आहे. यापुढील प्रत्येक आठवड्याचे छापील अंक नियमितपणे पोस्टाद्वारे आपल्यापर्यंत येत राहतील.

मागील पाच महिन्यांत साधना साप्ताहिकाचे २१ अंक प्रकाशित झाले, ते सर्व अंक त्या-त्या आठवड्यात weeklysadhana.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आले. शिवाय ज्या वर्गणीदार वाचकांचे व्हॉट्सॲप नंबर/इ-मेल आमच्याकडे होते, त्या सर्वांना त्या-त्या वेळीच पाठवण्यात आले आहेत.

आता मागील अंकांचे प्रिंटींग व पोस्टींग हे दोन्ही करणार असल्याने त्यासंदर्भातील नियोजन असे आहे.

१. ऑगस्ट महिन्यातील चार अंक विशेषांक होते, ते साधनाच्या सर्व वर्गणीदारांना पुढील आठवड्यात पाठवत आहोत.

२. एप्रिल, मे, जून, जुलै या चार महिन्यांत साधनाचे १७ अंक प्रकाशित झाले आहेत, त्यासाठी वर्गणीदार वाचकांना तीन पर्याय देत आहोत.

पर्याय १ :- एप्रिल ते जुलै या चार महिन्यांतील सर्व छापील अंक आम्हाला हवे आहेत. त्यानुसार आमची वर्गणी जेव्हा केव्हा संपणार असेल तेव्हा आम्ही पाठवू आणि दरम्यानच्या चार महिन्यांत कधी तरी संपली असेल तर ती आम्ही तातडीने पाठवत आहोत.

पर्याय २ :- एप्रिल, मे, जून, जुलै या चार महिन्यांतील १७ अंक आम्ही डिजिटल स्वरूपात पाहिले/वाचले आहेत, त्यामुळे आम्हाला त्या छापील अंकांची गरज नाही. त्याऐवजी आमची वर्गणी संपण्याची मुदत पुढे ढकलावी. त्यानुसार वर्गणी संपेल तेव्हा पुढील वर्षासाठी पाठवू किंवा संपली असेल तर लगेच पाठवत आहोत.

पर्याय ३ :- आम्ही साधना साप्ताहिकाचे वर्गणीदार पूर्वी कधी तरी होतो किंवा कधीच नव्हतो, मात्र आता नव्याने वर्गणीदार होऊ इच्छितो. त्यासाठी वर्गणी पाठवत आहोत, आम्हाला ऑगस्ट/सप्टेंबर २०२० पासून वर्गणीदार करून घ्यावे.

वरीलपैकी पर्याय १ पसंत असेल त्यांनी शक्य तितक्या लवकर कळवावे. त्यांना १५ सप्टेंबरपर्यंत त्या चार महिन्यांचे अंक पाठवणार आहोत. पर्याय २ हवा असेल तर त्यांनी काहीही कळवण्याची आवश्यकता नाही. पर्याय ३ हवा असणाऱ्यांनी वर्गणी पाठवताना कोणत्या महिन्यांपासून वर्गणीदार व्हायचे आहे ते कळवावे.

संपर्क : साधना साप्ताहिक

४३१, शनिवार पेठ, पुणे ,४११०३०

Ph 02024451724 / Mob. 7028257757 / weeklysadhana@gmail.com

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
५ सप्टेंबर २०२०
वर्ष ७३ / अंक – ४
संपादक :
विनोद शिरसाठ
सहयोगी संपादक मंडळ :
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
Ph.: 020-24451724 /
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
एक वर्षांसाठी : ८०० रुपये
दोन वर्षांसाठी : १६०० रुपये
तीन वर्षांसाठी : २४०० रुपये

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634,**
IFSC MAHB 0000001, **बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

अनुक्रम

४ । संपादकीय
कोरोना काळात साधना कशी चालली?

७ । **पंडित जसराज : शेवटचा तारा निखळला, एका युगाचा अंत झाला**
अच्युत गोडबोले

१२ । **कायद्याचे राज्य आणि चिनी वैशिष्ट्ये असणारी लोकशाही**
सतीश बागल

१९ । **ऑगस्ट : कमलपुष्पांचा हा मधला हंगाम**
विश्वास वसेकर

२६ । **अंधाराची कूस, हुंदक्याने भरे... नीरोज गेस्ट्स डॉक्युमेंटरी**
नीलांबरी जोशी

३१ । **वर्चस्वाची भाषा**
अपर्णा दीक्षित

३६ । **तुजविण सख्या रे...**
संजीवनी खेर

४० । **विज्ञानाने ते रुजणं काँक्रीट केलं**
हिनाकौसर खान

स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधना । करिती साधना त्यांना ठेवी उत्स्फूर्त साधना ।।

संपादकीय

कोरोना काळात साधना कशी चालली ?

२४ मार्च रोजी रात्री पंतप्रधानांनी देशाला उद्देशून भाषण केले आणि दुसऱ्याच दिवशीपासून संपूर्ण देश २१ दिवस लॉकडाऊन राहणार असल्याचे जाहीर केले. त्यानंतर तो लॉकडाऊन दोन वेळा (प्रत्येकी दोन आठवडे) वाढवण्यात आला. त्यामुळे दोन महिने देशातील सर्व व्यवहार ठप्प राहिले. त्यानंतर व्यवहार अंशत: सुरू करण्यात आले आणि क्रमाक्रमाने निर्बंध कमी करण्यात आले. ऑगस्टअखेरीस बहुतांश निर्बंध हटवण्यात आले आहेत. त्यामुळे मागील पाच महिने हा कालखंड कोरोनाचाच होता, असे म्हणावे लागते. देशातील व जगातील जनजीवन ठप्प राहिल्याचे आर्थिक, सामाजिक, मानसिक स्तरावर काय परिणाम होतील हे सध्या तरी कोणालाही ठोसपणे सांगता येत नाही. देश व जग कोरोनामुक्त होण्यास किती काळ लागेल, याबद्दल आणखी सहा महिने ते दीड वर्षे इतका अंदाज व्यक्त केला जात आहे. याबाबत साधनाच्या याआधीच्या अंकांतून आम्ही बरेच काही प्रसिद्ध केले आहे, यानंतरही अगदी वेगळे व विशेष महत्त्वाचे जे काही पुढे येईल ते आम्ही प्रसिद्ध करणार आहोत.

आज मात्र कारोनाच्या काळात म्हणजे मागील पाच महिन्यांत साधना ही संस्था कशी चालली किंवा कार्यरत राहिली, याबद्दल साधनाच्या वाचकांना आम्ही अवगत करू इच्छितो. कारण जगाच्या इतिहासातील हा एक वैशिष्ट्यपूर्ण कालखंड म्हणून ओळखला जाईल आणि साधनाच्या सात दशकांच्या वाटचालीत या टप्प्याच्या नोंदी महत्त्वाच्या ठरणार आहेत.

तर लॉकडाऊनची घोषणा झाली तेव्हा प्रस्तुत संपादक अहमदनगर जिल्ह्यातील आपल्या लहान गावात होता. साधनाचे दोन-चार कार्यालयीन सहकारी, साधना कार्यालयाच्या जवळपास वास्तव्य करीत होते. ते सहकारी रोज आवश्यकतेप्रमाणे कार्यालयात येऊ शकणार होते. त्यामुळे शक्य असेल तेवढी जास्त कार्यवाही चालू ठेवण्यासाठी काहीशी अनुकूलता होती. आणि अन्य १० सहकारी पुणे शहरातील कानाकोपऱ्यांत वास्तव्य करीत होते, त्यातील काहीजण घरी राहून कामात सहभाग घेऊ शकणार होते.

साधना ट्रस्टच्या अंतर्गत पाच विभाग येतात. साधना साप्ताहिक, साधना प्रकाशन, साधना मीडिया सेंटर, कर्तव्य साधना आणि साप्ताहिकाचे डिजिटल अर्काइव. यांपैकी साधना मीडिया सेंटर हे पुस्तकविक्री केंद्र पूर्णत: बंद ठेवावे लागणे अपरिहार्य होते. साधना प्रकाशनाच्या पुस्तकांची बरीच पूर्वतयारी सर्व संबंधितांना आपापल्या घरी राहून करता येणार होती. साधना साप्ताहिकाचे अंक छापता येणार नव्हते, पोस्टाद्वारे पाठवता येणार नव्हते, मात्र ऑनलाईन प्रसिद्ध करता येणार होते. कर्तव्य या डिजिटल पोर्टलचे आणि साप्ताहिकाचे डिजिटल अर्काइवचे काम मोठी ताकद लावून करता येणार होते.

त्यानुसार पहिला निर्णय असा होता की, साधना साप्ताहिकाचे अंक प्रत्येक शनिवारी तयार करायचे, त्याची सॉफ्ट कॉपी लगेच साधनाच्या वेबसाईटवर अपलोड करायची आणि ज्या वर्गणीदार वाचकांचे व्हॉट्सअॅप नंबर व इ-मेल पत्ते आहेत, त्या सर्वांना ती सॉफ्ट कॉपी पाठवायची. एवढेच नाही तर, ही सॉफ्ट कॉपी कोणीही कोणालाही जरूर पाठवावी

कर्तव्य
साधना

साधना
मीडिया सेंटर

साप्ताहिक
साधना

साधना साप्ताहिक
डिजिटल अर्काइव

साधना
प्रकाशन

अशी विनंतीवजा सूचनाही प्रत्येक अंक पाठवताना केली जात होती. त्यामुळे साधनाचे साधारणत: ८० टक्के वर्गणीदार वाचक व वर्गणीदार नसलेले काही वाचक यांच्याकडे मिळून दहा हजारांपेक्षा अधिक लोकांकडे प्रत्येक अंकाची सॉफ्ट कॉपी जात होती, हे निश्चित. ते लोक आपापल्या स्तरावर फॉरवर्ड करीत राहिले किंवा ग्रुपवर टाकत राहिले, ती संख्या वेगळी धरावी लागेल. या सर्व सॉफ्ट कॉपीजचे वितरण विनामूल्य केले गेले. मागील पाच महिन्यांत अशा प्रकारे वितरित झालेल्या साधनाच्या एकूण अंकांची संख्या आहे २१, त्यात सहा विशेषांक आहेत. गंभीर मजकूर व दीर्घ लेख असलेल्या अंकाची सॉफ्ट कॉपी ऑनलाईन वाचणे हे काहीसे त्रासाचे ठरते, हे लक्षात घेतले आणि आलेल्या काही नेटवर्कच्या मर्यादा समजून घेतल्या तरी त्याचे झालेले स्वागत उत्तम म्हणावे असेच होते. मात्र ज्यांना छापील अंक वाचणेच सोईचे वाटते, त्यांच्यासाठी हा एकूण प्रकार दूधाची तहान ताकावर असाच होता.

साधना प्रकाशनाच्या पुस्तकांची छपाई बंद ठेवावी लागली होती, मात्र जी पुस्तके पुढील दोन वर्षांत छापायची आहेत असे नियोजन होते; त्यांची पूर्वतयारी म्हणजे अक्षरजुळणी, मुद्रितशोधन आणि मुखपृष्ठे व सजावट ही सर्व प्रक्रिया मागील पाच महिन्यांत बरीच मार्गी लावली आहे. त्यातून साने गुरुजींच्या एकूण १४ कादंबऱ्यांचे वरील प्रकारचे काम पूर्णत्वाच्या जवळ गेले आहे. त्यामुळे गुरुजींनी लिहिलेल्या आत्मचरित्रात्मक चार, सामाजिक सहा व राजकीय चार अशा एकूण १४ कादंबऱ्या पुढील सहा ते आठ महिन्यांतच येऊ शकणार आहेत. याशिवाय नानासाहेब गोरे, ग.प्र.प्रधान व यदुनाथ थत्ते यांची मिळून दहा-बारा आऊट ऑफ प्रिंट पुस्तके नव्या आवृत्तीच्या स्वरूपात आणण्यासाठीही अर्ध्याहून अधिक काम मार्गी लावले आहे. याचबरोबर सध्याची २५ पुस्तके इ-बुक स्वरूपात आणण्याचे कामही जवळपास संपवले आहे. त्यामुळे लवकरच पुढील तीन-चार महिन्यांत साधना प्रकाशनाची वेबसाईट कार्यान्वित करणे आणि साधना प्रकाशनाची छापील पुस्तके व इ-बुक्स यांची खरेदी-विक्री सुलभ व जलद गतीने होऊ शकणार आहे.

साधना साप्ताहिकाचे मागील १२ वर्षांचे डिजिटल अर्काइव तयार करण्याचे काम दीड वर्षांपूर्वी हाती घेतले होते. मागील पाच महिन्यांत त्याला अधिक गती देऊन ते पूर्ण करण्यात आले आहे. अंकाची तारीख, लेखक, विषय, उपविषय व लेखनप्रकार इत्यादी प्रकारचे वर्गीकरण करून ते अंक आता वेबसाईटवर उपलब्ध आहेत. ते सर्व अंक किंवा त्यातील कोणतेही लेख डाऊनलोड करता येतात, त्याचप्रमाणे इ-मेल वा व्हॉट्सॲपद्वारे पाठवता येतात. ही संपूर्ण सुविधा सध्या तरी विनामूल्य आहे. मागील साठ वर्षांचे अंक अशाच पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आता विचाराधीन आहे. तो प्रकल्प अधिक वेळेची, अधिक मनुष्यबळाची व अधिक आर्थिक तरतुदीची मागणी करणारा आहे. हे सर्व केवळ अभ्यासकांसाठी नसून सर्वसामान्य वाचकांसाठीही आहे. अर्काइववर जाऊन जास्तीत जास्त वाचकांनी मुशाफिरी करावी, यासाठी आम्ही अधिक प्रयत्नशील राहणार आहोत.

कर्तव्य साधना हे डिजिटल पोर्टल ९ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू केले, त्याला आता एक वर्ष पूर्ण झाले आहे. मागील पाच महिन्यांत कर्तव्यची वाढ सर्वार्थाने शंभर टक्के झाली आहे. कारण त्यावर अपलोड होणाऱ्या लेखांची संख्या,

त्याला भेट देणाऱ्या वाचकांची संख्या आणि त्यावरील किती लेख वाचले गेले ही संख्या, हे तिन्ही आकडे आता (मार्चच्या तुलनेत) दुप्पट झाले आहेत. या कोरोना काळात कर्तव्यवर व्हिडिओ अपलोड करण्यात मात्र अडथळा होता. त्या आघाडीवर दुय्यम दर्जाचे काही करण्यापेक्षा न केलेले बरे, असा निर्णय घेऊन ती ऊर्जा अन्य कामांकडे वळवण्यात आली. यानंतर व्हिडिओ/ऑडिओ विभाग कार्यान्वित करणार आहोत. याच पाच महिन्यांत कर्तव्यवरील इंग्रजी विभागावर थोडे जास्त लक्ष केंद्रित करता आले. त्या विभागासाठी आता एका पूर्णवेळ उपसंपादकाची नियुक्ती करण्यात आली आहे. पुढील काळात हा विभागही अधिक चांगले रूप धारण करील.

कर्तव्यवरील लेख साधनात घ्यायचे नाहीत आणि साधना साप्ताहिकात प्रसिद्ध झालेले लेख कर्तव्यवर घ्यायचे नाहीत, असे ठरवले होते आणि ते (दोन-तीन वेळा अपवाद) पाळण्यात आले. प्रत्येक आठवड्यात कर्तव्यवर आठ ते दहा लेख प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे वर्षाच्या अखेरीस कर्तव्य हे स्वतंत्र साप्ताहिक म्हणूनच पुढे आले आहे. साप्ताहिकात जेवढा मजकूर प्रसिद्ध होतो, तितकाच कर्तव्यवर येतो आहे. पुढील वर्षभरात कर्तव्य हे लहान भावंड बरेच मोठे, व्यापक व परिणामकारक झालेले असेल यात शंका नाही.

साधना मीडिया सेंटर हा विभाग आधीची अडीच महिने पूर्ण बंद होता, नंतरची अडीच महिने हळूहळू कार्यान्वित झाला. मात्र त्याच्या वाढीसाठी काही योजना विचाराधीन आहेत.

वरील पाचही विभाग हाताळणारे साधनाकडे पूर्णवेळ काम करणारे सहकारी फक्त १५ आहेत आणि त्यांच्या मदतीला आर्टिस्ट, प्रुफ तपासणारे, अक्षरजुळणी करणारे असे तीन सहकारी साधनासाठी हवे तेव्हा उपलब्ध असतात. त्याचबरोबर अनुवाद व शब्दांकन या दोन प्रकारच्या कामांसाठीही तीन-चार लोक उपलब्ध असतात. या सर्वांच्या मनापासूनच्या गुंतवणुकीमुळे व सातत्यपूर्ण सहभागामुळेच आम्ही हे करू शकलो. तांत्रिक व अन्य अडचणी तर वेळोवेळी येणार हे उघड होते. पण त्याला महत्त्व न देता किंवा त्या अडथळ्यांचा गाजावाजा न करता साधनाचे काम चालू राहिले. त्यातही अधिक आश्चर्य हे आहे की, या संपूर्ण काळात साधनाचा संपादक पुणे शहरात एकही दिवस न येता दूर अंतरावरील लहान गावात राहून काम करू शकत होता. त्याचे सर्व श्रेय वरील सर्वांच्या कार्यक्षमतेला व तत्परतेला द्यावे लागेल.

अर्थकारणाच्या आघाडीवर काय स्थिती राहिली याचे कुतूहल अनेक वाचकांना असणे साहजिक आहे. कारण मुळात साधनाच्या कोणत्याही उपक्रमातून केलेल्या खर्चाच्या १० ते १५ टक्के यापेक्षा अधिक मार्जीन ठेवले जात नाही. तरीही आताच्या काळात साधनाचे सर्व कार्यालयीन सहकारी कायम राहिले. सर्वांना नियमितपणे पूर्ण वेतन/मानधन देण्यात आले. साप्ताहिक व कर्तव्य यांच्यासाठी लेखन करणाऱ्यांचे मानधन त्यांना नेहमीप्रमाणेच देण्यात आले. साधना प्रकाशनाच्या पुस्तकांची रॉयल्टीही मार्चअखेर हिशोब करून तत्परतेने देण्यात आली. या काळात किंवा त्याआधी अन्य घटकांनी केलेल्या कामाची कोणतीही देणी आठ-दहा दिवसांपेक्षा अधिक काळ लांबवायची नाही, याची दक्षता घेण्यात आली.

या संपूर्ण काळात तांत्रिक साह्य करण्यासाठी MKCL चे सहकारी आवश्यक तेव्हा उपलब्ध होते. सॉफ्टवेअरप्रणाली निर्माण करणे वा दुरुस्त करणे हे काम इव्होनिक्स टेक्नॉलॉजीज या कंपनीकडे सोपवले गेले होते आणि डिजिटल प्रकल्पासाठी IPSMF ने आर्थिक साह्य केलेले होते. याशिवाय काही हितचिंतकांनी लहान-मोठ्या देणग्या दिल्या होत्या. तरीही एकत्रित विचार करता, साधनालाही आर्थिक नुकसान सोसावे लागणारच आहे, ते भरून काढण्यासाठी काही उपाययोजना कराव्याच लागणार आहेत आणि नियोजित उपक्रमा'साठी म्हणजे साधनाच्या वाढीसाठी भरीव आर्थिक तरतूद उभी करावी लागणार आहे. मात्र या पाच महिन्यांच्या काळात अशी पायाभरणी झाली आहे, असा ऊर्जासंचय केला आहे की, कोरोनाच्या काळात गतिमान राहिलेली साधना आणखी पाच-सहा महिने याच पद्धतीने चालत राहिली तर कोरोना संकट गेल्यानंतर धावायला लागलेली असेल!

X

अभिवादन

अच्युत गोडबोले

पंडित जसराज : शेवटचा तारा निखळला, एका युगाचा अंत झाला

पंडित जसराज गेल्याची बातमी आली आणि मला खरोखरच प्रचंड धक्का बसला. ज्यांना गाण्यातल्या क्षेत्रातले चार अतिरथी-महारथी म्हणता येईल असे कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर, भीमसेन जोशी आणि जसराज यांनी अनेक दशकं गाजवली. या सगळ्यांनी गाण्यामध्ये खरोखर आपल्याला रमवलं आणि प्रचंड आनंद दिला. आज त्यांच्यातला शेवटचा तारा- म्हणजे पं. जसराज- निखळलेला आहे. एक मोठं युग संपलंय, असं मला वाटतंय. संगीतातल्या या चारही ताऱ्यांशी माझा जवळचा संबंध आला होता. या सगळ्यांबरोबरच्या आठवणी खूप दाट आहेत.

मी शाळेत असताना जसराजजी, कुमारजी, भीमसेनजी अशा मोठमोठ्या लोकांना श्रीराम पुजारीसर सोलापूरला आमच्याकडे घेऊन यायचे. पुजारीसरांना साहित्य, कला आणि संगीत यांच्याविषयी प्रचंड प्रेम होतं. माझी बहीण सुलभाताई गाणं शिकायची. पुजारीसर, सुलभाताई व पुष्पा आगरकर यांनीच मला संगीत आणि साहित्य यांची आवड लावली. पं. जसराज आमच्याकडे यायचे, तेव्हा आल्यावर ते सुलभाताईला विचारायचे, ''बेटा, काय शिकते आहेस तू?'' मग बहीण काही तरी गाऊन दाखवायची. मला आठवतंय की, पंडितजी त्या वेळी बहिणीला शिकवत असत. बहुधा तो नटभैरव असावा- 'चढीए मुलुख सुलतान' ही बंदिश होती. नंतर प्रत्यक्षात आणि रेकॉर्ड्समध्ये असंख्य वेळा त्यांचा नटभैरव मी ऐकलेला आहे. पं. रविशंकर आणि अली अकबर यांनी नटभैरव लोकप्रिय केला. वसंतरावसुद्धा नटभैरव सुंदर गात. शाळेत असताना पं. जसराज, पं. कुमार गंधर्व, पं. भीमसेन जोशी, बिरजूमहाराज अशा अनेकांच्या मैफिली मला सोलापूरला ऐकता आल्या आणि त्यांच्याबरोबर गप्पाही मारता आल्या.

त्यानंतर आयआयटीला गेल्यावर तिथे 'स्वरांजली' नावाचा आमचा गाण्याचा एक ग्रुप जमला. त्याच्यामध्ये पु.लं.च्या नारायणसारखी आम्ही सगळी कामं करत असू. कुठलाही प्रोगॉम ठरवताना त्याच्या जाहिराती मिळव, त्या गायकांच्या घरी जा, त्यांचा कार्यक्रम ठरव- हे सगळं करत असताना फार मजा यायची. त्यातूनच पं. जसराज यांच्याशी

पंडितजी मला प्रेमानं खूप गोष्टी सांगायचे. न्यूयॉर्कमध्ये तिथल्या एका हॉलला आपलं कसं नाव दिलंय, एका उपग्रहाला आपलं नाव कसं दिलंय (हा मान यापूर्वी फक्त केसरबाई केरकर यांना चॅलेंजर या यानामध्ये जतन करून ठेवलेल्या त्यांच्या 'जात कहाँ हो' या भैरवीच्या रूपानं मिळाला होता.) याचा पंडितजींना खूप अभिमान वाटायचा. आज मला अतिशय मोठी पोकळी जाणवतेय. खरोखरच एका युगाचा अंत झालाय, असं मला वाटतंय. भीमसेनजी, कुमारजी, किशोरीजी आणि जसराजजी यांनी माझ्या सोलापूरच्या दिवसांपासून ते अगदी काल-परवापर्यंत जी अनेक दशकं गाजवली, ती सगळी दशकं अक्षरशः एका क्षणार्धात माझ्या डोळ्यांसमोरून गेली. डोळे पाणावले. मला राहवलं नाही, म्हणून हे सगळं मी सांगतोय. माझी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

आणखीनच ओळख झाली. जसराजजी त्या वेळी शिवाजी पार्कला तिसऱ्या की चौथ्या मजल्यावर राहत असत. त्यांच्या घरी एक निमुळता जिना चढून जावं लागायचं. त्या वेळी सारंग आणि दुर्गा ही त्यांची मुलं खूप लहान होती. त्यांच्या घरी आमच्या खूप गप्पा चालायच्या. कित्येक वेळा ते गझला ऐकायचे. आम्हाला वाटायचं– एवढा मोठा क्लासिकलचा सिंगर आणि चक्क गझला ऐकतोय? गुलाम अली, बेगम अख्तर अशा अनेकांच्या गझला ते ऐकत असत आणि ते त्या आम्हाला गुणगुणून दाखवायचेसुद्धा.

त्या माणसाकडे रागांचा केवढा मोठा संग्रह होता! त्यांच्याच तोंडून आम्हाला अनेक कहाण्या ऐकायला मिळायच्या. त्यांचे मोठे बंधू मणिराम हे त्यांचे खरे गुरू. मणिरामांचा आवाज खरखरीत होता. पण गाण्यातले ते पक्के. पं. जसराजांचा आवाज मात्र अतिशय मुलायम. मणिराम आणि त्यांची 'जोग' रागातली जुगलबंदी खूपच सुंदर आहे.

जसराजजी पहिल्यांदा तबलजी होते. एकदा कुमार गंधर्वांचा लाहोरमध्ये कार्यक्रम होता. ते पंडित मणिरामांकडे आले. त्या वेळी मणिरामांकडे १३ वर्षांचे जसराज तबला वाजवत होते. कुमारांनी मणिरामांना विचारलं, ''जसराजला साथीला घेऊन जाऊ का?'' तर मणिरामांनी परवानगी दिली. त्या मैफिलीत कुमारांनी भीमपलास राग गायला. तेव्हा भीमपलासाच्या आरोहात न येणाऱ्या धैवत स्वरावर ते समेवर आले. असं शक्यतो कुणी करत नही; पण कुमारांनी ते केलं. दुसऱ्या दिवशी मणिरामांकडे अमरनाथ चावला नावाचे गायक आले आणि आदल्या दिवशीच्या कुमारांच्या भीमपलासवर टीका करायला लागले. त्यावर जसराज म्हणाले, ''कुमारांनी काल भीमपलासात जरी धैवतावर सम घेतली असली, तरी त्यामुळे रागाचं सौंदर्य वाढलंच होतं.'' जसराजनं असं बोललेलं अमरनाथांना आवडलं नाही. ते म्हणाले, ''मेलेल्या प्राण्याची कातडी बडवणाऱ्यांना (तबल्याची साथ देणाऱ्यांना) गाणं कळत नाही. त्यांनी यावर बोलू नये!'' या बोलण्यामुळे लहानग्या जसराजला खूप वाईट वाटलं. गायकाला मान मिळतो आणि तबलावादकाला फारसा मान नाही, हे पाहून जसराजनं गाणं शिकायचं ठरवलं.

थोड्याच दिवसांत आणखी एक कार्यक्रम होता. त्याची पूर्वतयारी पाहण्यासाठी गेले असताना गायकासाठी व्यवस्थित आसनव्यवस्था केली होती, पण पेटी आणि तबलावादकांना खाली बसावं लागेल असं दिसत होतं. या कार्यक्रमात जसराज तबला वाजवणार होते. पण तेथील व्यवस्था बघून ते व्यथित झाले. अशा अपमानामुळे ते रात्रभर रडले आणि मग आपणच गायक व्हायचं, हा पुन्हा निश्चय केला. मणिरामांनी त्यांना गाणं शिकवायचं ठरवलं, तेव्हा जसराजचं वय १४ वर्षांचं होतं.

आणि जिद्द ती केवढी असावी? 'गायक झाल्याशिवाय मी केस कापणार नाही' असं ठरवूनच त्यांनी गाणं शिकायला सुरुवात केली आणि पुढच्या चार वर्षांत कसून तयारी केली. चार वर्षांनंतर झालेल्या मैफिलीमध्ये ते सगळ्यांसमोर गायले आणि मगच त्यांनी आपले केस कापले!

ते नुसतंच गाणं शिकले नाहीत, तर त्यातल्या सर्वोच्च गायकांपैकी एक झाले. या सगळ्या कहाण्या आम्ही त्यांच्या घरी बसून स्वत: ऐकलेल्या आहेत. एकदा 'स्वरांजली'मधले आम्ही २०–३० जण आयआयटीच्या लेक्चर हॉलच्या बाहेर लॉनवर जमलो होतो. तेव्हा एक अनौपचारिक पण अफलातून मैफिल रंगली होती. अरविंद पारेख यांनी सतार वाजवली होती आणि त्यांच्या पत्नीनं 'पुरिया धनश्री' राग गायला होता, तर पंडित जसराजांनी त्या वेळी चक्क तबला वाजवला होता! त्यांच्या गाण्याच्या प्रोग्रामला जाताना ते कसे तयार व्हायचे ते बघायचं, त्यांच्या गाडीत बसून किंवा त्यांच्या मागोमाग जायचं, ती पूर्ण मैफल ऐकायची, ती ऐकल्यावर धुंद होऊन परत यायचं– असं सगळं मी त्या काळात अनुभवलं आहे. कारण पुणे–मुंबईच्या सगळ्या मैफिली मी ऐकायचो, मग त्या मुंबईच्या रंगभवनच्या असोत किंवा पुण्याच्या सवाई गंधर्वच्या असोत!

पंडितजी वागायला खूप दिलखुलास आणि प्रसन्न होते. त्यांच्याबरोबर खाणं–पिणं व्हायचं, गप्पाही व्हायच्या. खूप मजा यायची. पूर्वी पंडितजी तबला वाजवत असल्यामुळे त्यांच्याकडे तबलजीही यायचे. एकदा झाकीर हुसेनही आलेला मला आठवतंय. पंडितजींच्या घरासमोर त्या वेळी शिवाजी पार्कसमोर इराण्याचं एक दुकान होतं. त्या दुकानात मी नेहमी चहा प्यायचो. एकदा मी झाकीर हुसेनबरोबर तिथेच चहा पिऊन नंतर समुद्रावर फिरायलाही गेलो होतो, असं मला अंधुकसं आठवतंय.

हा काळ इतका मंतरलेला होता की, सगळ्या विषयात डोकावून बघण्याचं आमच्या ग्रुपमध्ये वेडच होतं. 'मी कसा झालो'मध्ये 'मांजर जसं प्रत्येक दालनात डोकावून बघतं' असं अत्रे म्हणाले होते, तसं आम्ही विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य, चित्रकला

याबरोबरच संगीत– अशा प्रत्येक दालनात डोकावून बघायचो. म्हणजे सगळं काही पूर्णपणे कळणं शक्य नाही, पण निदान या सगळ्यांची मूलभूत तत्त्वं तरी कळली पाहिजेत, असा आमचा अट्टहास असायचा. आम्ही त्यातले तज्ज्ञ वगैरे काही झालेलो नव्हतो. मी तर मुळीच नाही. शास्त्रीय संगीतामध्ये काही तरी वेगळं आहे, असंच मला वाटायचं. त्या वेळी वेस्टर्न क्लासिकलपासून कर्नाटक संगीत, भारतीय संगीत, वाद्यसंगीत, कंठसंगीत या सगळ्यांमध्ये आम्ही डोकावत होतो आणि बुडून जात होतो. पण शास्त्रीय संगीतातले राग समजण्यासाठी अनेक कलाकारांचे अनेक राग असंख्य वेळा ऐकले. त्यातच पंडितजींचे किती तरी राग ऐकले होते. त्यांचे नटभैरव, तोडी, चारूकेशी, अहिर भैरव, असावरी, मियाँ मल्हार, मधुवंती, मारुबिहाग, पुरिया, दरबारी, केदार, नट, गोरख कल्याण, रागेश्री, शंकरा असे अनेक राग तर होतेच; पण त्याचबरोबर त्यांचा 'दिन की पुरिया', 'आसामांड', आपल्या माहितीतल्या 'पुरिया धनाश्री'पेक्षा वेगळा 'धनाश्री' असे रागही ते अप्रतिम गायचे. अनेक वेगवेगळे अनवट रागही त्यांच्याकडे असायचे.

त्यांचा एकच राग मला फारसा ऐकायला मिळाला नाही, तो म्हणजे 'यमन'. मुळात ते यमनही खूप चांगला गात असत. त्यांनी गायलेली 'जा जा रे पागल' ही यमनमधली बंदिश छानच आहे. पण एकदा त्यांनी किशोरी आमोणकरांचा यमन ऐकला आणि त्यानं ते इतके भारावून गेले की, आता आपण यमन गाण्यात काहीही अर्थ नाही– असं किशोरीताईंना चक्क सांगून मोकळे झाले, असंही मी ऐकलं होतं!

तुळजापूरच्या देवळामध्ये जसराजजी दर वर्षी 'माता कालिका' हे अडाणा रागातलं भजन गायचे. जवळपास दरबारीचेच सूर घेऊन येणाऱ्या अडाणाचं वातावरण मात्र दरबारीपेक्षा खूपच वेगळं आहे. दरबारी मंद्र आणि मध्य सप्तकात रमणारा; तर अडाणा सुरांचा खणखणाट करत, तार षडज गाठण्यासाठी वेगवान, आक्रमक होणारा आणि वीररसप्रधान. एकदा पंडितजी तुळजापूरला चाललले होते. तुळजापूरसाठी गाडी सोलापूरहूनच जाते. मला आठवतंय– आयआयटीत असताना मी एकदा सुट्टी म्हणून सोलापूरला गेलो होतो. जसराजजी मला म्हणाले, ''चलो बच्चमजी''– नाही तरी मला काही उद्योग नव्हताच. मग मी ट्रेनमध्ये



त्यांच्याबरोबरच बसलो. सगळा प्रवास आम्ही जसराजींबरोबर केला. तुळजापूरच्या त्या देवळात मी, जसराजजी, काही पुजारी आणि काही लोक एवढेच हजर होतो. त्या वेळी तिथे त्यांचं गाणं ऐकणं हा इतका विलक्षण अनुभव होता! अडाणा खूप कमी लोक गातात आणि त्यांनी तर तो खूपच सुंदर गायला होता. त्याची रेकॉर्डही आहे. पण तो त्यांच्या तोंडून त्या वेळी तिथे ऐकण्याचा अनुभव अवर्णनीयच होता. एका मोठ्या गवयाबरोबर जाणं आणि त्यांचं गाणं तिथे प्रत्यक्ष ऐकणं हेच मुळी मंतरल्यासारखं होतं.

पं. जसराजजींनी माझ्यावर प्रचंड किमया केली आहे. अनेक वर्षे मी त्यांच्या अनेक मैफिली ऐकत गेलो. कालांतराने मी माझ्या 'इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी'च्या कॉर्पोरेट विश्वात गेलो, पण माझ्या त्यांच्याबरोबर गाठीभेटी होत राहिल्या. अधून-मधून फोनही होत राहिले. मी त्यांच्या तिन्ही घरांमध्ये गेलेलो आहे. शिवाजी पार्कच्या घरात तर अनेकदा गेलो. परळला व्ही.शांतारामांचा 'राजकमल' स्टुडिओ होता. एकदा त्यांची पत्नी मधुरा यांना बरं नव्हतं, त्या वेळी त्यांना मी तिथे भेटायला गेलो होतो. तिथेही आमच्या खूप गप्पा झाल्या. मी आणि महाराष्ट्र टाइम्सचा अशोक जैन एकदा त्यांना भेटायला गेलो होतो. त्या वेळी तर त्यांनी आमच्याशी दोन-तीन तास गप्पा मारल्या होत्या. अंधेरी पश्चिमला त्यांचं तिसरं घर होतं, तिथेही मी गेलेलो आहे.

एकदा पार्ल्याला मॅजेस्टिक गप्पांमध्ये त्यांची मुलाखत घ्यायची होती. ती कोणी घ्यायची, अशी चर्चा चालली होती. अशोक कोठावळेनं मला 'अच्युत, तू घेशील का?' असं विचारल्यावर मी आनंदानं तयार झालो. आणि मॅजेस्टिक गप्पांमध्ये मी पंडितजींची मुलाखत घेतली होती. ती खूपच रंगली होती. मी त्यांना प्रश्न विचारायला लागलो की, 'बच्चमजी, थांब जरा तू... लहानपणापासून मी तुला ओळखतो.' असं म्हणून माझा प्रश्न थांबवून स्वत:च उत्तर द्यायला सुरुवात करायचे. खूप मजा आली.

मला स्वत:ला त्यांच्या गाण्यांमध्ये अतिशय गोडवा वाटतो. पं. जसराजजींमध्ये वेगळ्या तऱ्हेचं चैतन्य होतं. त्यांचा आवाज, त्यामधली ताकद, रागाची बढत करायची पद्धत, मधल्या श्रुतींना घेऊन जाणारी मिंड, दाणेदार गमकेच्या ताना हे सगळं काही औरच होतं. जेव्हा एखाद्या गवयानं गायलेला राग अनेक आठवडे किंवा अनेक महिने मनात ठाण मांडून बसतो, तेव्हाच तो कलाकार मला खूप भावतो आणि श्रेष्ठ



वाटतो. जसराजजींचे अनेक राग माझ्या मनात असेच रेंगाळत राहिले आहेत. त्यांचा बिलासखानी तोडी घ्या, त्यांचा नट घ्या... किंवा बिहाग घ्या– आणि असे अनेक.

फार कुणी गाणार नाही असे अनवट राग पंडितजी अप्रतिम तऱ्हेनं गायचे. गुंजी कानडा, धुलिया मल्हार, गौडगिरी मल्हार, चरजूका मल्हार, भैरव बहार, अबिरी तोडी, जयजयवंती तोडी, पटदीपिकी, खमाज बहार, नागध्वनी, नट नारायणी... असे किती राग सांगावेत? धुलिया मल्हारमध्ये सारंग आणि मल्हार यांचे सूर सापडतात. पहिल्या पावसाची चाहूल असताना हवेत धुळीची वावटळ असते, तेव्हाचं वातावरण या रागात आहे. काफी थाटातल्या चरजूका मल्हारमध्ये सिंदुरा आणि देसी यांची छाया दिसते. अर्थात त्यांची भजनं, लाईट म्युझिक हे सगळं होतंच. 'निरंजनी नारायणी' या भैरवीसाठी तर ते प्रसिद्धच आहेत. त्यांच्या दरबारीतली 'अजब तेरी दुनिया' आणि भैरवमधली 'मेरो अल्लाह मेहेरबान' या सूफी रचना मला प्रचंडच आवडायच्या.

त्यांनी जसरंगी नावाचा जुगलबंदीचा नवाच प्रकार निर्माण केला. त्यात एक गायक व एक गायिका दोन वेगवेगळे राग एकाच वेळी गातात आणि तरीही ते एकमेकांमध्ये मिसळून गेल्याचा विलक्षण अनुभव देतात. ही फारच अफलातून कल्पना जसराजजींची आहे. संजीव अभ्यंकर आणि अश्विनी भिडे–देशपांडे हा प्रकार सुंदरच गातात. त्यांच्या हरिप्रसाद चौरसिया आणि बालमुरलीकृष्ण यांच्याबरोबरच्या जुगलबंदी रचना सुंदर आहेतच, पण त्यांनी भीमसेनजींबरोबर गायलेली १९७२ च्या 'बिरबल माय ब्रदर' या सिनेमामधली मालकंस रागातली 'रंगरलिया करत सौतनसे' ही जुगलबंदी तर अप्रतिमच आहे!

आज पंडितजींच्या आठवणी मला एकदम दाटून आल्या. एकदा तर मुंबईचे तेव्हाचे म्युनिसिपल कमिशनर शरद काळे यांच्याकडे पंडितजींचा कार्यक्रम होता. त्या वेळी मी आणि माझी बायको शोभा त्यांना माझ्याच गाडीतून घेऊन जात होतो. जाताना माहिमच्या जंक्शनपाशी आमच्या गाडीला एका टॅक्सीनं थोडासा धक्का मारला आणि मी गाडी थांबवली. त्या वेळी मी 'जाऊ दे, कुठे वाद घालणार' असा विचार केला; पण आश्चर्य म्हणजे, पंडितजी गाडीतून खाली उतरले आणि माझ्या वतीनं त्या टॅक्सीवाल्याशी भांडायला लागले! आम्हालाच इतकं ओशाळल्यासारखं झालं होतं. नंतर मैफिलीत गाताना थोड्या वेळापूर्वी झालेल्या भांडणाचा आणि मनस्तापाचा त्यांच्या चेहऱ्यावर मागमूसही नव्हता! तेही गाणं अर्थातच अप्रतिम झालं. तेव्हा त्या माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची मला फार कमाल वाटली. माझ्यावर त्यांचं खूपच प्रेम होतं. त्या माणसानं मला, सगळ्या महाराष्ट्राला, सगळ्या जगाला प्रचंड आनंद दिला.

पंडितजी मला प्रेमानं खूप गोष्टी सांगायचे. न्यूयॉर्कमध्ये तिथल्या एका हॉलला आपलं कसं नाव दिलंय, एका उपग्रहाला आपलं नाव कसं दिलंय (हा मान यापूर्वी फक्त केसरबाई केरकर यांना चॅलेंजर या यानामध्ये जतन करून ठेवलेल्या त्यांच्या 'जात कहाँ हो' या भैरवीच्या रूपानं मिळाला होता.) याचा पंडितजींना खूप अभिमान वाटायचा.

त्यांच्या मैफिलींना प्रत्यक्ष जायला ज्यांना शक्य व्हायचं नाही, अशा आपल्या चाहत्यांकडे ते स्वत: गेल्याचं मी ऐकलं होतं. एक लहान मुलगा त्यांचा खूप मोठा चाहता होता. पण दुर्दैवानं तो मुका आणि अपंग होता. त्याला बसताही यायचं नाही. पण जसराजांचं गाणं तो मोठ्या भक्तीनं ऐकायचा. हे सांगणारं एक पत्र एकदा जसराजांकडे आलं. त्यानंतर काहीच दिवसांनी त्या मुलाच्या दारावरची बेल वाजली. दार उघडलं तर समोर साक्षात पंडित जसराज उभे! त्या मुलाची विचारपूस करून त्यांनी त्याला चक्क दोन राग आणि त्याच्या आवडीचं 'माता कालिका' हे भजन ऐकवलं! अर्थातच तो मुलगा प्रचंडच भारावून गेला होता. त्याला बोलता येत नव्हतं. त्यामुळे त्यानं काही बोलायचा प्रश्नच नव्हता; पण त्याच्या डोळ्यांतले आनंदाश्रू थांबत नव्हते. अशा सच्च्या श्रोत्यांना गाणं ऐकवण्यात गायकाला खूप समाधान मिळतं, असं जसराजांना कायम वाटायचं. हा प्रसंगही त्यांनी स्वत:च मला सांगितला होता. त्यांनी सांगितलेल्या त्या गोष्टी आणि ते क्षण मी कधीही विसरू शकणार नाही.

आज मला अतिशय मोठी पोकळी जाणवतेय. खरोखरच एका युगाचा अंत झालाय, असं मला वाटतंय. भीमसेनजी, कुमारजी, किशोरीजी आणि जसराजजी यांनी माझ्या सोलापूरच्या दिवसांपासून ते अगदी काल–परवापर्यंत जी अनेक दशकं गाजवली, ती सगळी दशकं अक्षरशः एका क्षणार्धात माझ्या डोळ्यांसमोरून गेली. डोळे पाणावले. मला राहवलं नाही, म्हणून हे सगळं मी सांगतोय. माझी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

अच्युत गोडबोले, मुंबई
achyut.godbole@gmail.com / Mob.9820030600

चिनी महासत्तेचा उदय : २८

सतीश बागल

कायद्याचे राज्य आणि चिनी वैशिष्ट्ये असणारी लोकशाही

कायद्याचे राज्य या पाश्चात्त्य संकल्पनेचा अर्थ असा की, व्यक्तीचे वर्तन नियमित करावयाचे असल्यास ते काटेकोरपणे कायद्यानुसारच नियमित केले पाहिजे. कायद्यानुसार जी बंधने आहेत, ती नागरिकाने पाळली पाहिजेत; मात्र इतर बाबतींत त्याच्या पद्धतीने वागण्याचे स्वातंत्र्य त्याला असले पाहिजे. पाश्चात्त्य देशांत व समाजात वैयक्तिक स्वातंत्र्य महत्त्वाचे असल्याने कायदा सरकारपासून व्यक्तीचे रक्षण करतो. तसेच गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीला गुन्हेगार म्हणून सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणेवर असते. न्यायालयीन प्रक्रिया, निकाल देण्याची प्रक्रिया, शिक्षा देणे इत्यादी सर्व औपचारिकपणे व कायद्यानुसारच झाले पाहिजे, असा आग्रह असतो. हेबिअस कॉर्प्ससारखी मूलभूत संकल्पना सामान्य माणसाचे सरकारी संस्थांपासून रक्षण करते. चीनमध्ये असे नाही. तिथे वैयक्तिक स्वातंत्र्याची संकल्पना नाही. त्यामुळे चीनमध्ये सरकारने नागरिकाचे वर्तन कशाही पद्धतीने नियमित करण्यास हरकत नाही, असे समजले जाते.

क्षी जिनपिंग यांनी भविष्यातील चीनचे स्वप्न रेखाटले असून, त्यानुसार वैभवशाली चीन साकार करण्यासाठी अजेंडा तयार केला आहे. हा अजेंडा ते कसा राबवीत आहेत आणि त्याचे चीनवर व जगावर काय परिणाम होत आहेत, हे आपण गेल्या काही लेखांतून पाहत आहोत. त्यांच्या अजेंड्यावर कायद्याचे राज्य ही महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. चीनमध्ये कायद्याचे राज्य आणण्यासाठी ते काय करीत आहेत, हे पाहण्यापूर्वी चीनमधील कायद्याचे राज्य या संकल्पनेचा अर्थ समजून घेतला पाहिजे.

फ्रान्सिस फुकुयामा यांनी अलीकडे जगातील अनेक देशांमध्ये राजकीय संस्था कशा निर्माण झाल्या, उत्क्रांत झाल्या याचा अर्थपूर्ण वेध घेतला आहे. त्याचप्रमाणे चिनी प्रशासनाचे अभ्यासक मिन्क्सीन पे, कार्ल मिंझ्नर आणि इतरांनी चीनमधील कायद्याचे राज्य आणि भ्रष्टाचार याबद्दल महत्त्वाचे लिखाण केले आहे. आधुनिक राज्यसंस्थांच्या इतिहासामध्ये त्यांच्या निर्मितीत व उत्क्रांतीत प्राचीन व मध्ययुगीन काळात विविध संस्थांमध्ये सत्ता विभागणी कशी होती, याला फार महत्त्व आहे. युरोपमध्ये (आणि इतरत्रही) राजांच्या आणि सम्राटांच्या सत्तेला मर्यादा असत. कारण प्रत्यक्षात धर्मसंस्था (चर्च), प्रादेशिक सरदार, सरंजामशहा हेही सत्तेत महत्त्वाचे वाटेकरी होते. अशा रीतीने विभागणी झालेल्या सत्तेचे संतुलन आणि नियमन करणाऱ्या व्यवस्थेतूनच पुढे लोकशाही व लोकशाहीच्या संस्था, विधी मंडळ, सरकार, स्थानिक सरकारे, न्याय संस्था इत्यादी निर्माण झाल्या. चीनमध्ये अशी परिस्थिती नव्हती. चीनभर विस्तारलेल्या साम्राज्यात प्रादेशिक सरदार होते, मात्र ते केंद्रीय सम्राटांचे प्रतिनिधी/एजंट म्हणून काम पाहत. शिवाय चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला, तरी धर्म संस्था स्वतंत्र आणि शक्तिशाली नव्हती. सत्ताविभागणी नसल्याने केंद्रीय सम्राटांची सत्ता अनिर्बंध असे. प्राचीन काळापासून चीनमध्ये कार्यक्षम नोकरशाही होती. परीक्षा घेऊन सनदी अधिकारी नेमण्याची, त्यांची बदली करण्याची व नोकरशाहीवर नियंत्रण ठेवण्याची पद्धत असे. प्रश्न असे असत की– इतक्या मोठ्या साम्राज्यामध्ये स्थानिक नोकरशहा व सनदी अधिकाऱ्यांवर नियंत्रण कसे ठेवायचे? स्थानिक नोकरशहा

जनतेवर जुलूम करीत नाहीत याची खातरजमा कशी करायची? आणि केंद्राची सत्ता अबाधित कशी ठेवायची? सत्ता कशी राबवायची याहीपेक्षा स्थानिक अधिकाऱ्यांच्या मनमानीला लगाम कसा घालायचा, हाही प्रश्न असे. हा प्रश्न चीनमध्ये इतर देशांच्या तुलनेने अधिक बिकट होता. अनेक देशांमध्ये छोटे-मोठे कायदे धर्मसंहितेतून आले. कायद्यांना परंपरेने धर्माचे अधिष्ठान असल्याने व त्याची अंमलबजावणी समाजातील शक्तिशाली गटच करीत असल्याने कायद्याचे राज्य ही संकल्पना थोडी फार तरी अस्तित्वात होती. चीनमध्ये असा सर्वव्यापी प्रभावशाली धर्म नसल्याने राजकीय सत्तेचे मोठे केंद्रीकरण त्या-त्या काळातील राजसत्तेकडे झाले होते. नोकरशहाच हे कायदे राबवीत असत. त्यामुळे कायद्याचे राज्य ही संकल्पना तपशीलवारपणे पाश्चात्त्य देशांत जशी विकसित झाली, तशी ती चीनमध्ये झाली नाही.

चिंग साम्राज्य संपुष्टात येऊन सन येत सन यांचे रिपब्लिक १९११ मध्ये आले. चीनमध्ये महत्त्वाच्या कायदेविषयक सुधारणा १९२९ मध्ये आल्या. गंमत म्हणजे, या काळातही सरकारमध्ये कुओमिंगटांगची एकपक्षीय राजवट होती आणि या पक्षाची रचना (कम्युनिस्ट पक्षाप्रमाणेच) रशियातील लेनिनिस्ट पक्षाच्या धर्तीवर झाली होती. सन १९२९ मधील कायदेविषयक सुधारणांत प्रथमच नागरिकांच्या हक्कांबाबत विचार होता; संपत्तीवरील खासगी मालकी हक्क, व्यापार-उदिमासाठी असणारे कायदे, कॉंट्रॅक्ट ॲक्ट याशिवाय प्रथमच स्त्रियांच्या हक्कांबाबत विचार होता.

माओंनी १९४९ च्या कम्युनिस्ट क्रांतीनंतर कुओमिंगटांग काळात विकसित झालेली न्यायव्यवस्था (जस्टिस सिस्टीम) न्यायाधीशांसह मोडीत काढली. खासगी संपत्तीचा मालकी हक्क, नागरिकांचे हक्क इत्यादी इतिहासजमा झाले. माओंच्या काळात न्यायालयांमध्ये लष्करी अधिकारीच न्यायदानाचे काम करीत. ही न्यायालये कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणाखाली असत. माओंनी सुरुवातीला सोव्हिएत युनियनच्या धर्तीवर न्यायदानविषयक संस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु ग्रेट लीप फॉरवर्ड व नंतर सांस्कृतिक क्रांती यांच्या हिंसक गोंधळात त्यांना अपयश आले.

डेंग १९७८ मध्ये सत्तेवर आल्यानंतर राज्यघटना, न्यायालयीन व्यवस्था, न्यायदानपद्धती यावर विचार होऊन

चीनचे सर्वोच्च न्यायालय सुप्रीम कोर्ट

जर्मनी व जपानमधील न्यायव्यवस्थांचा अभ्यास करून न्यायदानविषयक संस्था उभारणीस सुरुवात झाली. अर्थव्यवस्था खुली करून परदेशातून खासगी गुंतवणुका आकर्षित करण्यासाठी काही प्रमाणात पाश्चात्त्य देशांप्रमाणे कायदे असणे आवश्यक होते. त्या दृष्टीने १९८० च्या दशकात अनेक कायदे करण्यात आले, राज्यघटनाही तयार करण्यात आली. सामुदायिक शेती व कम्युन्स १९८० पासून बंद करून शेतकऱ्यांना कंत्राटी तत्त्वावर जमिनी देण्यात आल्या. ग्रामीण भागातील राजकीय व्यवस्था कम्युन्सशी निगडित होती. आता कम्युन्सच बंद झाल्याने ग्रामीण भागातील निवडणुकांसह नवी राजकीय व्यवस्था अस्तित्वात आली. चीन हा अवाढव्य देश आहे. सरकारी अधिकारी, पक्षाचे पदाधिकारी व इतर उच्च पदस्थ हे सत्तेचा गैरवापर तर करीत नाहीत; पक्षाला अडचणीत तर आणत नाहीत आणि सामान्य लोक पक्षापासून दूर तर जाणार नाहीत– ही भीती वरिष्ठ पक्षनेतृत्वाला असते. त्यामुळे लोकांना फार मोठे अधिकार न देताही त्यांचे स्थानिक अधिकाऱ्यांपासून रक्षण करण्यासाठी व पक्षाला/सरकारला फीडबॅक मिळविण्यासाठी अशी संस्थात्मक न्यायिक चौकट असणे आवश्यक होते. लोकशाही व्यवस्था आणणे, हे पक्षाचे धोरण कधीच नव्हते.

न्यायदानासाठी स्वतंत्र प्रोसिजर्स व कोड्स असावीत, असेही डेंग यांना वाटे; कारण त्यामार्फतच सत्तेचा दुरुपयोग टाळला जाऊ शकत होता. सन १९७८, १९८२, १९८८, १९९३, १९९९ आणि २००४ या वर्षांमध्ये नवी राज्यघटना आणि काही महत्त्वाच्या सांविधानिक (constitutional) सुधारणा करण्यात आल्या. वाढता व्यापार, खुली/बाजारचलित अर्थव्यवस्था यांना चालना देणाऱ्या, परदेशी गुंतवणुकांना संरक्षण देणाऱ्या, चीनमधील लोकांना खासगी मालमत्तेचा (मर्यादित प्रमाणात का होईना) अधिकार देणाऱ्या, जमिनी हस्तांतरित करण्याचे हक्क देणाऱ्या अशा अनेक महत्त्वाच्या कायदेविषयक तरतुदी यात होत्या. १९९२ मध्ये तर पक्षाकडील काही अधिकारांचे सरकारकडे प्रत्यायोजन (डेलिगेशन) करण्याच्या तरतुदी होत्या. यात मेख अशी होती की– नॅशनल पीपल्स काँग्रेस, खुद्द राज्यघटना आणि सरकार या साऱ्या संस्थांपेक्षा पक्ष श्रेष्ठ होता! वर–वर पाहता, या लोकशाही संस्था स्वतंत्र वाटल्या तरी प्रत्यक्षात त्या तशा नव्हत्या. तरीही त्यात मोठी सुधारणा होती, आशेची किरणे होती.

तियानमेच्या प्रकरणानंतर १९८९ मध्ये मोठे अटकसत्र सुरू झाले होते आणि अनेकांना पोलीस कारवाईस सामोरे जावे लागले. शहरी भागात तरुण विद्यार्थ्यांमध्ये व विचारवंतांमध्ये सरकारविरोधात मोठा असंतोष निर्माण झाला होता, खुली अर्थव्यवस्था व पाश्चात्त्य देशांविरोधात वातावरण तयार झाले; तरीही कायद्यातील सुधारणांना पक्षाने विरोध केला नाही. उलट, त्याच वर्षात कायद्यात महत्त्वाची सुधारणा करून सरकारी अधिकाऱ्याकडून/सरकारकडून काही अन्याय्य कारवाई झाली असेल, त्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याची तरतूद करण्यात आली. त्यानंतर चिनी न्यायालये काही प्रकरणी सरकारविरोधात निकाल देऊ लागली. पक्षाची घोषणाच मुळी कायद्याचे राज्य अशी १९९७ मध्ये झाली. सरकार–विरोधातील प्रकरणांची संख्याही २००१ पर्यंत वाढली. याच वेळेला उद्योगपती/व्यापारी यांना पक्षात प्रवेस दिला जाऊ लागला. खासगी वकील व बार असोसिएशनसारख्या संस्थाही आल्या. त्यापूर्वी कम्युनिस्ट चीनमध्ये वकील सरकारीच असत.

कायद्यात १९९० च्या दशकात माफक सुधारणा होत असताना वर्तमानपत्रे, टीव्ही व कमर्शियल मीडिया यांचे प्रस्थ वाढत होते. त्यामुळे वॉचडॉग जर्नालिझम किंवा Yulun Jiandu ही संकल्पनाही जोर धरू लागली. सरकारी अधिकारी वा सरकारी संस्थांकडून सत्तेचा दुरुपयोग होत असेल, सामान्य माणसाला जाच होत असेल, तर अशी प्रकरणे वर्तमानपत्रे वा टीव्हीसारख्या माध्यमांतून नजरेस यावीत, म्हणजे पक्षाकडून व सरकारकडून काही कार्यवाही होऊ शकते. लोकशाही आणून लोकांना सत्तेत सामील करून घेण्यापेक्षा हे बरे, असे पक्षाला वाटत असे. त्या काळात चीनमध्ये (विरोधी पक्षच नसल्याने) इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नालिझमला सरकारकडूनच प्रोत्साहन मिळत असे. सीसीटीव्ही या प्रसिद्ध टीव्हीवर फोकस इंटरव्ह्यूसारख्या कार्यक्रमांत खुद्द पंतप्रधान झू रोंगजी हजेरी लावीत. अशाच पद्धतीने पक्षांतर्गत लोकशाही व पक्षाच्या शुद्धीकरणासाठीही कार्यक्रम असत. कायद्यातील सुधारणा व मर्यादित बाबीतील जागृत माध्यमे यामुळे बेकायदारीत्या शेतकऱ्यांच्या जमिनी जप्त करणे वा सामान्य माणसाच्या मालमत्ता–घरे ताब्यात घेणे अशी प्रकरणे न्यायालयात धसास लागू लागली, त्यांना माध्यमातून प्रसिद्धी मिळू लागली आणि न्यायाधीशही स्वतःचे काम गंभीरपणे घेऊ

लागले. वकिलांनी २००३ मध्ये एकत्र येऊन ओपन कॉन्स्टिट्युशन इनिशिएटिव्ह ही चळवळ सुरू केली. ज्या राज्यातून त्याच्या शाखा सुरू झाल्या.

कायद्याचे राज्य ही संकल्पना, त्यातून सरकारवर वाढणारे दडपण या बाबी २००३ नंतर मात्र पक्षाला व सरकारला अडचणीच्या वाटू लागल्या. सरकारचा कायदेविषयक सुधारणा करण्याचा उत्साह मावळला. न्यायालये, संपादकमंडळी, वकील व न्यायाधीश यांना खडसावले जाऊ लागले. हळूहळू सरकार व पक्षाची दडपशाही सुरू झाली. कायदेविषयक व न्यायालयीन सुधारणांची गाडी रुळावरून घसरली. हु जिंताव यांच्या कारकिर्दीच्या दुसऱ्या सत्रात २००८ नंतर तिबेट आणि झिंजियांगमधील उठाव, वकिलांच्या संघटना आणि सिव्हिल सोसायटीच्या चळवळी, त्यांना इंटरनेट व समाजमाध्यमातून मिळणारे पाठबळ यामुळे सरकार जेरीस आले. पुढे पक्ष व सरकारमधील उच्च पदस्थांच्या भ्रष्टाचाराची माहिती उघड होऊ लागली व वातावरण तापू लागले. सरकारची दडपशाही जितकी जास्त तितकी निदर्शने व लोकांचा विरोधही अधिक हिंसक होऊ लागला. सरकारवर दबाव टाकण्यासाठी सामूहिक आत्महत्येचे प्रयत्न, बैठे सत्याग्रह, स्थानिक अधिकाऱ्यांविरुद्ध झगडे, दंगल असे प्रकार सुरू झाले. रुग्णांवरील उपचारांत झालेला हलगर्जीपणा वा रुग्णाचा मृत्यू यामुळे डॉक्टरांना मारहाणीचे प्रकार होत असत. अशा प्रकरणांची संख्या १९९४ मध्ये १०,००० होती, ती २००८ मध्ये १,२०,००० झाली. पुढे सरकारने ही आकडेवारी देणेच बंद केले. चीनमध्ये कायदा-सुव्यवस्था आणि अंतर्गत सुरक्षाविषयक प्रश्न निर्माण होऊ लागले. कायद्याचा वापर न करताच पोलीस व सरकार दंडेली करू लागले. सरकारला त्रासदायक ठरणाऱ्या व्यक्ती गायब होणे, पोलीस कस्टडीत मृत्यू हे प्रकार वाढीस लागले. कोणत्याही प्रकरणात सरकारने माहिती दडपण्याचा प्रयत्न केला की, वस्तुस्थिती बाहेर येई- व्हायरल होई. सरकारने परत दडपेगिरी करावी आणि प्रकरण तापावे, असा खेळ होऊ लागला. पुढे २०११ मध्ये ओपन कॉन्स्टिट्युशन इनिशिएटिव्हवर बंदी आली. वकिलांना त्रास देणे सुरू केले. समाज माध्यमांवर बंधने आली. पक्षातही गटबाजी सुरू झाली. क्षी जिनपिंग २०१३ मध्ये सत्तेवर आले, तेव्हा चीनमध्ये कायद्याचे राज्य असे होते.

जिनपिंग यांना त्यांच्या पूर्वीच्या नेत्यांप्रमाणेच पाश्चात्त्य पद्धतीची लोकशाही नको आहे. चीनमधील राजवट व कम्युनिस्ट पक्ष त्यामुळे कमकुवत होईल, अशी भीती त्यांना वाटते. परंतु, तरीही कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांना किमान कायदेविषयक व न्यायालयीन सुधारणा हव्या आहेत. चीनमधील कायदे हे अनेक बाबतींत एकतर्फी तर आहेतच, परंतु ते चिनी राष्ट्रवादाच्या व एक पक्षीय राज्यव्यवस्थेच्या संदर्भात खूप जाचक ठरतात. क्षी यांना कायद्यात व न्यायालयीन व्यवस्थेत काही सकारात्मक बदल करायचे आहेत. न्यायालयाच्या कामकाजाच्या पद्धती घालून देणे, त्या सुटसुटीत करणे, वकील व न्यायाधीश यांना खास प्रशिक्षण देणे आणि सामान्य माणसालाही दाद मागण्यासाठी कमी खर्चात व सहजरीत्या न्यायालयात जाता येईल अशी व्यवस्था निर्माण करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. असे असले तरी सरकार, पक्ष व सरकारी यंत्रणेच्या विरुद्ध जाऊन न्यायालयात दाद मागणे चीनमध्ये आजही फार अवघड आहे. चिनी कायदे आणि त्यांची अंमलबजावणी या साऱ्या बाबतीत न्यायालयाची भूमिका कडक असते. भ्रष्टाचार व काही गंभीर गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाची शिक्षा मोठ्या प्रमाणावर दिली जाते. मात्र अलीकडे अशा रीतीने खालच्या न्यायालयात फाशीची शिक्षा दिलेल्या अनेक लोकांच्या बाबतीत वरिष्ठ न्यायालयाने हस्तक्षेप करून त्या शिक्षा सौम्य केल्या. न्यायालयीन सुधारणा, कायद्याचे-घटनेचे राज्य याची मागणी करणाऱ्या आणि त्यासाठी आग्रही राहणाऱ्या विचारवंतांना, बुद्धिमंतांना व वकिलांना मात्र सरकारकडून चांगली वागणूक मिळत नाही. असे काम करणाऱ्या झु झियांग यांसारख्या विचारवंतांना सरकारकडून बराच त्रास देण्यात आला.

क्षी यांच्या कार्यकाळात सुरुवातीला झाऊ चिआंग यांना चीनमधील न्यायसंस्थेचे प्रमुख केले गेले. न्याय व कायद्याची पार्श्वभूमी असणारे आणि कायद्याचे शिक्षण झालेले हे पहिलेच उच्चपदस्थ नेते/अधिकारी असल्याने अनेकांना त्यांच्याबद्दल खूप अपेक्षा होत्या. हुनान प्रांतात पक्षसचिव व गव्हर्नर असल्यापासून ते राज्यघटना व कायद्याचे राज्य ही संकल्पना मांडीत असत. राज्य सरकारच्या प्रभावापासून न्यायालये दूर राहण्यासाठी केंद्र सरकारने काही उपाययोजना मात्र केल्या आहेत. कम्युनिस्ट पक्षाकडून एखाद्या प्रकरणी न्यायदानप्रक्रियेत ढवळाढवळ झाल्यास त्याची नोंद घेऊन, त्याचा विचार करून निर्णय द्यावा, अशाही उपययोजना आहेत. पूर्वी कनिष्ठ न्यायालये

राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली असत. आता त्यात बदल करून त्यांना प्रादेशिक उच्च न्यायालये आणि केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली आणण्यात येत आहे. महत्त्वाचे म्हणजे, सर्वच न्यायिक अधिकारी व न्यायाधीश हे कायद्याच्या दृष्टीने शिक्षित असावेत, यासाठी न्यायाधीश व अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. आत्तापर्यंत चीनमध्ये या बाबीकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले असून, न्यायिक अधिकारी हे अनेकदा केवळ पूर्वीचे पोलीस अधिकारी वा सनदी नोकर असत. याचा विचार करू जाता, न्यायदानाच्या क्षेत्रात क्षी यांच्या कालखंडात थोडी संस्थात्मक सुधारणा होताना दिसते. असे असले, तरी या सुधारणांच्या मर्यादा लक्षात घ्यावयास हव्यात.

कायद्याचे राज्य या पाश्चात्त्य संकल्पनेचा अर्थ असा की, व्यक्तीचे वर्तन नियमित करावयाचे असल्यास ते काटेकोरपणे कायद्यानुसारच नियमित केले पाहिजे. कायद्यानुसार जी बंधने आहेत, ती नागरिकाने पाळली पाहिजेत; मात्र इतर बाबतींत त्याच्या पद्धतीने वागण्याचे स्वातंत्र्य त्याला असले पाहिजे. पाश्चात्त्य देशांत व समाजात वैयक्तिक स्वातंत्र्य महत्त्वाचे असल्याने कायदा सरकारपासून व्यक्तीचे रक्षण करतो. तसेच गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीला गुन्हेगार म्हणून सिद्ध करण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणेवर असते. न्यायालयीन प्रक्रिया, निकाल देण्याची प्रक्रिया, शिक्षा देणे इत्यादी सर्व औपचारिकपणे व कायद्यानुसारच झाले पाहिजे, असा आग्रह असतो. हेबिअस कॉर्पससारखी मूलभूत संकल्पना सामान्य माणसाचे सरकारी संस्थांपासून रक्षण करते. चीनमध्ये असे नाही. तिथे वैयक्तिक स्वातंत्र्याची संकल्पना नाही. त्यामुळे चीनमध्ये सरकारने नागरिकाचे वर्तन कशाही पद्धतीने नियमित करण्यास हरकत नाही, असे समजले जाते. मात्र, असे करताना ते एका ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार (प्रोसिजर/कोड) करावे, एवढीच अपेक्षा असते. असा कायदा व्यक्तीचे सरकारपासून संरक्षण करीत नाही; फक्त ती कारवाई एका विशिष्ट/विहीत पद्धतीने करावी, असे बंधन सरकारवर घालतो. पाश्चिमात्य लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्य पवित्र मानले जाते, चीनमध्ये तसे नाही. संकल्पनांमधील या फरकामुळे चीनमध्ये असा कायदा लोकशाहीचा आधार होऊ शकत नाही. चीनमध्ये सरकार वा पक्ष विरोधात बोलणे, मत व्यक्त करणे, सरकारच्या धोरणाविरुद्ध मत व्यक्त करणे, राजकीय नेत्यांवर टीका करणे या साऱ्यांसाठी तुरुंगात जावे लागते. अनेकदा हे खटले इन-कॅमेरा चालविले जातात. त्यामुळे कायद्याचे राज्य ही संकल्पना सरकारची सत्ता अधिक मजबूत करण्यासाठी व सरकारची दडपेगिरी अधिक तीव्र करण्यासाठी वापरली जाते की काय, अशी शंका यायला लागते. एका बाजूला कम्युनिस्ट पक्षाचे पूर्ण वर्चस्व असणारी जाचक राजकीय व्यवस्था, तर दुसऱ्या बाजूला नागरिकाच्या स्वातंत्र्याचा संकोच करू पाहणारे कायद्याचे राज्य- अशा कचाट्यात क्षी जिनपिंग यांचा चीन सापडलेला दिसतो. चिनी फौजदारी कायद्याप्रमाणे सामान्य माणसावर नजर ठेवली जाऊ शकते. जिनपिंग यांनी आता हाँगकाँगवरही हुकूमत गाजवायला सुरुवात केली आहे. वास्तविक पाहता, हाँगकाँगसाठी वेगळी राज्यघटना आहे. हाँगकाँगमधील व्यक्तींना चीनमध्ये गुन्हेगार ठरवून चीनमध्ये पाठविण्यासाठी एक्स्ट्राडिक्शन कायदा पास करून घेण्याच्या खटपटीत क्षी आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य व अभिव्यक्तिस्वातंत्र्याबाबत ही वस्तुस्थिती असली तरीही कंपन्या, वाणिज्यविषयक आणि अर्थविषयक कायद्यात परदेशी कंपन्या व स्वदेशी कंपन्या यांच्यात फार भेद केला जात नाही. कायद्यांच्या अंमलबजावणीत बाहेरील कंपन्या नियमबाह्य वर्तन करताना आढळल्यास त्यांची गय केली जात नाही.

कायद्याच्या राज्यासाठी क्षी जिनपिंग काही उपाययोजना करीत असतानाच, जुलै २०१५ मध्ये मानवी अधिकारांच्या उल्लंघनाच्या अनेक प्रकरणांत वकिलांच्या विरोधात सरकारने कडक कारवाई सुरू केली. या मोहिमेत ३०० हून अधिक ह्युमन राईट्स पुरस्कर्त्या वकिलांना धाडी घालून अटक करण्यात आली. बीजिंगमधील फेनग्रुई या लॉ फर्मच्या ३८ वकिलांना अटक झाली. यावरून स्थानिक सरकारे व पक्ष या प्रश्नाला किती व कशी किमत देतात, हेच दिसते. या वकिलांचे खटलेही इन-कॅमेरा चालविले गेले. त्यांना त्यांच्या नातेवाईकांनाही भेटू दिले नाही. एका वर्षानंतर ऑगस्ट २०१६ मध्ये हे सर्व वकील सरकारी टीव्हीवर दिसले, ते केवळ त्यांनी न केलेल्या गुन्ह्याची कबुली देण्यासाठी! त्यांनी अशीही कबुली दिली की, हे सारे पाश्चात्त्य देशांतील वार्ताहरांनी त्यांना करावयास लावले. तसेच याचा उद्देश कम्युनिस्ट पक्षाची सत्ता उखडून टाकणे हाच होता. बीजिंगमधील फेनग्रुई फर्मचे प्रमुख वकील झाऊ शिफेंग यांना सात वर्षांची शिक्षा झाली. त्यांनी शेवटी क्षी जिनपिंग यांचे आभार मानले आणि त्यांच्यामुळे कायद्याचे राज्य चीनमध्ये आले, अशी वक्रोक्त पुष्टीही जोडली.

प्रशिक्षित न्यायिक अधिकारी तयार करणे, कायदेविषयक प्रशिक्षण देणे, न्यायालये व न्यायिक अधिकाऱ्यांची संख्या वाढवून न्यायालयातील विलंब कमी करणे, न्यायदानाची प्रक्रिया सामान्य माणसाला कमी खर्चात उपलब्ध करून देणे– इत्यादी बाबी क्षी प्रत्यक्षात आणत आहेत. त्या दृष्टीने कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांचे सरकार प्रयत्न करीत आहे, ही जमेची बाजू. मात्र सामान्य माणसाचे–नागरिकाचे स्वातंत्र्य जपणे, सरकारी संस्थांकडून त्याच्या स्वातंत्र्यावर होणारे आक्रमण रोखणे हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत कायद्याचे राज्य या संकल्पनेला अर्थ नाही, हे समजून घेतले पाहिजे.

क्षी यांच्या कायदेविषयक सुधारणांमुळे पक्षाचे समाजावरील आणि सामान्य माणसावरील नियंत्रण अधिक प्रभावी होत आहे. ज्या देशात सरकारच्या अनिर्बंध सत्तेपासून सामान्य माणसाचे संरक्षण करण्याची मुळात संकल्पना नाही, तिथे असे कायदे सामान्य माणसाला त्रास देऊ पाहणाऱ्या सरकारला अप्रत्यक्षपणे टॉर्चरची प्रोसिजर घालून देऊन अधिक अत्याचार करण्यास प्रवृत्त करू शकतील. त्यामुळे माणसांना तुरुंगात वर्षानुवर्षे ठेवणे, व्यक्ती गायब होणे, माणसावर कायद्याने नजर ठेवणे– असे प्रकार चीनमध्ये होतात. अलीकडच्या काळात तर राजकीय व तत्सम गुन्ह्यांसाठी अटक केलेल्या वा केवळ तपास चालू असणाऱ्या व्यक्ती टीव्हीवर येऊन आपल्या गुन्ह्याची कबुली देतात.

चीनमध्ये पाश्चात्त्य धर्तीची लोकशाही असावी, अशी एक मागणी नेहमीच करण्यात येत असे. चीनमध्ये १९७८ ते १९८९ पर्यंत थोडे उदारमतवादी विचारवंत असल्याने त्यांच्यापुढे पाश्चात्त्य पद्धतीच्या लोकशाहीचा आदर्श असे. मात्र १९८९ मधील तिआनमेन प्रकरणापासून पक्षातील उदारमतवादी विचारवंत जवळजवळ नाहीसे झाले आणि सरकार व पक्षाबाहेर असलेले उदारमतवादी विचारवंत प्रभावहीन झाले. जसजशी सुबत्ता वाढू लागली व पाश्चात्त्य देशांच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या, तसतसा पाश्चात्त्य देशांच्या संस्थांबाबत पुनर्विचार विचार होऊ लागला. पाश्चात्त्य देशांना स्वत:चे अनेक प्रश्न पाश्चिमात्य लोकशाही चौकटीत सोडविता आलेले नाहीत. त्यामुळे चीनमध्ये पाश्चात्त्य पद्धतीच्या लोकशाहीपेक्षाही चिनी वैशिष्ट्ये असणारी आणि चिनी परंपरा व संस्कृती यांच्याशी सुसंगत अशी लोकशाही असावी, या विचाराने चांगलेच मूळ धरले आहे. लोकशाहीमध्ये सरकार चालविण्यात लोकांचा सहभाग असावा, ही प्रमुख संकल्पना आहे. मात्र त्यासाठी आवश्यक असणारी संस्थात्मक रचनाही महत्त्वाची आहे.

चीनमधील कोर्टाचे कामकाज

निवडणुका, मतदानाचा अधिकार, इतर पक्षांचे अस्तित्व, त्यांचे स्वातंत्र्य, शासनसंस्थेकडून सत्तेचा होणारा दुरुपयोग टाळण्यासाठी नागरिकाला न्यायसंस्थेकडून दिले जाणारे संरक्षण या बाबीही महत्त्वाच्या आहेत. याशिवाय इतर बिनसरकारी संस्था, स्वतंत्र माध्यमे, वर्तमानपत्रे लोकशाहीसाठी आवश्यक असतात. या व अशा बाबी चिनी परंपरेत वा इतिहासात नसल्याने चिनी परंपरेच्या फ्रेमवर्कमध्ये लोकशाही कशी आणायची, या मुद्यावर चीनमधील बुद्धिमंतांमध्ये बराच गोंधळ आहे.

जियांग झेमिन यांच्या काळापासून पक्षाने कन्फ़्युशिअसच्या पारंपरिक तत्त्वज्ञानाचे पुनरुजीवन केले; त्याला सामजिक मान्यता दिली. प्रत्येक व्यक्ती कुटुंबात, समाजात व अनेक संस्थांमध्ये कार्यरत असते आणि देशाची नागरिकही असते. अनेक संस्थांची कर्तव्ये पार पाडावी लागल्याने या कर्तव्यांमध्ये व भूमिकांमध्ये सामंजस्य व संवाद असावा लागतो. केवळ अधिकार व स्वातंत्र्य याचा विचार न करता कर्तव्ये व जबाबदाऱ्या समजून घेणे आवश्यक आहे, असे कन्फ़्युशिअसचे सामंजस्याचे व सामाजिक सुसंवादाचे तत्त्वज्ञान सांगते. लिखित कायद्यापेक्षा चारित्र्य महत्त्वाचे, असे कन्फ़्युशिअस म्हणतो. कन्फ़्युशिअसचे पुनरुजीवन हे राज्यकर्त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे; कारण त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य, मूलभूत अधिकार, मतदानाचा अधिकार या संकल्पना डोके वर काढू शकत नाहीत.

क्षी जिनपिंग यांनी लोकशाही, सिव्हिल सोसायटी, मानवाधिकार आणि इतर उदारमतवादी संकल्पनांबाबत पूर्वीच्या नेत्यांपेक्षा जास्त नकारात्मक व स्वातंत्र्याचा संकोच करणारी भूमिका घेतली आहे. त्यांनी २०१४ मध्ये प्रसृत केलेल्या डॉक्युमेंट ९ नुसार पाश्चिमात्य लोकशाही, त्यांच्या विविध संस्था व मल्टी पार्टी सिस्टीम यावर बोलणे, मानवी हक्क वा सिव्हिल सोसायटी यांचा आग्रह धरणे हे योग्य समजले जात नाही. उदारमतवादी विचारसरणी आणि माध्यमस्वातंत्र्य देशाला कमकुवत करतात, असे समजले जाते. कम्युनिस्ट पक्षाच्या इतिहासाला विरोध करणे तसेच चिनी वैशिष्ट्ये असणाऱ्या सामाजिक वा राजकीय व्यवस्थेच्या मॉडेलविरोधात बोलणेही अयोग्य समजले जाते.

डॉक्युमेंट नं. ९ मधील विचार पाहता, नजीकच्या काळात तरी चीनमध्ये लोकशाही, राजकीय स्वातंत्र्य या विषयांवर काही मूलभूत बदल संभवत नाही. क्षी जिनपिंग यांच्या पूर्वीचे नेते लोकशाही व स्वातंत्र्य यांचे पुरस्कर्ते नव्हतेच. मात्र त्यांचा पाश्चिमात्य लोकशाही, स्वातंत्र्य व इतर राजकीय सुधारणांना इतका पद्धतशीर विरोध नव्हता. डेंग झिओपिंग यांच्या काळात आर्थिक सुधारणा करीत असताना राजकीय सुधारणा किती करायच्या, याबद्दल चर्चा तरी होत असे. हु याओबांग यांनी १९८६ मध्ये पक्ष व सरकार यांच्यात औपचारिक अंतर असावे, अशा आशयाची राजकीय सुधारणा प्रस्तावित केली होती. त्यामुळे पक्षाची सरकारवरची पकड सैल होऊन पक्षाच्या एकाधिकारशाहीला मर्यादा आल्या असत्या. ही राजकीय सुधारणा डेंग आणि पक्षातील इतर नेत्यांनी मान्य केली नाही; मात्र अशी सुधारणा प्रस्तावित करण्याचे स्वातंत्र्य पक्षात होते, हे महत्त्वाचे. जियांग झेमिन व हु जिंताव यांनाही लोकशाही नको होती, मात्र तेही इतक्या टोकाला गेले नाहीत. क्षी यांनी लोकशाहीवरील चर्चाच बंद करून टाकली आहे.

चीनमधील गाओ यु या प्रसिद्ध पत्रकार असून सरकार-विरोधात लिखाण केल्याच्या आरोपावरून तिआनमेन प्रकरणापासून त्यांना अनेकदा तुरुंगात जावे लागले. डॉक्युमेंट नं.९ गोपनीय कागदपत्र असूनही परदेशी वृत्तसंस्थेला उपलब्ध करून दिले, या आरोपावरून २०१५ मध्ये त्यांना सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. डॉक्युमेंट ९ प्रसृत करून क्षी यांनी लोकशाही, उदारमतवादी संकल्पना व त्यावरील चर्चेला चीनमधून हद्दपार करून टाकले.

माओंच्या मनमानी कारभाराचा आणि विकलांग राजकीय संस्थांचा अनुभव घेतलेले डेंग झिओपेंग यांनी १९८० च्या दशकात राजकीय उत्तरदायित्व जपणाऱ्या नव्या राजकीय व कायदेविषयक संस्थांची उभारणी सुरू केली. मात्र २००३ नंतर चीनचे आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत सामिलीकरण होत असताना हा प्रकल्प थंडावत गेला. आता तर जगभरात अनेक ठिकाणी उदारमतवादी लोकशाहीचा ऱ्हास सुरू झाला असताना चीनमध्ये खऱ्या अर्थाने कायद्याचे राज्य अधिक प्रबळ होईल, अशी आशा बाळगणेही व्यर्थ आहे.

(क्रमश:)

डॉ. सतीश बागल, नाशिक
bagals89@gmail.com
Mob. 9820864755

विश्वास वसेकर

ऑगस्ट : कमलपुष्पाचा हा मधला हंगाम

इंग्रजी आणि मराठी महिन्यांचा कितीही घोळ झाला तरी ऑगस्ट आणि श्रावण यांची संपूर्ण ताटातूट कधीच होत नाही. शिवारात, शेतात आणि घर-अंगणातही 'बरखा बहार' आलेली असते. एका अर्थाने हा प्रेमिकांचा ऋतू असतो. पावसाकडून आपले निरनिराळे स्वार्थ या मंडळींना साधून घ्यायचे असतात. 'रुक रुक के बरस के वो आ सके और आने के बाद इतना बरस के वो जा न सके...' वगैरे. बेडूक, मोर यांच्याशिवाय कविजनांचा हा आवडता ऋतू आहे. पावसाइतक्या कविता मराठीत तरी कुठल्याच ऋतूबद्दल लिहिल्या गेल्या नसतील. उदाहरणार्थ- मोरोपंत, अनिल, इंदिरा संत, बोरकर, ग्रेस यांच्या कविता. पावसाळा आला की, जमिनीतून अंकुर बाहेर यावेत तशा पाडगावकरांना कविता सुचायच्या. पावसाची रिमझिम सुरू झाली की, एखाद्या मोठ्या दैनिकाला पावसाच्या कविता पानभर देण्याची बुद्धी होते आणि त्या नव्या-जुन्या कवितांत आपण हरखून जातो. रेडिओ लावला की, विविध भारतीवर सगळ्या पावसाच्या गाण्यांचाच एक कार्यक्रम असतो. 'श्रावणझड' बाहेरी, अंतरी मी भिजलेला' अशी आपली अवस्था असते. असे होण्यासाठी आपल्या संवेदनाची पंचद्वारे उघडून पाऊस 'आत' घेण्याची तरल मानसिकता मात्र हवी.

अशाच एका ऑगस्ट महिन्यात कवी बोरकरांचे पाडगावकरांना पत्र जाते, 'लवकर गोव्यात येऊन जा. इकडे सर्वत्र हिरवा ऑर्केस्ट्रा बहरला आहे.' खरोखर पावसाळा म्हणजे हिरव्या रंगाचा महोत्सव आहे. याच बोरकरांनी कविता लिहिली- 'बांगड्या बघा या, श्रावण लावण्यराज लागला खुलाया'! ऑगस्ट महिन्यात दहावीच्या मुलींना पावसाळ्यावर निबंध लिहायला सांगितला की, त्यात एक वाक्य हमखास येते, 'संपूर्ण सृष्टीने जणू हिरवा शालू पांघरला आहे.' या उपमेचा लिहिणाऱ्याला कंटाळा येत नाही आणि वाचणाऱ्यालाही, इतकी ती आर्ष आणि सुंदर आहे. लग्न कितीही घाईत झाले, तरी आंतरपाटासमोर उभी असलेली नवरी हिरवा शालू पांघरलेलीच असणार. सृजनाचा रंग आहे हा आणि ऑगस्ट सृजनाचा महिना असतो. सगळीकडे हरित तृणांच्या मखमालीचे हिरवे

वर्षातून तीन वेळा बहरणाऱ्या कमलपुष्पाचा हा मधला हंगाम. देवीचे भोगाव नावाच्या गावाला लागून कमळांचे तळे आहे. भोगाव आणि कमळाला माझ्या भावविश्वात विशेष स्थान आहे. त्यामुळे कमळ म्हटले की, मन हुरहुरते. गावाजवळ तळे असणे आणि त्यात कमळं असणे- किती सुंदर, नाही का? अशा गावात मी सबंध वर्षभर राहिलो आहे, हे माझे भाग्य. कमळाचे म्हणजेच कमलपुष्पाचे आठ रंग आढळतात. त्यावरूनही त्याला नावे पडली आहेत. निळ्या रंगाच्या कमळाला नील कमल, नीलोत्पल अशी नावे आहेत. हिंदीत सुंदर चित्रपटगीतं लिहिणाऱ्या कवीचे नाव आहे इंदिवर. इंदिवर म्हणजेच नील कमल. पांढऱ्या रंगाच्या कमळाचे नाव आहे पुण्डरिक. पिवळ्या रंगाच्या कमळाचे नाव आहे सुवर्णकमळ. सर्वोत्कृष्ट चित्रपटाला देण्यात येणाऱ्या राष्ट्रपती पुरस्कारात एक सुवर्णकमळ देतात! प्रत्येक रंगाच्या पुन्हा कथा आहेत.

गालिचे पसरणारा. मन कसे तृप्तीने मोहरून आलेले असते.

ऑगस्ट महिना आणखी एका वैयक्तिक कारणासाठी माझा आवडता आहे. असं म्हणतात की, संपूर्ण पावसाळाभर देव झोपलेले असतात. ते पाहून ऑगस्ट महिन्याच्या वीस तारखेला देवांची झोपमोड न करता मी आईच्या कुशीतून हळूच बाहेर आलो आणि त्यानंतर आयुष्यभर कधी देवांच्या समोर गेलो नाही. हिंदुस्थानात राहण्यामुळे देव-देवळांच्या ठेचा वारंवार लागत गेल्या, पण एकाही देवाला कधी 'हाय-हॅलो' केले नाही. आई, आज्जीपासून सगळ्यांचा देवलसेपणा मात्र एन्जॉय केला- विशेषतः श्रावणात. वडाच्या झाडाला बांधलेल्या तीस-तीस फूट उंच झोक्यांची भीती वाटायची म्हणून नागपंचमीला कधी झोके खेळलो नाही आणि बहीण नसल्यामुळे कोणत्याही राखीपौर्णिमेला या मनगटावर कधी राखी बांधून घेतली नाही. नास्तिक असल्याचे पाहून सगळे सण माझ्याकडे पाठ करून निघून गेले. त्यामुळे सृष्टीबरोबर आगळा निसर्गोत्सव साजरा करायला मी कायम मोकळाच होतो. त्यामुळे मी घरात कमी अन् शेतात जास्त असायचो.

अंबाडी भाजी

शेतात अबक पेरणीची खरिपाची पिके बहरलेली असत. मराठवाड्यात मूग आणि बाजरी मोठ्या प्रमाणात पेरली जाते. शेतमजुरांच्या घरातली ज्वारी संपते तेव्हा महिना-दोन महिने मुगाचीच भाकरी खाल्ली जाते, एवढे मुगाचे महत्त्व. तूर आणि कापसाचे पीकही चांगलेच फोफावलेले असते. कापसाच्या पिकात तुरीचे पाटे घातलेले. लाकडी छतात जशी ठरावीक अंतराने तुळई किंवा नाट असते, तशा तुरीच्या रांगा दिसत. ज्यातून ताग निघतो, ते अंबाडीचे पीकही कापसात पेरलेले असे. मधेच उंच वाढणारी अंबाडी. मला तिचे फूल फारच सुंदर वाटायचे. ग्रेसच्या शब्दांत बदल करून म्हणायचे झाल्यास, 'शपथेवर मज आवडती अंबाडीचे व्याकूळ डोळे'. ही अंबाडी कोवळी असताना तिची पानं तोडून छान भाजी होते. अंबाडीची भाजी गरम-गरम, दोन-चार भाकरी नरम-नरम. तिळाचे पीकही याच काळात घेतले जायचे. आजीचा आग्रह असायचा- कापसाच्या ढेल्यात चवळी, गवारी, भेंडी या भाज्या लावण्याचा. त्याप्रमाणे त्या आढळायच्या. माझ्या लहानपणी सोयाबीन नावाचे पीक नव्हते. आता खरिपात सोयाबीन घेतात म्हणे. मी शेतातलं सोयाबीन कधी पाहिलंच नाही. अंबाडीप्रमाणे कापसाची पिवळीधम्म गेंदबाज फुलं मोठी सुंदर दिसतात. काढणीनंतर कापसाच्या शुष्क काड्यांना पऱ्हाट्या म्हणत, तर तुरीच्या शुष्क काड्यांना तुऱ्हाट्या!

सुगरण बायका अंबाडीची भाजी शेतातून स्वतःच्या हाताने खुडून आणतात. खुडताना एकेक कोवळे पान, त्याचे देठ मुळीच येऊ न देता खुडावे लागते. कारण देठ शिजत नाहीत. कण्या घालून शिजवलेली भाजी बेहतरीन होते. या भाजीला तेल खूप लागते, त्याच्याशिवाय मजा नाही. पानांना सुंदर हिरवा रंग असतो. अंबाडीपेक्षा कोथिंबीरचा हिरवा रंग मला आवडतो. एका लोकगीतात हिरव्या बांगड्यांना उपमा दिली आहे, 'हौसेनं भरला गं हाती कोथिंबिरीचा चुडा!' ऑगस्ट महिन्यातले हिरव्या रंगाचे माहात्म्य गावे तेवढे कमीच!

घरातदेखील एक छोटेखानी निसर्ग असतो. अंगणात आणि परसात. देवपूजेला शोभिवंत आणि उपयुक्त फुलझाडं असतात; तर कढीपत्ता, शेवगा, लिंबोणी यांसह भाजीपाला असतो. ही असते माझ्या आईची बागशाही. अंगणात तुळशीवृंदावन असते. निरनिराळी फुलं- विशेषतः मोगरा असतो. माझ्या लहानपणी एक दुपारतीचं, क्षीण

लाल रंगाचं, रूपानं अत्यंत साधारण असं एक झाड अंगणात असायचं. बहुसंख्य फुलं सकाळीच फुलतात. सकाळी देवाला करायची ती भूपाळी, काकड आरती. रात्री करायची ती शेजारती. पण दुपारी? दुपारी हे एकच फूल उमललेलं असायचं. धुपारती म्हणजे दुपारच्या पूजेच्या वेळी, म्हणून त्याला महाप्राण काढून नाव मिळालं– दुपारती. समोरची फुलबाग आणि मागची परसबाग याची निगराणी मोठ्या प्रेमानं, भल्या सकाळी उठून माझी आईच करायची. मी झोपेतून उठायच्या आत तिचं सडा–सारवण आणि बागेत काम करणं आटोपलेलं असायचं. बागशाही हा सुंदर शब्द मला लोकगीतात भेटला. घरातलं प्रत्येक काम आवडीनं करणं हेच तिचं राज्य असायचं. तिथं फक्त तिची सत्ता चालायची, सासूची नव्हे.

सकाळी उठूनऽ कामाची घाई घाई
काम नव्हंऽ बाई माझी ती बागशाही!

या बागशाहीची अनभिषिक्त सम्राज्ञी म्हणजे माझी आई! अर्थात ग्रामीण स्त्री.

पावसाळा आला की सगळ्यात आधी मला कदंब पाहायचा असतो. ऑगस्ट हा कदंबाच्या फुलण्याचा महिना. कदंबाविषयी वाचले खूप, पण साठ वर्षे मराठवाड्यात राहणाऱ्याला तो दिसणार कसा? तरी या पठ्ठ्याने मराठवाड्यातच कदंबाचे झाड शोधले. जालन्याहून औरंबादला जाताना चिखलठाण्याच्या अलीकडे उजव्या हाताला मी स्वतः त्याला शोधून काढला. तो आनंद अवर्णनीय होता. साठीनंतर पुण्याला आलो आणि कदंबतृप्त झालो. त्याआधी अठ्ठावन्न वर्षांपर्यंत नोकरी केलेल्या माझ्या महाविद्यालयात निरोप सभारंभाच्या दिवशी कदंबाची दोन झाडं लावून आलो. नूतन महाविद्यालयातला हा कदंब दोन मजल्याच्या इमारतीपेक्षा उंच गेला आहे. फक्त त्याच्या खालून यमुना वाहत नाही, एवढीच आता खंत आहे. पुण्यात आता खूप कदंब आहेत. वीस–पंचवीस मीटर उंच वाढू शकणारा, भरदार पर्णसंभार असलेला आणि नारंगी रंगाची गोल गोटीदार सुवासिक फुलं म्हणजे सौंदर्याची परिसीमा! पाऊस आला की, लगेच त्याला पाहायला जा. फार थोडा काळ याचा बहर राहतो. उशीर झाला तर फुलांच्या जागी लटकणाऱ्या फळाच्या काळ्या, शुष्क गुंड्या पाहाव्या लागतील!

मी मोठा प्लॉट घेऊन पहिले घर बांधले, तेव्हा मला झाडांची घाई झाला होती. म्हणून मी बकाना नीम आधी लावला. कडुलिंबाशी त्याचे पुष्कळ साम्य असले, तरी अनेक बाबतींत तो वेगळाही आहे. त्याची पानं बायपिनेट किंवा ट्रायपिनेट असतात. फुलं निळसर–जांभळट पांढरी असतात. फळं गोल आकाराची असतात. एवढा फरक असल्याने चटकन ओळखू येतो. ऑगस्ट महिन्यात बोराच्या झाडाला हिरवट पिवळसर फुलं येतात. सागवानाची फुलंही पाहण्यासारखी असतात. फुलकोबीच्या मोठ्या गड्ड्यासारखी झुबक्या–झुबक्यांनी ती दिसतात. श्री क्षेत्र माहूरच्या डोंगरावर त्यासाठी जायला पाहिजे. शंकासुर म्हणजे छोटासा गुलमोहरच. पावसाळा आणि वसंत ऋतूत फुलत असला, तरी वर्षभर तो सुंदर फुललेला दिसतो. त्याचे लांबलचक पुंकेसर मोराच्या तुऱ्यासारखे दिसतात, म्हणून याचे नाव पिकॉक फ्लॉवर असं अर्थपूर्ण नाव आहे. याच काळात कुंतीचा छोटेखानी, नखशिखान्त सुंदर असणारा वृक्ष पाहायला हवा. रातराणी, बकुळ व पारिजातक यांचा एकत्र परिमळ कुंतीच्या फुलांत जरूर अनुभवायला हवा. कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये किंवा पुण्यात खुन्या मुरलीधर मंदिराच्या बागेत सुंदर फुललेले वृक्ष दिसतील.

मुचकुंद हे एक देखणेबल आणि सखोल हुंगणेबल झाड आहे. पानाच्या मोठ्या आकारावरून ते सहज ओळखता येते. अनेक उद्यानांमध्ये कित्येक वर्षांपासून ते लावलेले दिसेल. कोल्हापूरचे टाऊन हॉल गार्डन, मुंबईचे जिजामाता उद्यान, पुण्याचे एम्प्रेस गार्डन वगैरे. तुळशीबागेत फार मोठा मुचकुंद आहे. पावसाळ्यात त्याला मोठी पांढरी, सुगंधी आणि रूपवान फुलं येतात– मार्चपर्यंत राहतात.

ऑगस्टमध्ये फुलणारे आणखी एक गमतीचे झाड आहे– भद्राक्ष. छोट्या–छोट्या पिवळ्या फुलांच्या तुऱ्यांनी नटलेले हे झाड बागेत शोभून दिसते. याच्या फळाशी रुद्राक्षाचे साम्य असल्याने आणि इतर काहीच न सुचून याचे नाव भद्राक्ष पडले असावे.

नुसतं पानांचं सौंदर्य पाहायचं असेल, तर ऑगस्टसारखा महिना नाही. विपुल पावसामुळे झाडं आतून तीव्रतेने हिरवाई प्रक्षेपितात. शिवाय झाडांवरची धूळ पावसाने धुऊन निघाल्यामुळे रस्त्याकाठची सगळीच झाडे त्यांच्या मूळ रंगात येतात. गुलमोहर, बाभूळ यांच्या पानांचा तसेच साग, बांबू यांच्या नव्याने फुटलेल्या पानांचा रंग उत्कट दिसतो.

हिरवेपणाच्या निकषावर माझे एक आवडते झाड आहे, हिवर. बाभळीइतक्या मोठ्या प्रमाणात हे झाड सर्वत्र पाहायला मिळतं. बाभळीची साल काळपट तपकिरी रंगाची

असते, तर हिवराची पांढरट पिवळी असते. 'गोईण' नावाच्या सुंदर पुस्तकात सासऱ्याच्या वाईट नजरेपासून सुनेला हिवराच्या झाडाने कसे वाचवले, याची गमतीदार गोष्ट दिली आहे. आदिवासी स्त्रिया झाडांना आपली मैत्रीण मानतात. मैत्रिणीसाठी आदिवासी भाषेत शब्द आहे– 'गोईण'.

महाराष्ट्रात खऱ्या बदामाचे एकही झाड नाही. जागोजागी, रस्त्याच्या दुतर्फा विपुल प्रमाणात (खरं तर नकोइतका) दिसतो तो आहे खोटा बदाम– टरमिनालिया कटाप्पा. आपण खातो ते खरे बदाम आपल्या देशात पिकत नाहीत. जे येतात ते इराण आणि उत्तर अमेरिकेतून. मला खोटा बदाम आवडतो तो जानेवारी–फेब्रुवारीत पानगळीच्या वेळी, त्याचा रंग बदलतो तो पाहताना गळण्यापूर्वी' नावाची बोरकरांची कविता या खोट्या बदामाविषयीच असावी. आपल्या देशात अमेरिकेसारखे पानगळीचे सौंदर्य नाही. खोटा बदाम हे 'पर्णांचा वर्णोत्सव' दाखवणारे झाड आहे. त्याचे एखादे तरी पान बाराही महिने लालभडक, किरमिजी

कदंब

लाल किंवा भगवे लाल झालेले पाहायला मिळेलच. ऑगस्टमध्ये याला हिरवे बदाम येतात, रस्त्यावर पडतात. कुणी खात नाहीत आणि खाऊही नयेत.

निसर्गप्रेमात देशीवाद आणणाऱ्यांसाठी उत्तम व सणसणीत उत्तर आहे– हादगा. मराठी संस्कृतीमध्ये कुमारिकांच्या भावविश्वामध्ये 'हादग्याची गाणी' किती महत्त्वाची, सखोल रुजलेली आहेत; नाही का? शैला लोहियांच्या 'भूमी आणि स्त्री' या लोकसाहित्याच्या ग्रंथात वाचा. लोकसाहित्य म्हणजे दोन्ही अर्थाने 'अपौरुषेय' वाङ्मय. 'भोंडला' किंवा 'भुलाबाई'चा उत्सव आश्विन महिन्यात मुली साजरा करतात, त्यात ही हादग्याची गाणी असतात! स्त्रियांना माहेरचा विसर कधीच पडत नाही. माहेर आणि सासर या दोन टेकड्यांतून वाहणाऱ्या नदीसारखे त्यांचे जीवन असते. हादग्याची गाणी या दोन्ही काठांवरून फुलत जातात. हादगा हे झाड आपल्या लोकसंस्कृतीत इतके प्राचीन आहे. हे झाड मूळचे आपल्या देशातले नाही, ही वस्तुस्थिती स्वीकारणे अवघड जाणारे आहे. पण ती वस्तुस्थिती आहेच.

ऑगस्ट महिन्याच्या शेवटी हे झाड फुलत जाते. हे फूल चार ते आठ सेंमी लांबीचे, पिवळसर पांढरे, गुलाबी किंवा जांभळट असते. त्यांची भाजी आणि भजी करतात. 'फुले पितरांच्या पिंडपूजेला विशेष प्रशस्त मानतात.'

हादग्याचे एक नाव अगस्ता आहे. त्याचा अगस्ती–ऋषीशी काही संबंध नाही. अगस्ती दिशा म्हणजे दक्षिण दिशा. त्या दिशेकडील मलेशियापासून उत्तर ऑस्ट्रेलियापर्यंतचा भाग हे हादग्याचे मूळ वसतिस्थान असल्यामुळे त्याला 'अगस्ता' हे नाव पडले असावे. त्याचं सोपं रूप झालं हादगा. याचं वनस्पतीशास्त्रीय नाव आहे सेस्बानिया ग्रँडिफ्लोरा. सेस्बानिया हे प्रजातिनाम हादग्याच्या अरबी नावावरून तयार केलं गेलंय. गँडिफ्लोरा म्हणजे मोठी फुले असलेला. 'विदेशी वृक्ष' या ग्रंथात अशा रीतीने हादग्याचा समावेश करताना त्याचे 'विदेशीयत्व' पटवून दिल्यानंतर ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ श्री.द.महाजन कळवळून म्हणतात– 'ज्या काही थोड्या विदेशी वृक्षांना भारतीयत्व द्यायला हरकत नाही, त्यात हादगा निश्चित!'

बहर म्हणजे वास्तविक वसंत. तरीही 'बरखा बहार' शब्द का तयार झाला? पावसाळ्यात फुलण्याचा एक आगळा वसंत असतो, म्हणून कदाचित. ऑगस्ट महिन्यात आवर्जून अनुभवावी जाईची बरखा बहार. जुई आणि जाईत

फरक करता आला पाहिजे. जाईची पाने संयुक्त आणि जुईपेक्षा जास्त काळसर असतात. जाईला हिंदीत चमेली म्हणतात. हा एक बहुवर्षायू वेल असून मांडवावरही तो छान फुलतो. पुण्याच्या अहल्यादेवी शाळेच्या गेटवर याचा छान लोखंडी मांडव घातलेला आहे. 'इक चमेली के मंडुवेतले' जाण्याचे सुख तिथे आहे. या मांडवाला गदिमांनी 'जाईचे स्नानगृह' म्हटले आहे. किती सुंदर कल्पना!

रिमझिम पाऊस पडतो बाई
भिजतो मांडव, भिजते जाई
पानोपानी ओली सळसळ
करी गुदगुल्या वारा अवखळ
कळीकळीचे शहारते दळ
सुगंध आतील देत जांभई

शुभ्रता आणि सुगंध हे जाई-जुईप्रमाणे बासमती तांदळाचे वैशिष्ट्य. म्हणूनच का कवी बोरकरांनी लिहिले असेल- आणि मग 'सेवीन मी जाई-जुईचा गे भात?'

अबोली फुललेली पाहावी याच महिन्यात. या फुलांच्या रंगावरून त्या प्रकारच्या रंगच्छटेला किंवा रंगालाही अबोली रंग हे नाव पडले. हा नेमका रंग बायकांना जास्त कळतो! कोरांटीसारखे हे झुडूप सुमारे साठ सेंमी उंच, लहान, बहुवर्षायू असून मूळचे श्रीलंकेतले आहे. याचे फूल मुखाकृती असते. गंध म्हणजे वास्तविक फुलाची बोली. अबोलीला गंध नसतो, म्हणजेच बोलता येत नाही- म्हणून ती अबोली. कोकणातले हे लाडके फूल आहे. गोव्यात आणखी दोन रंगांची अबोली भेटते. त्यातल्या फिकट पिवळ्या रंगाच्या अबोलीला 'पिश्शी' अबोली, तर भगव्या रंगाच्या अबोलीला 'रतन अबोली' म्हणतात. अंबाड्यात माळलेल्या रतन अबोलीच्या वेणीला बा.भ.बोरकरांनी उलट्या चंद्रकोरीची उपमा दिली आहे. 'भगवी रतन अबोली वेणी अस्त उमथी कोर.' अबोलीवरच्या आपल्या लेखाला शरदिनी डहाणूकरांनी 'उगवतीच्या दीपकळ्या' असे सुंदर आणि अन्वर्थक शीर्षक दिले आहे.

'इश्क आणि मुश्क (म्हणजे मिशी) छुपाये नहीं छुपते' अशी हिंदीत 'कहावत' आहे. ही कल्पना घेऊन मराठीत गाणं आहे, 'लपविलास तू हिरवा चाफा, सुगंध त्याचा लपेल का? प्रीत लपवुनी लपेल का?' ऑगस्ट महिन्याचा काळ हिरव्या चाफ्याच्या बहरण्याचा आहे. उग्र सुवासिकता असणारी लता ऑगस्टमध्ये फुलते. तिची पाने गुळगुळीत व चकचकीत असतात. दाट पालवीमुळे फुले दिसून येत नाहीत. फुलांचा रंगही पानात लपून जावा असाच पोपटी असतो. फुलाच्या देठाच्या आरंभी एक आकडी असते. तिने आधार पकडून ही वेल वर चढते. बहुवर्षायू, महाप्रचंड असणारी, लांबून एखाद्या झाडासारखी दिसते.

ऑगस्ट हा नाना प्रकारच्या वेलींच्या बहरण्याचा महिना आहे. मराठवाड्यात काटेरिंगणी नावाचा वेल विपुल प्रमाणात दिसतो. तिला 'बिरबैंगण' असेही म्हणतात. कानवेल किंवा खरचुंडी नावाची वेल, तिची सेरोपेजिया बल्बोझा प्रॉपर ही जात ऑगस्टमध्येच फुलते. गणेशवेल नावाची सुंदर, नाजूक वेल पुष्कळदा कुंपणावर आपोआप, न लावता आलेली, बहरलेली दिसते- गणपतीच्या काळात, म्हणून ही गणेशवेल. गारवेल हाही असाच सुंदर दिसणारा, पावसाळ्यात आणि क्वचित वर्षभर फुललेला दिसतो. गणेशवेलीचे फूल तांबडे असते, तर गारवेलीचे जांभळे-निळे! अनंतमूळ, करटुली, कडू करांदा, पिंपळी, पॅशनफ्रूट, भुई कोहळा, बदकवेल, रानजाई, लांबतानी, शिवलिंगी, वुडरोझ या ऑगस्टमध्ये बहरणाऱ्या काही वेली. शतावरी ही आयुर्वेदात अत्यंत उपयुक्त मानली गेलेली वेल अलीकडे खूपच प्रचलित झाली आहे. दिसायला नाजूक आणि सुंदर असल्यामुळे दारावर तोरणासारखा लावलेला तिचा वेल माझे वनस्पती-गुरू डॉ.विनायक कोठेकरांकडे मी पाहिला आहे. शतावरीचे फूल पांढरे आणि सुवासिक असते.

तोंडले या वेलभाजीचा काही लोक विनाकारण तिरस्कार करतात. तो खाणारा माणूस निर्बुद्ध होता, ही 'सरासर झूठ' अफवा आहे. तोंडल्याची भाजी छानच असते. मी लोणचे मसाला वापरून त्याचे लोणचे करत असतो. कुर्रूम कुर्रूम दाढेखाली छान लागते. तोंडल्याच्या पिकलेल्या फळांना सुंदर गुलाबी रंग येतो. लालचुटूक अधर असणाऱ्या सुंदरीच्या अधरोष्ठाला पिकलेल्या तोंडल्याची उपमा देतात. तोंडल्यासाठी कोंकणीत 'तेंडले' असा शब्द असल्यामुळे विजय किंवा सचिनच्या गावाला 'तेंडुले' नाव पडले असावे. या कारणासाठी तरी महाराष्ट्राने तोंडल्याचे ऋणी असले पाहिजे.

जिरायती आणि बागायती या दोन्ही प्रकारच्या शेतांमध्ये पिकांना फुलं आलेली असतात. कारळ्याला पिवळी फुले आलेली असतात. महालक्ष्मीच्या सणाला खूप फुलं लागतात, त्या वेळी ही फुलं उपयोगी पडतात. कारळ्याची चटणी छानच होते. तिळाला फुलं आलेली असतात. हे

तेलबियांचे झाड. केळीला कडक थंडी सहन होत नाही. उष्ण हवा आणि भरपूर पाणी तिला लागते. कोकणातली केळी वैशिष्ट्यपूर्ण असतात. तिच्या फुलाला कंबळ म्हणतात. 'दारात लावलेल्या केळीच्या फुलात सूर्य उगवला' असे कोकणात लोकगीत आहे.

खास कोकणातले आणखी एक सुंदर फूल म्हणजे सुरंगी. सुंदर केशरी परागांची व पांढऱ्या पाकळ्यांची नखाएवढी फुलं, पण जबरदस्त मोहक असतात. मी मराठवाड्यातील असल्यामुळे 'वळेसर' हा शब्द माझ्या साहित्यात कधी येऊ शकला नाही; पण सुरंगीच्या वेळीच फक्त तो वापरतात, हे मला माहीत आहे. स्त्रियांच्या तर डोक्यावरच हे फूल बसले आहे. बोरकर लिहितात,

प्रीतीचा गे दूत माझा हा सुरंगीचा सर
खोवुनी तू कुंतली गे गोविले अभ्यंतर

ऑगस्ट महिन्यात सह्याद्री परिसर, मावळ आणि कोकण भागात पाहावे असे सुंदर फूल आहे कळलावीचे. तिची फुलं अग्नीच्या रंगाची असल्यामुळे तिचे संस्कृत नाव अग्निशिखा आहे, तर इंग्रजी नाव ग्लोरी लिली! कळलावीची पानं तर फारच वैशिष्ट्यपूर्ण असतात. एका पेरावर तीन. हिरव्या रंगाची, सहा सुट्या पाकळ्या असणारी फुलं सुरुवातीला हिरवी असतात. नंतर सरड्यासारखा रंग बदलून तो पिवळा, नारिंगी आणि लालबुंद होत जातो. कळलावी या नावाचा भांडाभांडीशी मात्र काहीही संबंध नाही हं! प्रसूतिपूर्व कळा म्हणजे वेणा! या वेणा येताना, कळा येताना या वेलीच्या कंदाचा औषधासारखा वापर होतो, म्हणून ती 'कळलावी'. कळलावीसाठी बचनाग आणि खड्यानाग असेही नाव आहे. अशी अनेकानेक, इतरत्र दुर्मिळ असणारी फुलं पाहायला ऑगस्ट महिन्यामध्ये कोकणात जरूर जायला पाहिजे. सोनटक्का, कळलावी, सुरंगी, रतन अबोली अशा पुष्पांनी सुरम्य झालेला कोकण खरोखर श्रीमंत आहे!

ऑगस्टमध्ये जर पावसाची झड चालू असेल, तर कास पठारावर फुले उमलत नाहीत. पण चार-पाच दिवस जरी पाऊस थांबला, तरी या दिवसांत कास पठारावर काही वैशिष्ट्यपूर्ण फुले पाहायला मिळतील. कास पठारावरील पुष्पमहोत्सवाच्या तीनही महिन्यांत मोठ्या संख्येने फुलणारा म्हणजे तेरडा. बाल्सम कुटुंबातील ही छोटेखानी वनस्पती संपूर्ण सह्याद्रीभर पावसाळ्यात असते. तेरड्याचे प्रकार अनेक, तसेच त्याचे रंगही अनेक. तेरडा आणि सरडा यांत नुसता अनुप्रास नाही, तर रंगबदल हे वैशिष्ट्य आहे. मराठवाड्यात तेरड्याला 'गुलछबू' हे सुंदर नाव आहे. साधा हळुवार स्पर्श झाला तरी त्याच्या बिया तडतड असा हळुवार आवाज करीत फुटतात. का कुणास ठाऊक, पण लावणीकारांनी तेरड्याला 'इश्कपेच' असे नाव दिले आहे. मजेशीर आहे नं? मला गुलछबूतला गुलाबी रंग विशेष आवडतो.

ऑगस्टपासून कास पठारावर 'हळुंदा' नावाचा गच्च हिरव्या पानांचा आणि लाल-जांभळ्या फुलांचा वेल बहरायला लागतो. त्याचे शास्त्रीय नाव 'व्हिग्रा वेक्सिलाटा' आहे. रानपावटा असेही त्याचे नाव आहे. त्याचे (परागीभवनाच्या अजब तऱ्हेच्या विज्ञानामुळे) 'हत्तीची सोंड' असे नाव का पडले, ते समजून घेणे रंजक आहे. कास पठारावरील कंदीलपुष्प 'सेरोपेजिया' ही वनस्पती याच कारणाने रंजक आहे. कंदीलपुष्पाचे सत्तरपेक्षा जास्त प्रकार आहेत. सह्याद्रीवर वीस प्रकारची कंदीलपुष्पे सापडतात. चिमिन नावाचे फूल त्यांच्या निखळ, निव्वळ शुभ्रतेसाठी देखणे आहे.

वर्षानुवर्षे नव्हे, शतकानुशतके आपल्या मातीत उगवणाऱ्या-वाढवणाऱ्या-फुलणाऱ्या झाडांना विदेशी म्हटले की, मला फार राग येतो. गाजर गवत, वेडी बाभळ, निलगिरी यांसारख्या आपल्या पर्यावरणाला घातक असणाऱ्या काही अपवादांना वगळून टाका. त्यांच्या समूळ विनाशाच्या काही योजना आखा, पण बाकीच्यांना विदेशी म्हणून हिणवू नका. आपण तरी काही सहस्रकांपूर्वी विदेशातूनच भारतात आलोत ना? असो. तर, अशा काही आपल्याशा, ऑगस्ट महिन्यात आपले लक्ष वेधणाऱ्या मित्रांचा थोडा परिचय करून घेऊ.

कोणत्याही सुंदर बागेत गेलं की, आपलं लक्ष वेधून घेणारं एक झाड आहे 'ट्रॅव्हलर्स ट्री' नावाचं. ताडमाडाच्या पाम कुळाशी नातं सांगणारा हा वृक्ष केळीसारख्या दिसणाऱ्या भरगच्च पानांचा सुंदर पिसारा फुलवून एखाद्या मोरासारखा ताटवा घेऊन उभा असतो. लांब-सडक देठामध्ये चक्क पिण्याचे पाणी असते. आफ्रिकेतील कोरड्या प्रदेशात वाटसरूंना प्यायला पाणी देण्याच्या त्याच्या या गुणामुळेच त्याचे ट्रॅव्हलर्स ट्री असं नाव पडलंय. बागेत दिसणारं आणि मोराशी नातं सांगणारं आणखी एक झाड- मोरपंखी. चीनमध्ये मूळ असल्यामुळे त्याचे नाव चायनीज थूजा असं आहे. चीनमधून आलेला आणखी सुंदर एक पामवृक्ष आहे- फाउंटन पाम. नारळ आणि सुपारी

किंवा शिंदी यांच्या कुळातला हा वृक्ष दहा ते पंधरा मीटर सरळ उंच वाढतो. आमच्या सेलूला– कशी कुणास ठाऊक– गोंधळी गल्लीत याची दोन झाडे छान वाढलेली आहेत. बी कवींनी ज्याच्यावर कविता लिहिली, तो चाफा दक्षिण अमेरिकेतून आपल्या देशात आलाय, यावर विश्वास ठेवणे कठीण. याचे कधी कधी त्यालाही वाईट वाटत असावे, म्हणून तर 'चाफा खंत करी, काही केल्या बोलेना' असे बी कवी म्हणतात. असो. तांबडा चाफा हा एक पानझडी, छोटा वृक्ष किंवा मोठे झुडूप. तो पावसाळ्यात फुलत राहतो आणि त्याच्या अवर्णनीय सौंदर्याने खुलून दिसतो. उष्ण कटिबंधीय भारतात तो सर्वत्र आढळतो.

समुद्रकिनारी, बागबगीच्यात किंवा मोकळ्या आवारात आढळणारा सुरू किंवा कॅश्युरिना हा वृक्ष मूळचा ऑस्ट्रेलियातला आहे. इंग्रजी राजवटीत तो आणवला गेला. मराठीत याचे एक नाव 'खडशेरणी' असे आहे. समुद्रकिनाऱ्यावर त्याचे जंगल झालेले आढळते. कोणालाही नावानिशी ओळखू येईल, असं हे सर्वपरिचित झाड आहे. मला त्याचा पिवळाधम्म रंग आवडतो, पण सुरक्षित अंतर राखूनच प्रेम करावं असं झाडं आहे बिट्टीचं. कण्हेरीच्या कुळातली असल्यामुळे तिला पिवळी कण्हेर असंही म्हणतात. पण फूल कण्हेरीपेक्षा वेगळं, नरसाळ्याच्या आकाराचं असतं. 'थेवेशिया पेरुव्हियाना' असं त्याचं शास्त्रीय नाव आहे. अत्यंत अनाग्रही आणि कुठल्याही परिस्थितीत रमणारं हे झाड दक्षिण भारतात फारच रमलंय. सगळ्याच कण्हेरींप्रमाणे हे अतिशय विषारी असं झाड असल्यामुळे त्याला गुरंही तोंड लावत नाहीत. रस्ता दुभाजकावर रांगेने लावलेली ही झाडे रस्त्याची शोभा वाढवितात.

वर्षातून तीन वेळा बहरणाऱ्या कमलपुष्पाचा हा मधला हंगाम. देवीचे भोगाव नावाच्या गावाला लागून कमळांचे तळे आहे. भोगाव आणि कमळाला माझ्या भावविश्वात विशेष स्थान आहे. त्यामुळे कमळ म्हटले की, मन हुरहुरते. गावाजवळ तळे असणे आणि त्यात कमळं असणे– किती सुंदर, नाही का? अशा गावात मी सबंध वर्षभर राहिलो आहे, हे माझे भाग्य. कमळाचे म्हणजेच कमलपुष्पाचे आठ रंग आढळतात. त्यावरूनही त्याला नावे पडली आहेत. निळ्या रंगाच्या कमळाला नील कमल, नीलोत्पल अशी नावे आहेत. हिंदीत सुंदर चित्रपटगीतं लिहिणाऱ्या कवीचे नाव आहे इंदिवर. इंदिवर म्हणजेच नील कमल. पांढऱ्या रंगाच्या कमळाचे नाव आहे पुण्डरिक. पिवळ्या रंगाच्या कमळाचे नाव आहे सुवर्णकमळ. सर्वोत्कृष्ट चित्रपटाला देण्यात येणाऱ्या राष्ट्रपती पुरस्कारात एक सुवर्णकमळ देतात! प्रत्येक रंगाच्या पुन्हा कथा आहेत. कामदेवाच्या म्हणजेच मदनाच्या बाणाने जखम झाल्याने महादेवाच्या रक्ताचे थेंब काही कमळांवर पडले आणि ती 'रक्तकमळे' झाली. आरक्त कमळ हे लक्ष्मीचे आसन असते, तर शुभ्र कमळ सरस्वतीचे. संस्कृत आणि प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक मराठी कवितेत कमळाला जेवढे स्थान मिळाले आहे, तेवढे कोणत्याच फुलाला नाही. हिंदू मुला–मुलींची नावे कमळावरून जेवढी आहेत तेवढी कोणत्याच फुलावरून नाहीत. सांगू? अरविंद, राजीव, पद्मपाणी, पंकज, नीरज, नलिनी, मृणाल, पुंडरिक, उत्पल, इंदिवर... पुरे?

कमळासारखे सुंदर फूल नाही. विस्तीर्ण अशा जलाशयात फुललेली हजारो कमळं पाहणे यासारखा नवलनयनोत्सव नाही. फक्त अट एकच आहे की– आपण त्याला आपल्या अंगणात आणू शकत नाही, तर त्याला मोठ्या संख्येने पाहायला आपल्याला घरापासून दूर जावे लागते. सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिराभोवती असणाऱ्या तळ्यात पूर्वी शेकडो सुवर्णकमळे होती. ज्यांनी ती पाहिली, ती किती भाग्यवान माणसं होती! कमळाएवढे सुंदर प्रतीक आणि प्रतिमा कवितेत डोलण्याचे भाग्य एकाही दुसऱ्या फुलाला लाभले नाही. 'समिधा' या कवितासंग्रहात कुसुमाग्रजांनी जीवनावरचे भाष्य करताना कमळाचे रूपक वापरले आहे. जी.ए. कुलकर्णींना पूर्वी त्यांच्या शेजारी राहणाऱ्या रखमाकाकू आठवतात, त्यांच्या तोंडी असलेल्या (महान कवितेच्या तोडीस तोड असणाऱ्या) या ओवीमुळे. स्वतंत्रपणेसुद्धा ही ओवी कमलवेडाने आपल्याला झपाटून टाकणारी आहे–

तिचे डोळे ग निळ्या कमळीचे फूल
त्यात आत आहे ग, माहेराची सांजसाऊल!

प्रा. विश्वास वसेकर, पुणे
Mob. : 9922522668 / 7378667168

डॉक्युमेंटरी

नीलांबरी जोशी

अंधाराची कूस, हुंदक्याने भरे... नीरोज गेस्ट्स डॉक्युमेंटरी

या डॉक्युमेंटरीमध्ये पी.साईनाथ यांनी ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांच्या घरात जाऊन घेतलेल्या मुलाखती, त्यांच्या कुटुंबीयांना विचारलेले अचूक प्रश्न दिसतात. त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी दिलेल्या व्याख्यानांच्या दृश्यांमधून त्यांचे विचार स्पष्ट होत जातात. अगदी घरातल्या छोट्याशा स्वयंपाकघरात, पुस्तकांच्या शेल्फसमोर मोकळ्या घरगुती वातावरणात आस्थेनं प्रत्येक मुद्यावर बोलणारे पी.साईनाथ आपल्याला दिसत राहतात. प्रत्येक गोष्टीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहून अत्यंत ओघवत्या सौजन्यपूर्ण भाषेत, प्रसन्नपणे व ठामपणे पी.साईनाथ प्रश्न मांडत राहतात. भोवतालच्या लोकांशी आणि ते जिथे जातात तिथल्या लोकांशी त्यांचं वागणं पाहताना जिव्हाळा, आत्मीयता, सौजन्य, कळकळ सतत जाणवत राहते. विद्यार्थी किंवा समोरचा एकूण प्रेक्षकवर्ग यांच्यासाठी त्यांची भाषा व मुद्दे विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी आहेत.

तान्हं उपाशी लेकरू, भाकर मागते मायेले
आसू डोळ्यांत आणून, सूर्य दाखवी लेकराले
कवा देशील वं माये, भाकर आम्हाले खायले?
रातपासून नाही जेवलो, भूक लागली पोटाले
निवू दे ना वं जरा बापू, त्या गरम भाकरीले
चटका दुरून अंगाले लागतो, फोड येतील तोंडाले
आभाळीचा गरम सूर्य डोंगराआड गेला
वाट पाहून भाकरीची, तान्हा उपाशी झोपी गेला...

नीरोज गेस्ट्स या डॉक्युमेंटरीमध्ये एका दृश्यात विशीच्या आसपासची एक मुलगी श्रीकृष्ण कळंब यांची ही कविता वाचताना दिसते. या शेतकरी असलेल्या कवीनं आत्महत्या केली आहे आणि ही कविता वाचणारी त्यांचीच मुलगी आहे, असं पुढच्या दृश्यात कळतं. तेव्हा त्यापुढचं दृश्य लगेच पाहणं शक्य होत नाही, इतका सुन्नपणा येतो.

'नीरोज गेस्ट्स हे नाव या डॉक्युमेंटरीला का दिलं आहे?' असा प्रश्न आपल्या मनात ही डॉक्युमेंटरी पाहण्यापूर्वी येतोच, पण पहिल्याच दृश्यात त्यामागची कथा भारतीय पत्रकार पी.साईनाथ समोरच्या श्रोतृवर्गाला सांगताना दिसतात.

नीरो या रोमच्या राजाचा उल्लेख आपण सहसा रोम जळत होतं आणि नीरो हा राजा मात्र फिडल वाजवत बसला होता, इतकाच ऐकलेला असतो. याबद्दलचा इतिहास टॅसिटस या तत्कालीन इतिहासकारानं लिहून ठेवला आहे. इ.स. ५४ ते ६८ या काळात रोमन साम्राज्याचा अधिपती असलेल्या नीरोनंच ठरवून रोम जाळलं, असा त्याच्यावर काही जण आरोप करतात. आठ दिवस चालू असलेल्या त्या भीषण आगीत रोममधले तीन जिल्हे जळून खाक झाले. त्या आगीनंतर अर्थातच काही काळ तोच विषय रोममध्ये सारखा चर्चेत होता. ती चर्चा थांबवायची असेल, तर लोकांचं लक्ष दुसरीकडे वेधणं हा एकमेव राजमान्य उपाय नीरोकडे उरला होता. त्यासाठी त्यानं रोमन साम्राज्याच्या इतिहासात अभूतपूर्व ठरेल अशी एक पार्टी द्यायची ठरवली. आपल्या अलिशान प्रासादाभोवतीच्या बगीच्यात नीरोनं ही पार्टी ठरवली.

एवढी कथा सांगितल्यानंतर ''ती पार्टी बोलावणारा नीरो

ही मला समस्या वाटत नाही, मला समस्या वाटते ती नीरोनं बोलावलेल्या पाहुण्यांची. कोण होते ते?'' असं पी.साईनाथ समोरच्या प्रेक्षकांना विचारतात. पुढे ते म्हणतात, ''पाच वर्षं शेतकऱ्यांच्या आत्महत्या या प्रश्नावर काम केल्यानंतर मला माझ्या या प्रश्नाचं उत्तर मिळालं आहे.'' इथून पुढे नीरोज गेस्ट्स कोण? याचा वेध घेणारा या डॉक्युमेंटरीचा प्रवास सुरू होतो.

'नीरोज गेस्ट्स- द एज ऑफ इनइक्वॅलिटी' ही ५६ मिनिटांची डॉक्युमेंटरी दीपा भाटिया यांनी दिग्दर्शित केली आहे. 'द हिंदू' या प्रख्यात वृत्तपत्रातून पी.साईनाथ यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यांच्या कुटुंबीयांची होणारी वाताहत हा विषय ३० वर्षं सातत्यानं मांडला. भारतातल्या एकाही वर्तमानपत्राकडे निव्वळ ग्रामीण भागातल्या प्रश्नांचं वार्तांकन करणारा वार्ताहर नाही, हे लक्षात घेतलं तर पी.साईनाथ यांचं महत्त्व लक्षात येऊ शकेल. आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्यातनाम असलेले पी.साईनाथ हे 'एव्हरीबडी लव्हज अ ड्रॉट'सारख्या पुस्तकांचे लेखक आहेत. त्यांना पत्रकारितेतलं २००७ चं रॅमन मॅगेसेसे पारितोषिक मिळालेलं आहे.

या डॉक्युमेंटरीमध्ये पी.साईनाथ यांनी ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांच्या घरात जाऊन घेतलेल्या मुलाखती, त्यांच्या कुटुंबीयांना विचारलेले अचूक प्रश्न दिसतात. त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी दिलेल्या व्याख्यानांच्या दृश्यांमधून त्यांचे विचार स्पष्ट होत जातात. अगदी घरातल्या छोट्याशा स्वयंपाकघरात, पुस्तकांच्या शेल्फसमोर मोकळ्या घरगुती वातावरणात आस्थेनं प्रत्येक मुद्यावर बोलणारे पी.साईनाथ आपल्याला दिसत राहतात. प्रत्येक गोष्टीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहून अत्यंत ओघवत्या सौजन्यपूर्ण भाषेत, प्रसन्नपणे व ठामपणे पी.साईनाथ प्रश्न मांडत राहतात. भोवतालच्या लोकांशी आणि ते जिथे जातात तिथल्या लोकांशी त्यांचं वागणं पाहताना जिव्हाळा, आत्मीयता, सौजन्य, कळकळ सतत जाणवत राहते. विद्यार्थी किंवा समोरचा एकूण प्रेक्षकवर्ग यांच्यासाठी त्यांची भाषा व मुद्दे विचारप्रवर्तक आणि प्रेरणादायी आहेत.

डॉक्युमेंटरीत मधूनच डोळ्यांसमोर खट्कन येणारे आकडे, पीडित लोकांचे चेहरे, शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरचे हताश भाव, त्यांच्या डोळ्यांतली निराशा- हे मनाचा ताबा घेत राहतात. एका दृश्यात दोन माणसं हॉस्पिटलमध्ये तिसऱ्याला घेऊन येताना दिसतात. धूसर



होत जाणाऱ्या हॉस्पिटलच्या इमारतीत ते दिसेनासे होतात तोपर्यंत त्या तिसऱ्या माणसानं कीटकनाशक प्यायलंय, असं आपल्याला मागच्या कॉमेंट्रीतून ऐकू येतं. दुसऱ्या एका दृश्यात काही मजूर स्त्रिया एका ट्रेनमधून कामाला जात असताना पी.साईनाथ त्यांना प्रश्न विचारताना दिसतात. दिवसाला २० तास काम करणाऱ्या या बायकांच्या मुलांना आपली आई ठाऊक नाही, हे त्या प्रश्नोत्तरांमधून लक्षात येतं आणि आपण निरुत्तर होत जातो.

भारतात- विशेषत: महाराष्ट्रात- शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, अनेक बाबतींतली विषमता आणि माध्यमांनी या बातम्यांकडे केलेलं संपूर्ण दुर्लक्ष या तीन मध्यवर्ती संकल्पना या डॉक्युमेंटरीमध्ये मांडलेल्या आहेत. पण त्या अनुषंगानं प्रत्येक दृश्यात मांडले गेलेले विषय हा एकेका लेखाचा विषय होऊ शकेल. सामाजिक न्याय-अन्याय, भेडसावणारी विषमता, नवउदारमतवादाचा दुटप्पीपणा, इकॉनॉमिक ग्रोथ रेट्स, जीडीपी यांचे दिपवून टाकणारे आकडे आणि शहरी चंगळवादी झगमगीत दुनियेमागची ग्रामीण भागातली दुनिया, बेरोजगारी, धान्याचा साठा करणारे व्यापारी, अन्नधान्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार,

त्यातली धोरणं– असे अनेक प्रश्न या निमित्तानं समोर येत जातात.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. अजूनही ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. भारतातल्या एकूण आत्महत्यांपैकी ११.२ टक्के आत्महत्या शेतकऱ्यांच्या आहेत. सन १९९५ पासून २०१४ पर्यंत भारतात २,९६,४३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, असं नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो ऑफ इंडियाचा अहवाल सांगतो. राज्यांपुरतं बोलायचं झालं तर महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्यांचा आकडा सर्वांत जास्त आहे. ओडिशा, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, छत्तीसगड या राज्यांत महाराष्ट्राच्या खालोखाल शेतकरी आत्महत्या करतात. मात्र २०१५ नंतर नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो ऑफ इंडिया यांनी शेतकरी आत्महत्यांचा अहवाल दिलेला नाही.

त्यानंतरची आकडेवारी राज्याच्या महसूल विभागाकडून आलेली आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना हा विभाग नुकसानभरपाई देतो. त्यांच्या अहवालानुसार २०१६ मध्ये भारतात ११,३७९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. याचा अर्थ महिन्याला ९४८ आणि दर दिवशी ३१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असा होतो. सन २०१८ मध्ये १०३४९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, असं ॲक्सिडेंटल डेथ्स अँड सुईसाईड्स इन इंडियाचा अहवाल सांगतो. याचा अर्थ दिवसाला २८ शेतकरी आत्महत्या करत होते. भारतात २०११ पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये ११ टक्के वाढ झाली आहे. मुळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे विश्वासार्ह आकडे उपलब्ध नाहीत, हीदेखील एक गंभीर समस्या आहे.

सन २०१८ या एकाच वर्षातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागची कारणं पाहायला गेलं तर– ३९ टक्के शेतकऱ्यांनी कर्ज फेडता न आल्यानं, १९ टक्के शेतकऱ्यांनी नैसर्गिक कारणांमुळे पिकं अनियमित झाली या कारणानं, १२ टक्के शेतकऱ्यांनी कौटुंबिक समस्यांमुळे, ११ टक्के शेतकऱ्यांनी आजाराला कंटाळून, ४ टक्के शेतकऱ्यांनी दारू किंवा व्यसनाधीनता यामुळे आत्महत्या केल्या आहेत. यापैकी ८ टक्के जणांनी खासगी स्वरूपातलं सावकाराकडून घेतलेलं कर्ज न फेडता आल्यानं आत्महत्या केल्या आहेत.

शेतकऱ्यांना शेतीसाठी खतं, पाणी, वीज सगळं बाजारभावानं मिळतं, पण मालाला ठरावीक किंमत मिळेल याची खात्री नसतेच. अशा वेळी निरनिराळ्या कारणांसाठी सावकारांकडून कर्ज घेतलं जातं. तसंच आपल्या देशात ज्या गोष्टीसाठी कर्ज हवं असेल, त्यासाठी संपूर्ण रकमेचं कर्ज मिळत नाही. उरलेली रक्कम सावकाराकडून घेतली जाते. यातून कर्जाच्या विळख्यात सापडून शेतकरी आत्महत्या करतात. स्त्री शेतकरी असते, ही संकल्पनाच नसल्यामुळे अनेकदा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बायकोला नुकसानभरपाई मिळत नाही. यावर 'स्त्री ही आई, बहीण, मुलगी असू शकते पण शेतकरी नाही' अशी मार्मिक टिप्पणी या डॉक्युमेंटरीत आहे.

कर्ज फेडता न येणं हे शेतकरी आत्महत्येमागचं सर्वांत मोठं कारण आहेच. पण कर्ज का फेडता आलं नाही त्यामागे दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस, पिकांवरील रोग, उत्पादन खर्चाइतकंही उत्पन्न शेतमालाच्या विक्रीतून न निघणं आणि व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक अशी अनेक कारणं असतात. सरकारच्या चुकीच्या योजना आणि धोरणं, सरकारी अनुदानांमधला भ्रष्टाचार अशीही अनेक कारणं शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागे आहेत.

यामागचा विरोधाभास मात्र थक्क करणारा आहे. आपल्या देशातल्या लोकांना पुरेल इतका अन्नाचा साठा झाल्यानंतर सहसा धान्याची निर्यात केली जाते, पण भारतातली परिस्थिती मात्र तशी नाही. भारतात गेल्या दोन दशकांत धान्याचं उत्पादन वाढतं आहे. पण दर माणशी धान्याची उपलब्धता मात्र १९६० पासून दर पाच वर्षांनी कमी होत चालली आहे.

एकीकडे पाहायला गेलं, तर गेल्या काही वर्षांमध्ये भारत जगातला तांदळाचा मोठा निर्यातदार बनला आहे. भारत २०१३ मध्ये जगातला सातव्या क्रमांकाचा धान्य निर्यातदार होता, तर गव्हाचा चौथ्या क्रमाकांवरचा आणि बीफचा पहिल्या क्रमांकावरचा निर्यातदार होता. भारतात २०१२–१३ मध्ये धान्यांची निर्यात २.४ कोटी टन इतकी होती. त्यात तांदळाचा वाटा १.३ कोटी टन इतका होता, तर गव्हाचा वाटा ६५ लाख टन इतका होता. तांदळाची निर्यात २०१२–१३ मध्ये २००० कोटी डॉलर्स इतकी, तर गव्हाची १००० कोटी डॉलर्स इतकी होती.

हे झालं धान्याबाबत. दूध, चिकन आणि मासे यांच्या निर्यातीतही भारत अग्रेसर आहे. भारतानं २०१५ मध्ये ३,५०,००० कोटी रुपयांचं दूध, ९०,००० कोटी रुपयांचे मासे आणि ४५,००० कोटी रुपयांचं चिकन निर्यात केलं

होतं. जगात भारताचं दुग्ध उत्पादन सर्वांत जास्त आहे. अमेरिका हा देश दुसऱ्या स्थानावर आहे.

धान्याचा आणि मांसाचा साठा करणारे ट्रेडर्स जागतिक बाजारपेठेत धान्य व बीफ विकून पैसा कमावतात, पण शेतकऱ्यांना उत्पादनखर्चाइतकेही पैसे शेतीतून मिळत नाहीत. त्यांच्या पिकाला वाजवी भाव मिळत नाही.

गुरांच्या बाबतीतही परिस्थिती अशीच आहे. आपण गहू, तांदूळ, खाद्यतेल या प्रक्रियेत जनावरांना खाण्यायोग्य पेंड तयार करतो. साधारण दोन लाख टन राईस ब्रान आणि ८५०० कोटी रुपयांचे ऑईल केक्स आपण गुरांना खायला घालण्यासाठी निर्यात करतो. भारतात मात्र जनावरांना कोरडा चारा २५ टक्के आणि ओला चारा ६५ टक्के इतक्या प्रमाणात कमी पडतो. शेतकऱ्यांना हमीभाव नाही, खायला अन्न नाही आणि आपल्या गुरांना खायला चारा नाही– अशी अवस्था आहे.

इतकं धान्य पिकवणारा भारत ११७ कुपोषित देशांच्या यादीत १०२ या स्थानावर आहे. तसंच अन्नधान्याच्या किमती भारतात सतत वाढत असतात. दारिद्र्यरेषेखालच्या लोकांना त्या परवडणं शक्यच होत नाही, पण त्याहून किंचित वरच्या आर्थिक स्तरातल्या लोकांनाही हे धान्य घ्यायला परवडत नाही. त्यामुळे दिवसाला ठरावीक कॅलरीजचा पुरवठा गरिबांना होत नाही. त्यातून कुपोषिततेचं प्रमाण वाढतं.

शेतकऱ्यांच्या हलाखीबाबत विरोधाभास दाखवणाऱ्या अशा अनेक गोष्टी या डॉक्युमेंटरीत जाणवत रहातात. एका प्रसंगात कापूस पिकवणारा एक शेतकरी चार लाखांचं कर्ज फेडू शकला नाही, म्हणून आत्महत्या करतो. त्या आत्महत्येबद्दल माध्यमांमध्ये काहीही येत नाही. शेतकऱ्यानं आत्महत्या केलेल्या गावापासून काही किलोमीटर्सवर इंडिया फॅशन वीकचं वार्तांकन करायला ५०० पत्रकार पोचतात. त्या शोमध्ये त्याच कापसापासून तयार झालेले कपडे घालून मॉडेल्स कॅटवॉक करत असतात.

दुसऱ्या एका प्रसंगात भारतात सेन्सेक्स जेव्हा खाली



आला, तेव्हा अर्थमंत्री दोन तासांत दलाल स्ट्रीटवर पोचले. पण पंतप्रधानांना आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोचायला १० वर्षं लागतात, असंही एक उदाहरण पी.साईनाथ यांनी दिलंय. पुढे एका व्याख्यानात ते सांगतात, ''शेतकऱ्यांना शेतीची अवजारं घ्यायला कर्ज हवं असेल तर बँक अनेक कागदपत्रं मागते, हमी मागते आणि मला मर्सिडीज बेंझ ही गाडी घ्यायला कर्ज देण्यासाठी बँका स्वत:हून फोन करतात.''

आणखी एका प्रसंगात पी.साईनाथ स्वत: घरात कॉफी बनवत असताना 'केरळमधल्या कॉफी पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना पैसे मिळत नाहीत, पण कॉफीवर प्रक्रिया करणाऱ्या मधल्या उद्योजकांना आणि व्यापाऱ्यांना किती भरससाट नफा होतो,' ते सांगतानाही दिसतात. मुळात दोन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्याच काळात भारत सरकारनं उद्योजकांना/कॉर्पोरेट्सना दोन लाख कोटी इन्सेंटिव्ह दोन वर्षात दिला आहे, असं उदाहरणही या डॉक्युमेंटरीत दिसतं.

शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न इतका भेडसावणारा असूनही माध्यमांमध्ये याची दखल घेतली जात नाही. लोकांना दारिद्र्याबद्दल वाचायला आवडणार नाही, असाही स्टँड माध्यमं छुप्या पद्धतीनं घेतात. शहरी किंवा ग्रामीण भागातल्या मध्यमवर्गात शेतकऱ्यांचे खरे प्रश्न माहिती नसतात. महागाई, शहरातल्या ट्रॅफिकच्या समस्या, पावसात तुंबणारे रस्ते अशा अनेक विषयांवर सभा-समारंभात हिरीरीनं बोलणारे हे लोक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल बोलताना दिसत नाहीत. अगदी कोरोना व्हायरसच्या काळातही आपल्याला वेळच्या वेळी, स्वस्त दरात ताजी भाजी मिळावी याचा अट्टहास धरणारे शहरी मध्यमवर्गीय लोक शेतकऱ्यांना कोरोनामुळे किती संकटांना तोंड द्यावं लागलं याचा विचारही करत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. यामुळेच या डॉक्युमेंटरीत एक जण 'शेतकरी असणं हा गुन्हा आहे का?' हा प्रश्न विचारतो.

भारतात शेतकऱ्यांच्या समस्यांवरच्या उपायांमध्ये स्वामिनाथन आयोग चर्चेत असतो. पण तो नुसताच चर्चेत असतो आणि सर्वांत कमी वाचला गेला आहे, असं पी.साईनाथ सांगतात. या आयोगानं २००४ ते २००६ च्या दरम्यान पाच अहवाल सादर केले होते. शेतीमालाला हमीभाव, सर्वांना अन्न उपलब्ध होणं, मजुरांना किमान वेतन, ग्रामीण भागातल्या कुटुंबांना विमा- अशा गोष्टी या अहवालात आहेत. त्यावर अर्थातच कृती झालेली दिसत नाही. यामुळेच २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये शेतकऱ्यांची संख्या ९० लाखांनी कमी झाल्याचं आकडेवारी सांगते. आता डॉक्युमेंटरीच्या शेवटाकडे आपण येतो आणि नीरोज गेस्ट्स कोण होते, याचं उत्तर मिळायला लागतं. पी.साईनाथ सांगतात...

नीरोनं पार्टी द्यायची ठरवली खरी, पण त्यात एक समस्या होती. अंतर्गोल भिंगाच्या आकाराच्या त्याच्या बागेत पाहुण्यांची बसण्याची काही ठिकाणं उंचीवर होती. संध्याकाळच्या वेळी पार्टी असल्यानं या सगळ्या उंच ठिकाणीही झगमगता प्रकाश पोचायला हवा होता. रोममधले प्रतिष्ठित, बुद्धिमान, वार्ताहर, उच्चपदस्थ राजकारणी असे सर्व लोक पार्टीत असणारच होते. बागेत काळोख असलेला नीरोला चालणार नव्हता. पण नीरो राजाच असल्यानं त्यानं ती समस्या सोडवली. कशी? तर, त्यानं तुरुंगातले कैदी आणि गुन्हेगार जमा केले. त्यांना एक-एक करून बागेतल्या शेकोटीत जाळायला सुरुवात केली. त्या आगीनं ती पार्टी प्रकाशमान झाली.

पुढे साईनाथ सांगतात- नीरो हा राजा वेडा होता, हे मान्यच आहे. पण कथा नीरोबद्दल नाहीये, ती नीरोच्या पाहुण्यांबद्दल आहे. त्याच्याकडे आलेल्या पाहुण्यांची संवेदनशीलता कुठे गेली होती? आपण वाईन, फळं, मांस असं खात-पीत असताना भोवताली उजेड असावा म्हणून एक माणूस जळतोय- अशा परिस्थितीत तो घास त्यांच्या जिभेपर्यंत पोचलाच कसा?

'आपल्याला मिळणारे घास ज्यांच्या श्रमानं आले, ते शेतकरी आत्महत्या करत असताना आपल्या जिभेपर्यंत ते घास पोचतात कसे? आपण सगळेच नीरोज गेस्ट्स आहोत का?' हा प्रश्न पी.साईनाथ यांनी विचारलेला नाही. पण डॉक्युमेंटरीच्या शेवटी तो जळजळीत प्रश्न आपल्या मनावर आसूड ओढतोच.

डॉक्युमेंटरीची लिंक https://www.youtube.com/watch?v=4q6m5NgrCJs

नीलांबरी जोशी, पुणे
neelambari.joshi@gmail.com
Mob. 9922445456

'अंधाराची कूस, हुंदक्याने भरे...' ही ओळ विंदा करंदीकर यांची आहे.

भाषा : स्त्रियांची / स्त्रियांविषयीची

अपर्णा दीक्षित

वर्चस्वाची भाषा

समाजात विविध पातळ्यांवर चर्चा होण्यासाठी, खऱ्या बदलाची सूत्रं गोवली जाण्यासाठी, ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी अशा संकल्पना अस्तित्वात आहेत, याची प्राथमिक माहिती तर असणे आवश्यक आहे. आपण जे अनुभवतो आहोत, तो आपल्या एकटीचा अनुभव नाही; तर जगभरात अनेक स्त्रियांना येणारा हा अनुभव आहे, त्याला नाव आहे, त्या अनुभवांच्या विचारपूर्वक विभागण्या (categories) केल्या आहेत, मला येणाऱ्या अनुभवांचा कुठे तरी शिस्तशीर अभ्यास होतो आहे- ही माहिती खूप महत्त्वाची आणि दिलासा देणारी आहे. स्वत:च्या अनुभव-विश्वाची अशा प्रकारे दखल घेतली जाणे आणि आपले विचार वैध ठरवले जाणे (validate) अतिशय समाधानकारक आहे. व्यक्तीचा स्व बळकट होण्यासाठी, आतून स्वत:बद्दल विश्वास वाटण्यासाठी या सगळ्या अनुभवांची पद्धतशीर विभागणी होणे याचे खूप मोठे योगदान आहे. आणि हे काम सामाजिक व भाषिक अशा दोन्ही पातळ्यांवर एकाच वेळी व्हायला हवे आहे. आजच्या काळाची ती निकड आहे.

पॅट्रिक हॅमिल्टन या नाटककाराने १९३८ मध्ये लिहिलेलं 'गॅसलाईट' हे नाटक आलं. त्याच नाटकावर आधारित 'गॅसलाईट' नावाचा सिनेमा १९४४ मध्ये आला. इनग्रिड बर्गमन (पॉला) आणि चार्ल्स बोयर (ग्रेगरी) अशी प्रमुख पात्रं त्यात आहेत. पॉला आणि ग्रेगरी यांचे नुकतेच लग्न झालेले आहे. पॉलाकडे वारसाहक्काने आलेल्या समृद्ध बंगल्यात हे जोडपे राहते आहे. लग्नानंतर काहीच काळात पॉलाबरोबर विचित्र घटना घडू लागतात. तिने आठवणीने ठेवलेल्या वस्तू, जिथे ठेवल्या तिथे सापडेनाशा होतात. आपल्या नवऱ्याच्या भूतकाळाशी संबंधित पत्र मिळते, मात्र हातात कोणताच कागद नसताना ती बरळते आहे, असं नवरा तिला दाखवून देतो. घरातल्या गॅसवर चालणाऱ्या दिव्यांचा प्रकाश सतत कमी-जास्त होतो आहे असं पॉलाला वाटत राहातं. मात्र असं काही होत नाहीये, हे सगळे पॉलाच्या मनाचे खेळ आहेत- असं ग्रेगरी तिला सांगत राहतो. तिच्याबद्दल वाटत असणारी काळजी त्याच्या वागण्या-बोलण्यातून व्यक्त होत राहते. बाहेर चार लोकांत जाऊन हसं होऊ नये, म्हणून शेवटी पॉलाने फारसं घराबाहेर पडू नये, असं ग्रेगरी सुचवतो. पॉला घरातच कोंडली जाते. पॉलाच्या आईला वेडाचे झटके येत होते आणि त्याच दिशेने पॉला जाते आहे, असे सुचवल्यावर आपल्या आईला अशा प्रकारचा आजार असल्याचेच पॉलाला आठवत नाही. आता पॉला जास्तच आक्रमक वागू लागते. काहीबाही बडबडते, खऱ्या-खोट्याचा व योग्य-अयोग्याचा तिचा अंदाज सारखाच चुकू लागला आहे. हिस्टेरिया झाल्यासारखे, किंचित वेडसरपणाची झाक असलेले तिचे वागणे आहे. आणि नवरा हे सगळे सहन करतो आहे. ते राहत असलेल्या बंगलीत अनेक वर्षांपूर्वी झालेल्या खुनाचा तपास पुन्हा काही कारणाने सुरू होतो. मग मात्र वेगाने घटना घडतात. तपास करणारा एक प्रामाणिक पोलीस ऑफिसर पॉलाला हे दाखवून देतो की, तिच्या नवऱ्याने तिला शिस्तशीर पद्धतीने या वेडसरपणाकडे ढकलले आहे. तिच्या 'गहाळ' झालेल्या वस्तू ग्रेगरीनेच दडवून ठेवल्या आहेत, ग्रेगरी खुनाच्या गुन्ह्यात दोषी असल्याचे पत्रही खरं अस्तित्वात आहे आणि लपवून ठेवले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, गॅसवर चालणाऱ्या दिव्यांचा (gaslight) प्रकाश सतत कमी-जास्त होतो आहे. इतकंच

नाही, तर ग्रेगरी स्वत: घरातल्या बंद माळ्यावर जाऊन तिथले दिवे सुरू करतो आहे आणि त्यामुळे घरात इतर सगळीकडे दिव्यांमधला गॅसचा पुरवठा कमी होऊन ते खरंच मिणमिणते होताहेत. शेवटी अर्थातच असे लक्षात येते की– ग्रेगरीचा खुनाशी संबंध तर आहेच, शिवाय पॉलाचे मानसिक संतुलन पुरते ढासळले की, त्या निमित्ताने संपत्तीवर कब्जा करण्याचा ग्रेगरीचा हेतू आहे. Strange drama of a captive sweetheart! अशा वर्णनासकट झळकलेल्या या सिनेमातल्या भूमिकेसाठी इनग्रिड बर्मनला सर्वोत्कृष्ट अभिनयाचं ऑस्कर मिळालं आणि शिवाय सिनेमाला आणखी सहा ऑस्कर बक्षिसं मिळाली.

या कथाबीजाचा संदर्भ पुढे जाऊन साठच्या दशकात gaslighting ही संज्ञा तयार झाली. आजकाल gaslighting हा शब्द राजकीय नेतृत्व, मीडिया, मनोरंजन, क्रीडा या सगळ्या क्षेत्रांत वागण्यातले काही नेमके विशेष– मुख्यत: संभाषणातले– पॅटर्न दाखवून देण्यासाठी वापरला जाताना दिसून येतो. एखाद्या व्यक्तीची वास्तवाबद्दल जी काही समजूत आहे, योग्य–अयोग्यविषयीच्या ज्या धारणा आहेत, त्यांना तडा जाईल किंवा त्या व्यक्तीचे वास्तवा–संदर्भातले आकलनच कमजोर होईल, असे दुसऱ्या व्यक्तीने (जाणीवपूर्वक किंवा चुकून) बोलणे याला gaslighting म्हणतात. यामध्ये समोरच्या व्यक्तीचे म्हणणे खोडून काढणे, समोरच्या व्यक्तीचे चुकते आहे हे फारसा विचार न करता मांडणे– या आणि अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. कधी कधी gaslighting मतभेदाच्या जरासेच पुढे जाणारे, सौम्य असू शकते. मात्र अनेकदा त्याचे स्वरूप उग्र असू शकते आणि एखाद्याला सिनेमातल्या पॉलासारखे जे समोर दिसते आहे ते खरे मानावे की नाही इतक्या संभ्रमात टाकणारे असू शकते. ज्याला इंग्रजीत आपण crazy किंवा मराठीत वेडसरपणाचे म्हणतो, तसा दुसऱ्याच्या वागण्याचा अर्थ लावला जातो आणि ते तसं आहे, हे त्याही व्यक्तीला पटवून दिलं जातं.

संभाषणात gaslighting ओळखायचं कसं, याचे काही ठोकताळे आहेत. संवादामध्ये खाली दिलेल्या वाक्यांपैकी कोणती वाक्ये ऐकायला मिळतात का किंवा पुन:पुन्हा एखादे वाक्य ऐकायला मिळते का, यावरून हे ठरवता येते.

१. हे सगळं तुझ्या मनात आहे, खरं असं काही नाहीये.

२. हे सगळे तुझ्या मनाचे खेळ आहेत.

३. सारखा इतका संशय तुझ्याच डोक्यात कसा येतो? / अजिबातच कसा कधी संशय येत नाही तुला?

४. या सगळ्यात फार काही अर्थ नाही.

५. उगीच इतकं मनाला लावून कशाला घ्यायचं?

६. इतकं इमोशनल होण्यासारखं काय आहे यात?

७. तू जरा अतीच आहेस. इतकं overreact होण्यासारखं काही नाहीये.

८. तुझ्या अंगात आलंय का?

९. असं काही झालंच नव्हतं. मी तुझ्याशी खोटं बोलेन का?

१०. इतका राग येण्यासारखं काही घडलंच नाहीये.

११. जास्त विचार करू नकोस.

१२. तुझी तब्येत बरी नाही का?

१३. जग तर वाईटच आहे. तुलाच कळायला हवं होतं.

अर्थातच संवादात असे वर्तन स्त्री आणि पुरुष दोघे दाखवू शकतात. मात्र केवळ स्त्रियाच नव्हे, तर इतर शोषित गटातल्या व्यक्तींनाही खूप मोठ्या प्रमाणात gaslighting ला सामोरे जावे लागते. तृतीयपंथी व्यक्ती, स्त्रिया, लहान मुलं–मुली– सगळे जण कमी–जास्त प्रमाणात हा अनुभव घेतच असतात. Mansplaining– मॅन्सप्लेनिंगविषयीच्या चर्चेत पुरुषांना संवादात वर्चस्व राखणे हे का महत्त्वाचे वाटते आणि ते मॅन्सप्लेनिंगच्या माध्यमातून कसे केले जाते, हे आपण पाहिलेच आहे. त्याला जोडूनच gaslighting च्या संदर्भातही संवादात पुरुष वरच्या यादीतील वाक्यं म्हणताना अनेकदा दिसतात. वरील वाक्यांकडे बघितलं, तर काही निष्कर्ष अगदी सहज काढता येतात. जेव्हा व्यक्ती असं म्हणते की– इतका राग येण्यासारखं काही घडलंच नाहीये; तेव्हा किती राग म्हणजे 'ठीक' आहे, या घटनेचा राग येणे 'योग्य' आहे का– अशा अनेक गोष्टी त्या बोलणारी व्यक्ती ऐकणाऱ्याच्या मनात ठसवत असते. त्या क्षणी आलेला राग तर त्यातून 'कमी महत्त्वाचा' किंवा 'क्षुल्लक' किंवा बोलणाऱ्याला 'वैताग वाटेल असा' ठरतोच. शिवाय पुढच्या वेळेस किती, कसं, कोणत्या मुद्यावर राग वाटून घेणे 'ठीक' (agreeable) आहे, याबद्दल दुसऱ्याच्या मनात संभ्रम निर्माण करणारा ठरतो. यात भरीस भर म्हणजे जर या दोन व्यक्तींमधील नात्यातील सत्ता विषम विभागली असेल, मुळातूनच कुणी श्रेष्ठ–कनिष्ठ आहे अशा धर्तीवर नाते बेतलेले असेल, तर 'कनिष्ठ' व्यक्तीची पुष्कळच कुचंबणा होते. हे सगळं आपल्याला कुठल्याही पुरुषप्रधान (patriarchy) समाजात दिसत असतंच. मुळात पुरुष केवळ पुरुष आहे म्हणूनच त्यांचं श्रेष्ठत्व विनातक्रार मान्य केलं जातं. मग त्याला जे 'ठीक' वाटतं, त्याला जे उचित वाटतं–

त्याच्याशी मन मारून किंवा राजीखुशीने जुळवून घेण्याची जबाबदारी आजूबाजूच्या सगळ्या स्त्रियांची निश्चित असते. तसंच– त्याच्यापेक्षा कनिष्ठ असणारे इतर पुरुष (लहान भाऊ, कनिष्ठ अधिकारी, वयाने लहान कुटुंबीय), छोटी मुलं–मुली या सगळ्यांनीही आपली पायरी ओळखून वागावे, अशी अपेक्षा असते. अजूनही आपल्या समाजात कुटुंबप्रमुख ही संकल्पना कुटुंबातल्या (कर्त्या, वयाने मोठ्या, दरारा असणाऱ्या) पुरुषाशीच का जोडलेली आहे? तर, त्या व्यक्तीला जे उचित वाटेल तसेच वागायचे अलिखित बंधन इतर सर्वांवर आहे. इतकी सत्ता घरात आणि घराबाहेरही वागवणाऱ्या पुरुषांची, त्यांच्या बोलण्याची चिकित्सा होणे साहजिक आहे. म्हणूनच हे प्रमुख पुरुष काय बोलतात आणि त्यांच्या बोलण्याचे ऐकणाऱ्याच्या मनावर काय परिणाम होतात, हा भाषाशास्त्रामधल्या अर्थविन्यास (discourse) या शाखेमधला अभ्यासाचा विषय राहिला आहे.

अमेरिकी भाषाशास्त्रज्ञ स्टँटन वर्थहम असं मांडतात की– स्व:बद्दल ठरावीक, निश्चित ओळख तयार करण्याची प्रक्रिया खूप मोठ्या प्रमाणात संभाषणांमधून संवादांच्या संदर्भात घडते. एखादा मुद्दा–दृष्टिकोन जर संवादामध्ये पुन:पुन्हा, सवयीने येऊ लागला; तर एखादी व्यक्ती आपली स्वत:बद्दलची संपूर्ण ओळख (identity) त्या मुद्याभोवती गुंफते. ती व्यक्ती संवादातून पुन:पुन्हा ऐकायला मिळणाऱ्या या गोष्टींना कळत–नकळतपणे आपण कोण आहोत हे ठरवण्यासाठीचे मापदंड मानू लागते. त्यामुळे बोलणारी व्यक्ती फारसा विचार न करता जेव्हा 'काय तू, कायम पळपुटेपणा का दाखवतेस?', 'तू काही कामाचा नाहीस', 'जमणारे का तुला? तुझ्याच्यानं होणार नाही, सोड–' अशी वाक्यं उच्चारते; तेव्हा समोरची व्यक्ती आपण कोण आहोत, कोण बनू शकतो याबद्दलचे ग्रह या संवादांसंदर्भात ठरवत असते. त्यात वर म्हटल्याप्रमाणे मुळात बोलणाऱ्या व्यक्तीचे नात्यात वर्चस्व असेल, तर ही प्रक्रिया आणखी दृढ होते. घरातल्या कुटुंबप्रमुखाचे (आजोबा, चुलते, वडील) म्हणणे

मनावर घेतले म्हणून आयुष्याची, व्यवसायाची, जोडीदारनिवडीची दिशा मनाविरुद्ध बदललेले किती तरी जण आपल्यात आहेत; आपल्या आजूबाजूला आहेत.

रोजच्या आयुष्यात आपल्या आजूबाजूला दिसणारी gaslighting ची उदाहरणं सिनेमातल्या ग्रेगरीच्या वागण्यापेक्षा वेगळी असतात. कथेत नाट्य, अचंबा आणण्याकरता तिथे अनेक गोष्टी आखल्या आहेत. खऱ्या आयुष्यात gaslighting करणारी व्यक्ती संवादाच्या माध्यमातून समोरच्या व्यक्तीचे जे भावनिक manipulation करत असते, ते खूप विचारपूर्वक केलेले असते असे नाही. ग्रेगरीने पक्कं ठरवलं होतं की, आपली बायको जगाच्या नजरेत वेडी (crazy) ठरली पाहिजे. संवादात असा विचार प्रत्येक जण प्रयत्नपूर्वक करत नाही. दुसरा फरक म्हणजे– gaslighting चं वर्तन जेव्हा कुणाकडून घडत असते, तेव्हा काही 'उद्दिष्ट' (जसं ग्रेगरीला संपत्ती हडप करायची होती) त्या व्यक्तीच्या मनात नसतं. कुठलं घबाड मिळवण्यासाठी म्हणून ते समोरच्या व्यक्तीला वेडं ठरवण्याचाही प्रयत्न करत नसतात.

Gaslighting चे प्रत्येक उदाहरण लिंगभेदाचे असतेच असं नाही. मात्र, आपल्याभोवती असणारा लिंगभेद, स्त्री–पुरुषांमधले असमान नाते आणि gaslighting यांचा जवळचा संबंध आहे, असे दिसून येते. जसं की– १. पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया जास्त प्रमाणात gaslighting ला बळी पडतात. २. पुरुष मोठ्या प्रमाणात gaslighting करतात. असेही दिसून येते.

वरचे दोन मुद्दे तर आपण पाहिलेच, शिवाय–

३. अनेकदा स्त्रिया जेव्हा लिंगभेदाचे प्रश्न उपस्थित करतात, तेव्हा त्याला खूपदा gaslighting च्या स्वरूपात प्रतिसाद दिला जातो. उदाहरणार्थ– 'क्वीन' सिनेमात जेव्हा कंगना राणावतने साकारलेल्या राणीला मैत्रिणीच्या लग्नात मनोसक्त नाचायचे आहे, तेव्हा तिचा होणारा नवरा तिला बाजूला खेचतो आणि, 'हे असलं वागणं तुला शोभतं का? माझ्या आईने तुला असं नाचताना पाहिलं तर? असं नाचणं बरं का?' अशा नैतिक उलटतपासणी घेणाऱ्या प्रश्नांचा भडिमार करून तिला रडकुंडीस आणतो. 'अनेक बायका–मुली नाचताहेत, मला नाचायला आवडतं–जमतं; तर काय गैर आहे, मी स्वत:च्या मैत्रिणीच्या लग्नात नाचले तर?' या राणीच्या प्रश्नांना या संवादात फारसा थारा नाही.

४. gaslighting ला बळी पडणाऱ्या व्यक्तीच्या मनात लिंगभेदावर आधारित काही गृहीतके मुळातच तयार आहेत– या पायावर भावनिक manipulation केले जाते. उदाहरणार्थ– स्त्रिया कमकुवत आहेत हे जर बायकोलाही मनातून वाटत असेल तर, 'मला न विचारता अशी कशी परवानगी दिलीस मुलाला सहलीला जायला?'पासून 'परवानगी देणारी तू कोण?'पर्यंत कुठलाही मुद्दा गरजेप्रमाणे पटवून देता येतो.

५. जेव्हा gaslighting चा हेतू साध्य होतो, बोलणाऱ्या व्यक्तीचा स्वार्थ (कळत–नकळतपणे) साधला जातो, तेव्हा लिंगभेदावर आधारित व्यवस्थेचे जे दोष बळी पडलेली व्यक्ती समोर आणू पाहते आहे, ते दूर तर होत नाहीतच; पण अजून दृढ होतात. इथे अनेक गंभीर उदाहरणांचा विचार करता येईल. जसे की– लैंगिक शोषणाला बळी पडलेली स्त्री जेव्हा त्याबद्दल कुणाशी बोलू पाहते, तेव्हा अगदी कुटुंबीयसुद्धा– 'तुझा काही गैरसमज झाला असेल, इतकं सिरियस नक्की काही झालंय का?' असे प्रश्न उपस्थित करताना दिसतात. मुलायमसिंह यादव यांचे बलात्काराच्या दोषींना कोणती शिक्षा असावी, याबद्दलचे वक्तव्य आठवून पाहा. 'लडके, लडके है, गलती हो जाती है,' असं जेव्हा ते जाहीरपणे म्हणतात; तेव्हा किती चुकीचे वर्तन म्हणजे 'अतिशय' चुकीचे हे ठरवण्याचा मक्ता ते सहज घेतात. म्हणजे अशा अत्याचाराला बळी पडलेल्यांनी काय समजावे, तर यात काय वाटून घ्यायचं? मुलग्यांकडून 'एवढ्या चुका' तर होणारच. लेस्बियन, गे अशा अनेक व्यक्तींचे अनुभव वाचले तर त्यांना मिळालेल्या प्रतिसादात काही समान धागे बघायला मिळतात. जेव्हा त्यांनी आपली ओळख कुणासमोर व्यक्त करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा अनेकदा– 'तुला खात्रीनं असं वाटतंय का? अरे/अगं, ही एक फेज असेल– काही दिवसांनी तुला असं वाटणारही नाही बघ,' किंवा 'हे काय फॅड? असं कुठे असतं का?' असं म्हणून पूर्ण निकालातही काढलं जातं.

६. तसेच gaslighting मुळे लिंगभेदावर आधारित वागण्याचे, वृत्तीचे काही ठरावीक मापदंड अधिक बळकट होतात. 'इंग्लिश–विंग्लिश' सिनेमामध्ये शशीचा नवरा तिचे कुटुंबीय, स्वत:ची दोन मुलं, मित्र–मैत्रिणी यांच्यासमोर 'कौतुकाने' म्हणतो, 'हिचा जन्म तर उत्तम बुंदीचे लाडू करण्यासाठीच झाला आहे'; तेव्हा मुळात स्त्रियांची जागा स्वयपाकघर आहे, हा लिंगभेदावर आधारित समज आणखी घट्ट रुजतो. यातली काही उदाहरणे सिनेमातल्या घटनांवर

आधारित असली तरी त्या घटना, संवाद हे सिनेमा बनवणाऱ्यांच्या आणि आपल्या भोवतालात कायम घडताना दिसत असतातच.

असे संवाद जेव्हा पिढ्यान्‌पिढ्या घडत राहतात, तेव्हा त्यातून काही ठरावीक प्रतिमानं-कथनं (narratives) तयार होतात. गर्लफ्रेंड या कशा आपल्या बॉयफ्रेंडच्या मानगुटीवर बसून आपल्या मनासारखं वागतात, यातून crazy girlfriend असे प्रतिमान हमखास निर्माण झाले आहे. त्यावर आधारित, असंख्य मिम इंटरनेटवर पाहायला मिळतात. त्यातलं एक इथे देते आहे.

आता, 'एका तासात फोन करतो' सांगून दिवसभर फोन न करणाऱ्या व्यक्तीची नात्यात काय जबाबदारी आहे, याची चर्चा तर होत नाहीच. मुलायमसिंहांना मुलग्यांच्या वागण्यात ज्या 'साध्यासुध्या' चुका आढळतात, त्याच्या तुलनेत तर ठरल्यावेळी फोन न करणे, ही चूकही मानता येणार नाही. शिवाय हे मिम कसे problematic आहे असं एखादीने दाखवून द्यायचा प्रयत्न केला, तर बायकांना कशी विनोदबुद्धी जरा कमीच असते (किंवा नसतेच)- ही मतंही बळकट करण्याची आणखी एक संधी मिळते. या सगळ्याचा शेवट 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' असा होतानाच अनेकदा दिसतो.

भ्याड हल्ल्यात मारल्या गेलेल्या गौरी लंकेश यांच्या घृणास्पद मृत्यूनंतर ट्विटरवर एक जण म्हणतो- 'एक कुतिया कुत्ते की मौत क्या मरी, सारे पिल्ले एक सूर में बिलबिला रहे है,' ही आणि अशी अनेक अवमानकारक, प्रक्षोभक वक्तव्ये करणाऱ्या त्या एकाला आपले पंतप्रधान मोदी ट्विटरवर फॉलो करतात. हा त्यातला आणखी एक बारकावा. त्या घटनेनंतर आज तीन वर्षांनंतरही करत आहेत. अशा वक्तव्यांना संस्थात्मक पातळीवर दिली जाणारी मान्यता दाखवून देणे, हा या उदाहरणाचा मुख्य हेतू आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कित्येक वर्षांच्या सातत्यपूर्ण वापरातून 'crooked Hillary' ही शब्दजोडी आणि त्यातले प्रतिमान अनेकांच्या मनात पक्के ठसवले. आता ते डेमोक्रॅटिक पक्षाकडून उपराष्ट्राध्यक्षपदाच्या दावेदार बनलेल्या कमला हॅरिस यांना 'crazy lady', 'ill and angry mad woman' अशी नावं आणि त्यांच्याबरोबर येणारी प्रतिमानं योजण्यात मग्न आहेत.

खासगी, वैयक्तिक नात्यातल्या कुचंबणेपासून ते जगातल्या सगळ्यात बलाढ्य राजकीय रंगमंचापर्यंत ही अवहेलना स्त्रियांच्या वाटेला येते आहे. ज्या भावनिक manipulation वर या सगळ्याचा तोल सावरून आहे, त्यातल्या manipulation ला मराठीत चपखल शब्दही सहज मिळत नाही. mansplaning, gaslighting अशा एकाच वेळी व्यापक आणि गुंतागुंतीच्या संकल्पनांचे अजून मराठीच्या भाषाशास्त्राच्या शाखेने नेमके संहितीकरण केलेले दिसून येत नाही. समाजात विविध पातळ्यांवर चर्चा होण्यासाठी, खऱ्या बदलाची सूत्रं गोवली जाण्यासाठी, ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी अशा संकल्पना अस्तित्वात आहेत, याची प्राथमिक माहिती तर असणे आवश्यक आहे. आपण जे अनुभवतो आहोत, तो आपल्या एकटीचा अनुभव नाही; तर जगभरात अनेक स्त्रियांना येणारा हा अनुभव आहे, त्याला नाव आहे, त्या अनुभवांच्या विचारपूर्वक विभागण्या (categories) केल्या आहेत, मला येणाऱ्या अनुभवांचा कुठे तरी शिस्तशीर अभ्यास होतो आहे- ही माहिती खूप महत्त्वाची आणि दिलासा देणारी आहे. स्वत:च्या अनुभव-विश्वाची अशा प्रकारे दखल घेतली जाणे आणि आपले विचार वैध ठरवले जाणे (validate) अतिशय समाधानकारक आहे. व्यक्तीचा स्व बळकट होण्यासाठी, आतून स्वत:बद्दल विश्वास वाटण्यासाठी या सगळ्या अनुभवांची पद्धतशीर विभागणी होणे याचे खूप मोठे योगदान आहे. आणि हे काम सामाजिक व भाषिक अशा दोन्ही पातळ्यांवर एकाच वेळी व्हायला हवे आहे. आजच्या काळाची ती निकड आहे.

अपर्णा दीक्षित, पुणे
aparna.a.dixit@gmail.com
Mob. 9881670840

गांधींचे गारूड

संजीवनी खेर

तुजविण सख्या रे...

मार्गारेट- अमला ही मनाने नि उद्दिष्टाने प्रामाणिक होती. पण गांधींजवळच राहायला मिळावं, हा तिचा अट्टहास पुरा होणं अशक्य होतं. तिचे वागणे सुधारणे हा गांधींच्या जीवनातला प्रमुख उद्देश होऊ शकत नव्हता. गांधींसाठी आपण प्राण देऊ, वगैरेंसारखी भाषा ती करीत असे. गांधींनी एकदा काही कारणाने उपोषण केले तर ती अडून बसली की, त्यांनी तसे करू नये. गांधी अर्थातच निश्चयाचे पक्के होते. तर, हिने त्यांच्या विरोधात उपोषण आरंभले. गांधी म्हणाले, ''करू दे तिला उपास, जरा वजन कमी होईल.'' अर्थातच दोन दिवसात तिने ते मागे घेतले. ती त्यांना पत्र लिहिताना 'तुमची अनुयायी' अशी सही करीत असे. त्यावर त्यांनी तिला चिडून लिहिले, 'प्रिय अमला बेटी, तुझे वागणे दिवसेंदिवस वेडेपणाचे होत चालले आहे. कधी तर मूर्खपणाही करतेस. तू एवढी ताळतंत्र सोडून वागशील, असे वाटले नव्हते. तू अत्यंत संशयी नि अतिउतावळी बनत चालली आहेस.

गांधींच्या स्त्री सहकाऱ्यांबद्दल लिहिताना आपण काही शब्दांची, वाक्यांची पुनरावृत्ती करतोय की काय, असे वाटू लागते. कारण ज्या परदेशी स्त्रिया सर्वस्व त्यागून इथं येत होत्या, त्या गांधींच्या व्यक्तित्वाने भारलेल्या होत्या. प्रसिद्ध (स्त्री) पुरुषांबाबत ह्या घटना आजही होत असतातच; पण गांधींसारख्या फारच थोड्या व्यक्ती हे सारे जाणून त्या स्त्रियांना हिंदुस्थानातील सामाजिक कार्यात जोडून घेऊन कामाला लावत. अनेक जणींशी लेकीचे, मैत्रीचे नाते जोडत. आपल्याकडे आपण नात्याने जोडले गेलो की, ते निभावण्याची वृत्ती जागी होते. गांधींनी तर साऱ्या जगाशीच जिव्हाळ्याचे नाते जोडले. विदेशी स्त्रियांनी कदाचित ह्या माणसाला त्यांच्या संस्कृतीतील महात्म्यांच्या तुलनेत जोखले असेल. त्यातील बहुतेक जणींना गांधी ही व्यक्ती जीझस ख्राइस्ट वा सॉक्रेटिससारखी वाटली होती. ह्यात गांधींचा नैतिक अधिकार, शुचितापूर्ण जीवन, सत्यनिष्ठा, त्यांचे स्खलनशील वागणे, स्त्रियांबद्दल वाटणारे शारीरिक आणि त्या पलीकडे जाणारे वर्तन सारेच एक गूढ रहस्यमय वाटले, त्यात आश्चर्य नव्हते. त्यांचा माणसांचा संग्रह पाहिला की, ह्या माणसाने एकच आयुष्य जगले की अनेक, असे वाटून जाते. आपल्याला आपले चार नातेवाईक नि बोटांवर मोजण्याइतके मित्रगण यांच्याशी संपर्क ठेवताना कटकट होते. त्यांचे प्रश्न नि आस्था ह्यापासून दूरच राहणे आपण पसंत करतो. कोण नसत्या झंझटीत पडणार, अशी आपली सर्वसाधारण मनोवृत्ती असते. आपण भले नि आपले कामकाज भले- याहून डोक्याला ताप नको असतो. अडी-अडचणीला मात्र आपल्याला साऱ्यांची आठवण येते. पण मग अशा नात्यातून किती प्रेम, मदत मिळणार? इथे तर कुठलीच अपेक्षा न करता केलेलं प्रेम नि लोकांना सन्मार्गावर नेण्यासाठी केलेले प्रयत्न पाहून कुणीही थक्क होईल. देशव्यापी स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व, अनेक सामाजिक सुधारणांसाठी अथक प्रयत्न, त्यासाठी लोकांना प्रवृत्त करणं हे. वाचायला लागलं की, अचंबित होण्याला पर्याय नसतो. आपली माणसं ही संज्ञा त्यांच्या दृष्टीने सर्व विश्वातील माणसं अशी होती. आणि आज एकविसाव्या शतकात आपण जाती, धर्म, संस्कृतीच्या विळख्यात

अधिकच गुरफटत आहोत. पण हिंदुस्थानात सत्तेव्यतिरिक्त असलेल्या अनेक बेड्या तोडायला देशी-विदेशी जे कुणी पुढे येतील, त्यांची मदत घ्यायला त्यांनी मागे-पुढे पाहिले नाही. कारण राजकीय कामातला विदेशींचा सहभाग ब्रिटिश सत्तेने खपवून घेतला नसता नि त्या विदेशींना विनाकारण त्रास झाला असता. गांधींकडे येणाऱ्या महिला ह्या नैतिकतेच्या निष्ठेच्या तत्त्वांच्या आकर्षणामध्ये येत, याचा अर्थ त्या स्वत: मोठ्या आदर्श जीवन जगणाऱ्या स्त्रिया होत्या असं नाही. त्याही राग, लोभ, मद, मत्सर, स्वार्थ यांच्या आहारी जाऊन वागणाऱ्या होत्या. त्यांना अधिक वाहवत न जाऊ देता त्यांना कार्यावर लक्ष केंद्रित ठेवायला लावणं यासाठी हे एखाद्या मानसतज्ज्ञाची मदत आवश्यक होती. पण गांधींनी त्या स्त्रियांकडून नि सरकारकडून योग्य ते चातुर्याने करवून घेतले.

जर्मनीची मार्गारिट स्पीगल ही एक मनस्वी, विचार करणारी, कष्टाला तयार असलेली ज्यू तरुणी होती. वास्तविक तिच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. गांधींची नि तिची पत्रे आहेत. जर्मन वृत्तपत्रांतूनही तिच्याबद्दल फारसे लिहिले गेलेले नाही. स्वभावाने ती हट्टी, तापट, आकसाने वागणारी होती. एका धनाढ्य व्यापारी घराण्यात ती जन्मली (१८९७). बालपणापासूनच तिला वाचनाची खूप आवड होती. त्या काळात तिच्या हाती पडले हिंदुस्थानातील तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ आणि रोमाँ रोलाँचे गांधींचे चरित्र. स्टेट लायब्ररीतून ती हिंदुस्थानाविषयी जे-जे मिळेल ते झपाटल्यासारखी वाचत सुटली. हिंदुस्थानात यायचा ध्यास तिला लागला. ह्याच काळात तिने बॉन विद्यापीठातून पीएच.डी.ची पदवी प्राप्त केली. तिला युरोपियन भाषांचे चांगले ज्ञान होते. शिक्षणक्षेत्रात काम करायची तिची मनीषा होती. त्याच काळात जर्मनीतील वातावरण बिघडत चालले होते. ठरलेला अभ्यासक्रम नसल्याने ती कॉलेजात इंग्रजीच्या वर्गात गांधींच्या लिखाणाविषयी शिकवू लागली, परंतु गांधींना भेटायची इच्छा तिला स्वस्थ बसू देत नव्हती. तिने रजा घेतली आणि तिथून भारताकडे प्रयाण केले.

तिने गांधींना पाहिले ते येरवडा जेलच्या प्रांगणात. एका विशाल आंब्याच्या पारावर ते बसलेले होते. कैदी त्यांना नमस्कार करत होते. जेलर हात जोडून अदबीने त्यांच्याशी बोलत होता. जणू एखादा प्रेषित उपदेश करीत असावा, असा भक्तिभाव साऱ्यांच्या चेहऱ्यावर होता. जीझस वा

त्यानंतर त्या दोघांत काय झाले, हे कळत नाही. कारण ती अचानक शांतिनिकेतनमध्ये फ्रेंच शिकवायची नोकरी घेऊन निघून गेली. तिथले वेगळे प्रसन्न वातावरण, सौंदर्यासक्त कवीच्या सहवासात शिकवण्यात ती चांगलीच रमली. छान साड्या नेसू लागली. बरं दिसायचा प्रयत्न करू लागली. गांधींचे विचार, जीवनशैली तिने टाकून दिली. जणू त्यांच्या प्रभावक्षेत्राबाहेर पडून तिने आपल्या स्वभावानुसार मोकळा श्वास घेतला. पण तिथेही ती फार काळ राहिली नाही. तिथून ती मुंबईला चांगल्या पगाराच्या नोकरीवर रुजू झाली. परत जर्मनीला जाण्याची, आईला भेटायची व इथे आणायची स्वप्नं रंगवू लागली. स्वत:ला अमलावजा मार्गारिट म्हणवून घेऊ लागली.

सॉक्रेटिसचे दर्शन घडलेय, असे तिला वाटत होते. जणू एक तेजोवलय त्या माणसाभोवती होते. तिचे मन भरून आले होते. 'आपली सेवा करायची आहे' असे तिने सांगितले; तेव्हा तिला त्यांनी 'शाकाहार कर, इथली काचेची भांडी आज तू धुऊन ठेव' असे सांगितले. त्यानंतर 'पत्रं लिहीत राहा' असे तिला सुचवले. ती थोड्या काळासाठीच इथे आली होती त्यामुळे परतणे भाग होते. तेवढ्यात तिने आश्रम-जीवन पाहून घेतले. तेथील शिस्त, पवित्र वातावरण तिला आवडले होते. काही काळ तिने हरिजनसेवेचे कामही केले. ती शांतिनिकेतनलाही जाऊन आली. तिथे रवींद्रनाथांचे व्यक्तिमत्त्व आणि तेथील शिकवण्याचे वातावरण पाहून ती प्रभावित झाली. आपला अनुभव तिने गांधींना बोटीवरून कळवला. त्यावर गांधींनी लिहिले की, यदाकदा जर आपण परत भेटलो, तर तू अशी माझ्यामुळे भारावून जाऊ नकोस. तू मला लेकीसारखी आहेस. जेव्हा मनात येईल, तेव्हा तू लिहीत जा.

तिनेही इथला अनुभव त्यांना कळवला होता. आपण रवींद्रनाथांच्या दिसण्या-वागण्याने कसे प्रभावित झालोत आणि तुमच्यात नि त्यांच्यात निवड करणे कसे अवघड आहे, हेही कळवले होते. गांधींच्या मते, अशी निवड करणे योग्य नाही. दोघांचीही तत्त्वे पाळणे हा त्यावर उपाय आहे.

सारखी-सारखी युरोप ते हिंदुस्थान अशी ये-जा करणे व्यवहार्य नाही. थोड्या काळासाठी इथे येऊन काहीच साध्य होणार नाही. तुला आईची जबाबदारी पार पाडायची आहे, तर तिथे राहून नोकरी करणे श्रेयस्कर आहे. तिथे इथून दूर राहूनदेखील तू इथे येऊन जे काम करशील, ते करता येईल. मनात फक्त इथल्या कामाचे स्मरण ठेव. त्याबद्दल विद्यार्थ्यांशी बोल. तिथे मिळवलेले पैसे तुला वाटले तर इथल्या हरिजनसेवेच्या कामासाठी पाठव.

दरम्यान, तिने इकडे यायचा निश्चय पक्का केला होता. तिच्या विद्यार्थ्यांना अहिंसा वगैरे फारसे पटत नव्हते. जर्मनीत ज्यूविरोध वाढत होता. प्रवासावर बंदी येण्याअगोदर तिथून बाहेर पडायचा निर्णय तिने घेतला. गांधींनी तिला तिथेच आपल्या देशावासीयांबरोबर राहून त्यांची साथ देण्यास सुचवले होते. 'इथे येऊन नोकरी करून आश्रम-जीवन जगता येणार नाही. इथे सर्वस्वाने झोकून सेवाभावाने काम करणे अपेक्षित आहे. आईजवळ राहून तिची सेवा महत्त्वाची आहे. इथे जसं जीवन जगली असतीस, तसेच तिथे साधे शाकाहारी जीवन जगत राहा. इथं येऊन पैसे कमावून आश्रम-जीवन शक्य नाही. तू तुझ्या आजवरच्या पत्रांत फक्त माझ्याबद्दल काय वाटते ते लिहिले आहेस. तसं लिहू नकोस. तुझे विद्यार्थी, विद्यापीठातले अनुभव, तुझे सहकारी यांविषयी लिही. यायची घाई नको. फार उतावळेपणाने निर्णय घेऊ नको. गीता वाचतेस ना?' परंतु हे पत्र मिळायच्या अगोदरच तिने बोटीत पाय ठेवलेला होता. जर्मनीत ज्यूंवर बंधनं यायला सुरुवात झाली होती. तिला तिचे इतर सहकारी 'अर्धी आशियाई' म्हणून हिणवू लागले होते. तिला गांधींबद्दल अनिवार आकर्षण वाटत होते. ते त्यांच्या लक्षात आलेच होते, त्यामुळे त्यांनी तिला वर्धा येथे न पाठवता साबरमतीलाच हरिजनसेवेत समाविष्ट करून घेण्यास नारायणदासांना कळवले.

ती हुशार आहे, पण उतावळी आहे. तिचे भाषाज्ञान उत्तम आहे. त्याचा वापर मुलांना इंग्रजी शिकवायला करता येईल, असेही सुचवले. इथे येताच ती थेट पुण्याला जाऊन येरवड्याला गांधीजींकडे जाऊन पुन्हा पारावर बसायची विनंती केली. त्यांच्या पुढे नतमस्तक होऊन तिने आश्रम निवासाच्या शपथा घेतल्या. गांधीजींनी तिला 'अमला' हे नाव दिले. तिची सहकारी म्हणा, टीकाकार म्हणा- निल्ला नगिनी (जिच्याविषयी ह्या सदरात लिहिलेय) तिच्याबद्दल 'जिचे अजून कुणी चुंबनही घेतलेले नाही अशी स्त्री' असे वक्तव्य केले होते. अमलाला- मागरिटला- गांधीजी म्हणाले होते, ''निल्ला नागिनी ही पतिता होती, आता संत झालीय. तिचा आदर्श तू ठेव.''

त्या दोघी जणी गांधींना भेटायला बरोबरच जात असत. एकदा त्या दोघी आणि निल्लाचा छोटा मुलगा गांधींकडे गेले, तेव्हा छोटा सिरिओस महादेवभाईंच्या अंगावर चढत होता. मागरिटने धसमुसळेपणाने त्याला खाली ओढले. ते पाहून गांधींना राग आला. त्यावर ती म्हणाली, ''मी माझ्या कुत्र्याला असेच वागवते. ती निल्ला ही ढोंगी आहे. तिची पुरुषांना फूस लावून, नादी लावण्याची सवय गेलेली नाही. ती माझी मैत्रीण होऊ शकत नाही.'' ते ऐकून तर त्यांना खूप अस्वस्थ वाटले. मागरिटला साडी नीट नेसता यायची नाही. त्यामुळे बहुधा ती पाश्चात्त्य वेषात असे. साडी नेसली तरी साडीचा बोंगा जमिनीवर लोळत असे. मातीत मळत असे. ती कधी स्वच्छ कपड्यांत दिसली नाही. सदा चिडचीड करायची. आश्रमातील कामासाठी वेळवर यायची नाही. आली की, मग जीव ओतून काम करायची. तिने जाहीर केलं की, मी आपलं जीवन गांधीजींसाठी खर्च करणार आहे. माझ्या साऱ्या वस्तू आश्रमाला देऊन टाकेन. त्यांना ज्या नको असतील त्या फेकून न देता, ज्यांना त्याची गरज आहे त्यांना देऊन टाकाव्यात. माझ्या अंतिम क्रियेसाठी खर्च नको म्हणून मी माझा देह ससून हॉस्पिटलला देऊन टाकलाय. ते करावे.

मागरिट- अमला ही मनाने नि उद्दिष्टाने प्रामाणिक होती. पण गांधींजवळच राहायला मिळावं, हा तिचा अट्टहास पुरा होणं अशक्य होतं. तिचे वागणे सुधारणे हा गांधींच्या जीवनातला प्रमुख उद्देश होऊ शकत नव्हता. गांधींसाठी आपण प्राण देऊ, वगैरेंसारखी भाषा ती करीत असे. गांधींनी एकदा काही कारणाने उपोषण केले तर ती अडून बसली की, त्यांनी तसे करू नये. गांधी अर्थातच निश्चयाचे पक्के होते. तर, हिने त्यांच्या विरोधात उपोषण आरंभले. गांधी म्हणाले, ''करू दे तिला उपास, जरा वजन कमी होईल.'' अर्थातच दोन दिवसात तिने ते मागे घेतले. ती त्यांना पत्र लिहिताना 'तुमची अनुयायी' अशी सही करीत असे. त्यावर त्यांनी तिला चिडून लिहिले, 'प्रिय अमला बेटी, तुझे वागणे दिवसेंदिवस वेडेपणाचे होत चालले आहे. कधी तर मूर्खपणाही करतेस. तू एवढी ताळतंत्र सोडून वागशील, असे वाटले नव्हते. तू अत्यंत संशयी नि अतिउतावळी बनत चालली आहेस. तुला कुणी

सांगितलं की, तुला मी परक्यासारखी वागवतो? तू स्वत:ला माझी अनुयायी म्हणवतेस, पण माझं अनुयायीपण कुणीच करू नये. मी स्वत:च स्वत:ला अनुसरतो. त्याहून अधिक ओझं मला नकोय. मला अनेक पुत्र-पुत्री, भगिनी, बंधू आहेत नि हव्या आहेत. अनुयायी नकोत. ही कसली अनुयायी, जी आपल्या गुरुवरच शंका घेते! तुला जर युरोपियन पद्धतीने जगायचे असेल तर ते निश्चयाने कर, अन्यथा इथल्यासारखे स्वीकार. एकदाचे जे काय हवे ते ठरव. सारखी दोलायमान मन:स्थिती ठेवू नकोस. माझ्या सहवासाची अपेक्षा करीत असशील, तर लक्षात ठेव- ते अशक्य आहे. कल्पना कर- तुरुंगात माझ्यासमवेत त्याच वऱ्हांड्यात अनेक कैदी असतात, म्हणजे ते माझ्याबरोबर असतात का? शरीराने बरोबर असणे म्हणजे 'सह' असणे नाही. तू जिथे असशील तिथे माझे काम करीत असशील तर माझ्या 'सह'च आहेस, हे ध्यानी ठेव. माझ्यासाठी मरायची भाषा भित्रेपणाची आहे. तुझ्यावर कुणीही दडपण आणत नाहीये. जो निर्णय घ्यायचाय तो शूरपणाने व हिमतीने घे नि ठामपणे त्याप्रमाणे वाग.'

याचदरम्यान मार्गारेट-अमलाने एका जर्मन नियतकालिकासाठी गांधी आणि त्यांची स्त्रीविषयक धारणा यावर लेख लिहिला. त्यात तिने लिहिले की, गांधींना स्त्रीचा आत्मा कळला आहे. त्यांची स्त्रियांच्या आत्मिक शक्तीवर भिस्त आहे. त्याग, निष्ठा, भक्ती या सर्वच बाबतींत स्त्रिया पुरुषांहून अधिक श्रेष्ठ आहेत, असा त्यांचा ठाम विश्वास आहे. त्या मानवजातीच्या सशक्त अर्धांगिनी आहेत, अबला नाहीत- असे त्यांचे मत असल्याचे नोंदवले आहे.

गांधीबद्दलचे तीव्र आकर्षण नि आपल्याला आयुष्यात नक्की काय करायचंय ह्याबाबत अनिश्चितता, या वादळात अमला हिंदोळत होती. तिला विवाह करून स्थिरावण्याची मनीषा होती. मुलंबाळं-संसार ह्याकडे तिचा कल वाढत होता. ह्याच वेळी गांधीजींचा थोरला मुलगा हरिलाल ह्याने आपल्या धाकट्या वहिनीकडे, पत्नीच्या निधनानंतर एकाकीपण असह्य होत असल्याने पुनर्विवाह करायची इच्छा व्यक्त केली होती. वडिलांशी संबंध थोडे ठीक होऊ लागले होते. त्यांच्या कानी हे गेल्यावर हरिलालने एखाद्या विधवेशी विवाह करायचा विचार करावा, असे सुचवले. इकडे अमलालाही लग्नाची इच्छा होती. अमलाशी महादेवभाईंनी बोलावे, असे हरिलालने सुचवले; पण गांधी म्हणाले, ''त्याने स्वत:च लिहावे. किंवा महादेवभाईंना स्वत:हून वाटले तर त्यांनी तिच्याकडे चौकशी करावी. मी त्यात ढवळाढवळ करणार नाही. माझे नाव घेऊ नये.'' हरिलाल व अमलाची भट कधी तरी झालेली असावी, पण ठोस पुरावा नाही. हरिलालची पणती आणि त्याची चरित्रकार हिने लिहिलेय की- त्या दोघांचा पत्रव्यवहार झाला होता, पण तिच्या पत्रातील काही मजकुरावर दोघांचे पटले नाही, हरिलालला तिचे लिहिणे आवडले नाही. हरिलालला वडिलांनी लिहिले, 'तिच्या पत्रावरून घाईने निर्णय घेऊ नकोस. तू हा विचार सोडून द्यावास. तू तिला स्पष्टपणे लिहावेस की, पुढे मुलंबाळं झाल्यावर ती साधेपणाने वाढतील. जे काही देवाच्या दयेने कमवाल, त्यात राहा. तू पुन्हा पिऊ लागलास वा माडीवर जाऊ लागलास, तर तिने तुला तत्काळ सोडावे. तिला जोवर तुझ्याखेरीज राहता येणार नाही असे वाटून ती तुला तसे लिहीत नाही, तोवर वाट पाहा.'

त्यानंतर त्या दोघांत काय झाले, हे कळत नाही. कारण ती अचानक शांतिनिकेतनमध्ये फ्रेंच शिकवायची नोकरी घेऊन निघून गेली. तिथले वेगळे प्रसन्न वातावरण, सौंदर्यासक्त कवीच्या सहवासात शिकवण्यात ती चांगलीच रमली. छान साड्या नेसू लागली. बरं दिसायचा प्रयत्न करू लागली. गांधींचे विचार, जीवनशैली तिने टाकून दिली. जणू त्यांच्या प्रभावक्षेत्राबाहेर पडून तिने आपल्या स्वभावानुसार मोकळा श्वास घेतला. पण तिथेही ती फार काळ राहिली नाही. तिथून ती मुंबईला चांगल्या पगाराच्या नोकरीवर रुजू झाली. परत जर्मनीला जाण्याची, आईला भेटायची व इथे आणायची स्वप्नं रंगवू लागली. स्वत:ला अमलावजा मार्गारेट म्हणवून घेऊ लागली. गांधीजी आणि तिच्यातील पत्रव्यवहार आता ताणरहित होत गेला. आईची व तिच्या पाळीव कुत्र्याची चौकशी, तिच्या कॉलेजातील सहकारी, तिची प्रकृती अशा साध्या गोष्टी ती लिहीत असे. त्यांचं तिला लिहिलेलं अखेरचं पोस्टकार्ड- त्यावर ते लिहितात, 'अखेर तू स्थिरस्थावर झालीस म्हणायचं.' अखेर तिने बडोद्याच्या महाराणी विद्यालयात नोकरी धरली. तिथेच मुख्याध्यापिका झाली, १९६८ मध्ये १३ जूनला गांधींच्या आठवणी लिहायच्या अपुऱ्या ठेवून मुंबईतच वारली.

संजीवनी खेर, मुंबई
sanjeevanikher@gmail.com
Ph. 9821411472, 02224141669

विज्ञानाने मला काय दिले?

हिनाकौसर खान

विज्ञानाने ते रुजणं कॉक्रीट केलं

माझ्यात समतावादी विचार रुजण्यात विज्ञानाची मदत झाली. स्त्री आणि पुरुष यांच्यात शारीरिक फरक असला तरी दोन्ही प्रकारच्या जीवरचना आपल्या जीवसृष्टीसाठी आवश्यक असतात, तेव्हा कशाला उगीच बाऊ करायचा हेही शिकवलं. वयोमानानुसार निरनिराळ्या ऊर्मी असतात, आसपासच्या निरीक्षणांतून कुतूहलं असतात आणि ती त्या त्या वेळी शमवता आली तर त्यांचाही बाऊ करण्याची गरज नसते. याच संस्कारामुळे कदाचित आज मी माझ्या मुलाला वाढवताना त्याला तो 'स्ट्राँग आहे' असं म्हणताना तो पुरुषासारखा स्ट्राँग आहे असं म्हणत नाही. त्यानं त्याच्या जेवणाचं ताट उचललं नाही तर 'मुली बघ कशा उचलतात,' असं म्हणत नाही. त्याला काजळ लावून पहावंसं वाटलं, बहिणींचं पाहून गजरा डोक्यावर ठेवून पाहावासा वाटला, किचनमध्ये लुडबूड करावीशी वाटली– तर आम्ही कुणीही त्याला अडवत नाही.

विज्ञानशाखेत प्रवेश करताना या शाखेतच करिअर करण्याचं कुठलंही ध्येय समोर नव्हतं. निव्वळ दहावीत चांगले गुण मिळाले आहेत, या एका निकषावर अकरावी सायन्सला प्रवेश घेतला. कुटुंबात मी मोठी असल्याने मोठ्यांकडून किंवा समवयस्कांकडून मार्गदर्शन मिळण्याची शक्यताही नव्हती. शेवटी सगळे म्हणतायत, या तत्त्वाला नमस्कार करून विज्ञान शाखेची विद्यार्थिनी झाले.

अकरावीच्या अगदी सुरुवातीच्या महिन्यांतच माहितीचं ज्ञानात रूपांतर करण्याची नवी दृष्टी मिळाली. झालं असं होतं की, बायोलॉजीमध्ये रिप्रॉडक्टिव्ह सिस्टीम शिकत होते. स्त्रियांच्या शरीरात एक्सएक्स क्रोमोझोम्स आणि पुरुषांच्या शरीरात एक्सवाय क्रोमोझोम्स असतात. एक्सएक्स क्रोमोझोम्सच्या संयोगानं मुलगी आणि एक्सवाय क्रोमोझोम्सच्या संयोगानं मुलगा होतो, अशी माहिती बायोलॉजीचे शिक्षक देत होते. त्या वयात आधी वाटलं की, दोघांकडेही सारखेच क्रोमोझोम्स असायला हवे होते. असे चित्रविचित्र प्रश्न पडण्याची मुभा इथूनच मिळायला लागली. हवे ते प्रश्न विचारण्याचं, उत्तर सापडत नसलं तरी प्रश्नांच्या मागं लागण्याचं धैर्य होतं. त्याच दिवसांत माझ्या नात्यातल्या माझ्याहून एखादं वर्ष मोठ्या बहिणीचं लग्न झालं. ती भेटायला म्हणून आमच्या घरी आली होती. तिला मी मुलगा-मुलगी जन्मामागचं विज्ञान सांगितलं. ती म्हणाली, ''बरं झालं सांगून ठेवलंस! उद्या जर मुलगी झाली आणि नवऱ्याकडचे कुणी जर त्याचा दोष मला देऊ लागले तर त्यांना लगेच म्हणेन अहो, माझ्याकडे तर दोन्ही एक्सच आहेत. म्हणजे दोष द्यायचा असेल तर तुमच्याच मुलाला द्या!'' हे ऐकून तेव्हा एकदम भारी वाटलं. पहिल्यांदा जाणवलं– अशी योग्य सापेक्ष माहिती... विज्ञान हे तर एक टूल आहे, एखाद्या संभाव्य अन्यायाविरुद्ध उभं राहण्याचं बळ देणारं!

दरम्यान, शैक्षणिक स्तरावर मन लावून अभ्यास सुरू होता तरी पुढच्या आयुष्याची भिस्त ज्या शिक्षणावर होती, त्याबाबत थोडासा विस्कळीतपणाच होता. आपल्याला डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक-प्राध्यापकही व्हायचं नाही, याबाबत पुरेशी स्पष्टता होती. पण आपल्याला काय करायचंय, याबाबत अजिबातच स्पष्टता नव्हती. त्यामुळे

बारावीनंतर बी.एस्सी. करण्याचं ठरवलं. बी.एस्सी. करताना आपल्याला हवा तो मार्ग सापडेल- किमान शोधाशोध करायला तीन वर्षांचा अवधी तरी मिळेल, हा विचार होता. 'गो विथ फ्लो' असं काहीसं सुरू होतं. खरं तर बारावीनंतर असं वाटू लागलं की, आपण आर्ट्सला प्रवेश घ्यायला हवा होता. वाचन-लेखनात अधिक रस आहे अशी जाणीव तेव्हा होऊ लागली होती. त्या वेळी मी आबेदा इनामदार कॉलेजमध्ये शिकत होते. कॉलेजच्या लायब्ररीतून विज्ञानविषयक संदर्भ पुस्तकांबरोबरच हिंदी-मराठी कथा-कादंबऱ्यांची पुस्तकं घ्यायचे. त्या वेळेस खरं तर लायब्ररीयन अशा काही पाहायच्या की, मी परग्रहावरून अवतरले आहे! अर्थात भाषेविषयीची पुस्तकं घेणारे आर्ट्स शाखेचेच विद्यार्थी असतात, असा त्यांचा अनुभव तरी असणार किंवा तसा त्यांचा समज तरी असणार.

शेवटी, दुसरे वर्ष संपता-संपता आपण पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचं, हे निश्चित झालं. बी.एस्सी. झाले तोवर मला अधून-मधून वाटायचं की, आपण सायन्स स्ट्रीमची निवड करून चुकलो. आपल्याला यात करिअरही करायचं नाहीये तरी आपण काय वेडेपणा करतोय, असंही वाटायचं. पण जेव्हा पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागात प्रवेश घेतला; तेव्हा जाणिव झाली की, कळत-नकळत आपल्यावर विज्ञानशाखेचे आणि एकूणच विज्ञानाचे बरेच संस्कार झालेले आहेत. ते असे संस्कार होते की, त्याचं ज्ञान कुठंही मार्गदर्शकच ठरणार होतं.

एखादी गोष्ट खोलात जाऊन आणि सर्व बाजूंनी पडताळणं, कठीण कारणमीमांसा करणं हा विज्ञानाचा विशेष आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष फिल्ड रिपोर्टिंग करताना अधिक उपयुक्त ठरली. बातमीसाठी चौकस असणं, कुतूहल बाळगणं या बाबी पत्रकारितेसाठी अत्यंत आवश्यक आहेत. मात्र चौकसपणातून हाती येणाऱ्या माहितीचं पृथक्करण करणं, माहितीवर प्रोसेस होऊ देणं, हाती असलेल्या माहितीच्या दृष्टीने इतर कुठले घटक आवश्यक आहेत, त्याचा अभ्यास करणं- या बाबी विज्ञानाच्या संस्कारातून आल्या होत्या. बातमीदारीत नकारात्मक माहितीचा अधिक पुरस्कार केला जातो. एखादी माहिती जितकी निगेटिव्ह तितकी ती महत्त्वाची बातमी. या नकारात्मकतेत घडणारे छोटे-छोटे बदलही महत्त्वाचे असतात आणि ते टिपकागदासारखे टिपत जाण्याचा धडा विज्ञानाच्या अभ्यासातून आला होता. चांगले मोठे बदल एका दिवसात होत नसतात. त्याला वेळ लागतो आणि त्या बदलत्या प्रक्रियांचा वेग कितीही मंदावलेला असला तरी त्याची त्या-त्या वेळी नोंद करणं आवश्यक असतं. प्रत्येक बदलाकडे डोळसपणे आणि पूर्वग्रहाची मर्यादा आखून न घेता पाहणं, ही महत्त्वाची शिकवण विज्ञानाने मला दिली. आपण जे लिहीत आहोत, त्यातून कुठल्याही प्रकारच्या अंधश्रद्धांना बळकटी मिळत नाहीये ना, चुकीची वा अपूर्ण माहिती तर देत नाहीये ना, याचं भान हळूहळू येत गेलं ते याच शिकवणुकीमुळे.

इतकंच नव्हे तर नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य, चूक-बरोबर या सगळ्या व्यक्तिसापेक्ष आणि घटनासापेक्ष गोष्टी आहेत. अमुक परिस्थितीत तमुक रसायनं एकत्र आली की अमुक-तमुक रिॲक्शन्स होतात, ही बाब लक्षात आल्यानंतर कौटुंबिक पातळ्यांवरचा गोंधळ डोळसपणे आणि तटस्थपणे पाहण्याची दृष्टी दिली. कोर्टबातमीदारीत तर त्याचा अधिकच फायदा झाला. माणसां-माणसांमधल्या आकळणाऱ्या व न आकळणाऱ्या अशा कित्येक ॲक्शन-रिॲक्शन्स तटस्थपणे पाहता आल्या.

सतत प्रयोगशील राहण्याची उर्मीदेखील विज्ञानामुळे वृद्धिंगत होत गेली. एखादा शोध लागल्यानंतर संशोधकांचं काम संपत नाही, उलट तिथून त्यातील अधिक बारीक कंगोरे शोधण्या-तपासण्याचं काम सुरू होतं. तसंच काहीसं- एखादा विषय केल्यानंतर तो संपत नाही; तर तिथून कदाचित त्या विषयाचे नवनवे कंगोरे आपल्याला शोधण्या-तपासण्याची गरज असते, हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार याचमुळे आतमध्ये मुरत गेला. प्रयोगशीलतेत सतत नावीन्याचा ध्यास ही बाबही अध्याहृत आहे. नवनवीन माध्यमांचे प्रयोग करण्याचं धाडस, त्या-त्या प्रयोगानुसार स्वत:ला मोल्ड करत नेण्याची ताकदही मिळत गेली. महत्त्वाचं म्हणजे- काळं आणि पांढरं असं जगात काहीच नसतं, प्रत्येक ग्रे एरिया आणि त्या-त्या ग्रे एरियाची आपली गुणवैशिष्ट्ये अगर दोष असतात. तेव्हा हे सत्य आपण स्वीकारायचं असतं, याचं भान विज्ञानाने दिलं. मुख्य म्हणजे आज जे सत्य आहे ते एखाद्या प्रयोगानंतर खोटं ठरू शकतं. किंवा त्या सत्यात अधिक भर पडल्यानं आधीचं कमी अस्सल राहू शकतं, त्यामुळे प्रयोगांती हाती येणारं आणि सतत हाती येत राहणाऱ्या ज्ञानासाठी आपण खुलं व सजग असायला हवं, याची जाणीव विज्ञानातूनच आली.

निव्वळ विज्ञानापुरतंच नव्हे, तर खऱ्याखुऱ्या आयुष्यातही माणसांच्या बाबतीत पूर्वग्रह किंवा ग्रजेस धरून ठेवण्यापेक्षा त्यांच्यातील सूक्ष्म बदलांना, बदल करण्याच्या इच्छेला आणि ते आहेत तसं स्वीकारण्याला आपण तयार असायला हवं, हेही रुजत गेलं. त्याचबरोबर जगण्याच्या प्रवाहात एक तऱ्हेचा संयतपणा, एक तऱ्हेचा ठहराव अत्यंत आवश्यक असतो. एखाद्या गोष्टीचा माग काढताना, रहस्याची उकल करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सोबतीला चिकाटी अत्यंत आवश्यक असते. त्यातूनच एक ठहराव येतो. जीवसृष्टीच्या कल्याणासाठी आवश्यक असणारा रिझल्ट मिळेपर्यंत थांबून राहण्याची गरज असते, अशा तऱ्हेचा संयतपणा विज्ञानामुळे उमजत गेला.

विज्ञानासाठी प्रत्येक जीवजंतू महत्त्वाचा असतो. त्या-त्या जीवजंतूंची लाईफसायकल आणि त्यांचं महत्त्व अबाधित असतं, हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार आपल्या समाजाकडं पाहण्याची दृष्टी देऊन गेला. रंग, रूप, भाषा, जात, धर्म या पल्याड प्रत्येकच माणूस महत्त्वाचा असतो. प्रत्येकाच्या जगण्याचं व जीवाचं मोल असतं आणि त्यात कुठल्याही तऱ्हेचा निराधार द्वेष बाळगण्याचं काहीच कारण नसतं, याचा अनुभव येत राहिला. जातव्यवस्था नाकारण्याचं धाडस विज्ञानाने दिलं, तसंच जातव्यवस्था आहे हे सत्य पाहण्याचा दृष्टिकोनही विज्ञानानेच दिला. विज्ञान भेदाभेद मानत नसेल, मात्र समाजव्यवस्था तशी असेल तर त्याकडे भेदाभेदाची नीती निराधार आहे म्हणत सोडून देता येणार नाही. त्यासाठी पुन्हा सातत्यानं प्रयोगशील राहून त्यात अभिसरण होत राहील का, हे पाहण्याचा विचार विज्ञानाने दिला.

विज्ञानाने अंधश्रद्धांना विरोध करण्याचं बळही दिलं. मी गर्भवती होते, तेव्हा त्या काळात एकदा चंद्रग्रहण होते. ग्रहणाचं काहीही पाळायचं नाही, असं मी ठरवलं होतं. जे विज्ञानविरोधी आहे ते आपण का फॉलो करायचं, असा साधा विचार होताच. आपला वैज्ञानिक विचार गर्भावस्थेतच बाळाला सांगण्याचा हा किती चांगला मार्ग आहे, असं मला वाटत होतं. यावर एक मैत्रीण म्हणाली, ''तुला चूक वाटत असेलही; पण त्यासाठी बाळाचा जीव धोक्यात घालण्याची रिस्क का घ्यावी?'' केवळ भीतीपोटी जे सत्य आपल्याला माहिती आहे, त्यापासून आपण परावृत्त का व्हायचं, हे मला कळलं नव्हतं. भीतीला भीक न घालण्याचं बळ या विज्ञानानेच दिलं.

माझ्यात समतावादी विचार रुजण्यात विज्ञानाची मदत झाली. स्त्री आणि पुरुष यांच्यात शारीरिक फरक असला तरी दोन्ही प्रकारच्या जीवरचना आपल्या जीवसृष्टीसाठी आवश्यक असतात, तेव्हा कशाला उगीच बाऊ करायचा हेही शिकवलं. वयोमानानुसार निरनिराळ्या ऊर्मी असतात, आसपासच्या निरीक्षणांतून कुतूहलं असतात आणि ती त्या त्या वेळी शमवता आली तर त्यांचाही बाऊ करण्याची गरज नसते. याच संस्कारामुळे कदाचित आज मी माझ्या मुलाला वाढवताना त्याला तो 'स्ट्रॉंग आहे' असं म्हणताना तो पुरुषासारखा स्ट्रॉंग आहे असं म्हणत नाही. त्यानं त्याच्या जेवणाचं ताट उचललं नाही तर 'मुली बघ कशा उचलतात,' असं म्हणत नाही. त्याला काजळ लावून पहावंसं वाटलं, बहिणींचं पाहून गजरा डोक्यावर ठेवून पाहावासा वाटला, किचनमध्ये लुडबूड करावीशी वाटली- तर आम्ही कुणीही त्याला अडवत नाही. नैसर्गिक भावनांचा निचरा होणं आवश्यकच असतं आणि ती तशी नाही झाली तरी कुठल्या मार्गानं बाहेर पडेल, याची आपल्याला कुणालाच खात्री देता येत नाही. नैसर्गिकता स्वीकारत एकमेकांचा आदर करण्याचं भान येत गेलं.

समजा- मी विज्ञान शाखेतून शिकले नसते, तरी इतकी खात्री आहे की, जग अनुभवताना स्वत:ला विज्ञानाची लिटमस टेस्ट नक्कीच लावली असती. विज्ञानाच्या दृष्टीने जे चूक, अन्यायकारक आणि शोषणास कारणीभूत ठरणारं आहे त्याबाबत मनात कुठलीच शंका न ठेवणं- ही लिटमस टेस्ट नक्कीच बाळगली असती. विज्ञानही त्याला आज जे माहिती नाही, गूढ आहे आणि उकल कधी होणार आहे याची त्याला माहिती नाही- अशाही स्थितीत वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून शास्त्रशुद्ध चिकित्सा करत राहण्यालाच महत्त्व देतं. त्यात कुठलीही हयगय करत नाही. तोच विचार अंगीकारला असता, त्याचं कारण घरातूनच त्या पद्धतीच्या चिकित्सेला पूर्ण थारा राहिला आहे. त्यामुळेच कौटुंबिक संस्कारांतून विकसित झालेला दृष्टिकोन विज्ञान शाखेत गेले नसते तरी जगण्यात रुजत चालला होता... पण कदाचित विज्ञान शाखेच्या संस्काराने ते रुजणं अधिक काँक्रीट केलं.

हिनाकौसर खान-पिंजार, पुणे
greenheena@gmail.com
Mob.9850308200

(उशिरा हाती आल्यामुळे हा लेख मागील विशेषांकात जाऊ शकला नाही, म्हणून येथे प्रसिद्ध करीत आहोत. **संपादक**)



लेख वाचण्यासाठी
पृष्ठ १९ वर चला

ऑगस्ट : कमलपुष्पाचा हा मधला हंगाम

विश्वास वसेकर







साधना साप्ताहिक :
५ सप्टेंबर २०२०

Registered Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 27-8-2020 / Date of Publication : 27-8-2020

एप्रिल ते ऑगस्ट २०२० या पाच महिन्यांत प्रकाशित झालेले, साधना साप्ताहिकाचे सहा विशेषांक...

१. लेनिन १५० विशेषांक

(रशियन राज्यक्रांतीचे प्रणेते व्लादिमीर लेनिन यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कुमार केतकर यांचा लेख आणि लेनिनचे समकालीन महान रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की यांनी लिहिलेल्या 'लेनिनच्या सहवासातील ते दिवस' या दीर्घ लेखाचा अनुवाद)

२. 'उघडा, दरवाजे उघडा!' विशेषांक

(उर्दू व हिंदीमधील महान लेखक कृष्ण चंदर यांच्या **दरवाजे खोल दो** या उर्दू नाटकाची संहिता, त्यासंदर्भात त्यांचे मनोगत आणि ख्वाजा अहमद अब्बास यांनी लिहिलेली प्रस्तावना– या सर्वांचा भारत सासणे यांनी केलेला अनुवाद आणि या निमित्ताने लिहिलेले मनोगत. शिवाय, कृष्ण चंदरलिखित 'जामुन का पेड' या हिंदी कथेचा चंद्रकांत भोंजाळ यांनी केलेला अनुवाद)

३. लोकमान्य टिळक विशेषांक

(लो. टिळक यांच्या १०० व्या स्मृतिदिनानिमित्त काढलेल्या या अंकात सदानंद मोरे यांची मुलाखत व 'टिळक हरवले आहेत' हा नाट्य रूपातील लेख आहे. आणि कुमार केतकर, अरविंद गोखले, शैलेश माळोदे यांचे लेख आहेत. शिवाय टिळकांनी लिहिलेला न्या.म.गो. रानडे यांच्यावरील मृत्युलेखही आहे.)

४. अण्णा भाऊ साठे विशेषांक

(अण्णा भाऊ साठे यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त काढलेल्या या अंकात अर्जुन डांगळे यांची मुलाखत आणि उत्तम कांबळे, राजन गवस, मनोहर जाधव, लक्ष्मीकांत देशमुख, राजा शिरगुप्पे, संजय देशपांडे यांचे लेख आहेत. शिवाय, अण्णा भाऊ यांनी लिहिलेल्या 'माझा रशियाचा प्रवास'मधील पहिले प्रकरण.)

५. तीन संपादकांच्या मुलाखती विशेषांक

(एन. राम यांनी सांगितलेली 'द हिंदू' या इंग्रजी वृत्तपत्राची वाटचाल, शेखर गुप्ता यांनी सांगितलेली स्वतःची इंडिया टुडे, इंडियन एक्सप्रेस व द प्रिंट मधील कारकीर्द, आणि नरेश फर्नांडिस यांनी सांगितलेली स्क्रोल या डिजिटल पोर्टलची वाटचाल. राम व फर्नांडिस यांच्या मुलाखती घेतल्या आहेत संकल्प गुर्जर यांनी तर गुप्ता यांची मुलाखत घेतली आहे जायली वाव्हळ यांनी.)

६. विज्ञानाने मला(आणि जगाला) काय दिले?

(डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त काढलेल्या या अंकात प्रभाकर देवधर, दत्तप्रसाद दाभोळकर, डॉ.अभय बंग, डॉ.आनंद नाडकर्णी, पंडित विद्यासागर, विवेक सावंत, सत्यजित रथ, लक्ष्मीकांत देशमुख, अतुल देऊळगावकर, डॉ. हमीद दाभोलकर, डॅनिअल मस्करणीस यांचे लेख आहेत. शिवाय परिशिष्टामध्ये सुनीलकुमार लवटे व विनोद शिरसाठ यांचे लेख.)

वरील प्रत्येक विशेषांकाच्या छापील प्रतीची किंमत ४० रुपये आहे. सर्व विशेषांक एकत्रित घेतले तर २०० रुपये आणि ते सर्व पोस्ट वा कुरिअरद्वारे हवे असतील तर २५० रुपये.

संपर्क
साधना साप्ताहिक
४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph 02024451724 | Mob. 7028257757
weeklysadhana@gmail.com